

# माझ्या लव्हमॅरेजची स्टोरी

डॉ नितिन मोरे

# माझ्या लव्हमॅरेजची स्टोरी

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# माझ्या लव्हमॅरेजची स्टोरी

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# माझ्या लव्हमॅरेजची स्टोरी

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

Cover: Chaitanya Chavan

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २२ जानेवारी २०२१

©esahity Pratishthan®2021

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत: आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे अठ्ठाविसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

# माझ्या लव्हमॅरेजची स्टोरी

डॉ. नितीन मोरे

१

## सुरुवात!

कुठल्यातरी हिंदी सिनेमात एकदा पाहिले, म्हणजे ऐकले होते.. दुसऱ्या कुणाच्या लग्नात अजून कुणाची लग्नं जमत असतात म्हणे!

.. म्हणजे तिकडे बोहल्यावर पद्धतशीर लग्न सुरू असते.. नवरानवरी बोहोल्यावर हाती माळा घेऊन सलज्ज वगैरे उभे असतात. भटजीबुवा पुढच्या आयुष्यातील तारांबळ कळावी म्हणून चंद्रबलं आणि ताराबलं वगैरे घसा फोडून गात असतात.. नि इकडे कुणी होतकरू आयुष्यातले ते एकमेव ध्येय असल्यासारखा आपली लाइन जमवण्याच्या मागे लागलेला असतो. त्यात किती चूक की किती बरोबर हे नाही करायचे, पण एक आपले जनरल ऑब्झर्वेशन माझे. अजून एक निरीक्षण आहे माझे.. म्हणजे बघा हां.. आपल्याकडच्या लग्नांची ही एक गंमत असते. आपण मारे लगीनघाई वगैरे म्हणत असतो.. पुलंनी नारायणाला उभे केले त्या समारंभात. तिथे पायाला भिंगरी लावून सारे पळा पळा कोण पुढे पळे तो सुरू असते. विशेषत: वधूकडील सारे, मारे अगदी धावपळीत असतात. धावपळ म्हणजे काय काय.. अगदी हॉल,

त्यातली टेबलं नि खुर्च्या, स्टेज नि डेकोरेशन असल्या निर्जीवांपासून भटजी नि वाजंत्रीवाले, फुलवाले नि जेवणवाले असल्या सजीवांपर्यंत.. एक जिवंतपणा असतो लग्नस्थळी. त्यात मग पाहुण्यांचे मानपान किंवा खरेतर मानापमान.. हा तर अगदी खराखुरा जीव जाई तोवर जिवंत मामला. लग्नस्थळी सारे प्रवासी असतील घडीचे पण सस्त्यातल्या साडीवर बोळवण करता काय म्हणत विहिणबाई साडीची घडी नाही मोडत. मुहूर्ताची वेळ टळली तरी बेहत्तर, पण वेळ साधून टोमणेटामणे मारणे चुकत नाहीत कुणाचे. म्हणजे लगीनघाई कितीही असो, वेळ नाही नि घाई आहे म्हणून कोणी अडून बसत वेळ साधणे सोडत नाही. वेळात वेळ काढून हे विषय नि त्यातून येणारे उपविषय नि त्याला लागून येणारे उपद्व्यापांचे उपक्रम पुढे येत असतात. थोडक्यात सारे कसे 'वेळच्या वेळी' व्हावे म्हणून धडपड सारी! आणि त्यातच आपल्या आयुष्यात तेच सारे वेळच्या वेळी व्हावे म्हणून इकडे कुणा तरूणाचे प्लॅनिंग सुरू असते.. अर्थात तरूणींचे पण असावे.. कारण याबाबतीत टाळी एका हाताने थोडीच वाजते?

माझे असेच झाले..

म्हणजे आता सांगतो.. कारण सारे होऊन अगदी यथासांग पार पडले. यथासांगच म्हणावे.. कारण लग्न म्हणा की पूजा.. आपल्याकडे यथासांगच होत असतात.. त्याशिवाय अजून कुठल्या पध्दतीने त्या झाल्याचे ऐकलेय का कुणी? तर सगळ्या प्रेमकथा ह्या अशा सुरू होऊन त्यांच्या लॉजिकल म्हणजे तार्किक शेवटालाच पोहोचायच्च्या! म्हणजे आपले अबलख वारू गंगेत यथासांग अंघोळ करते झाले की द एंड! किंवा खरेतर द न्यू बिगिनिंग!

तर सांगायची गोष्ट आहे ती काही वर्षांपूर्वीची. माझीच. माझ्याच प्रेमकहाणीची स्टोरी आहे ही. आणि मला ठाऊक आहे, तुम्हा सगळ्यांना ह्या कुणाकुणाच्या लव्हस्टोऱ्या ऐकण्यात फारच इंटरेस्ट असतो. माझं तसं जनरल ऑब्झर्वेशन हे ही आहे.. प्रेमकथा कशी घडते? एखाद्याची लव्हस्टोरी सुरू होताना लफडं म्हणून सुरू होते.. मग त्याचे प्रकरण बनते.. मग त्या प्रेमीजीवांस प्रमोशन मिळून ते बी. एफ. नि जी. एफ. मधून प्रियकर नि प्रेयसी बनतात. सिनेमातले असले तर 'दो जिस्म मगर एक जान हैं हम' असले शरीरशास्त्रास अमान्य होईल अशा कविकल्पनांचे गाणे गातात.. भावी आयुष्याची स्वप्ने पाहात पाहात 'दो पंछी दो तिनके लेके चले

हैं कहां' पर्यंत पोहोचतात. कहाणी पुढे सरकली की त्यात मग अटळ असे ट्विस्टस आणि टर्नस .. म्हणजे वळणे आणि आडवळणे.. ती हवीतच. मग त्यातून तावून सुलाखून म्हणजे 'दुनियाकी कोई भी ताकत हमें रोक नहीं शकती' (हा मराठी उच्चार खास) वगैरे होते. नि प्रेमी युगुलाची प्रेमकथा पुढे इंच इंचभर सरकते.. सरकत सरकत किंवा खरेतर प्रेमाच्या लाटांवर तरंगत तरंगत प्रेमकथेची नय्या हळूहळू किनाऱ्याला येऊन लागते. पुढे एकदा किंवा एकदाचे घोडे गंगेत नाहाते. घोडे करेलही ती अंघोळ पण तोवर इकडे हिरोला घाम फुटलेला असतो! आधी तिच्या दिलमें उतरायचे, त्यात जागा बनवायची.. मग 'तिने लाजून हो म्हटले' की पुढे इतर दुनियादारी झेलायची! एकट्या मजनूने लैलेसाठी काय काय करावे? हीर रांझा नि सोहनी महिवालाच्या गोष्टी झाल्या.. लैला मजनूच्या झाल्या ऐकून.. कोणी कोणी काय काय केले प्रेमासाठी हे सारे माहिती आहे, पण मजनूंची हौस काही फिटत नाही नि प्रेमकथा घडायच्या काही टळत नाहीत.

अशीच माझ्या ही प्रेमकहाणीची कहाणी ही. कुणी म्हणेल ती सांगावीच का? तर सांगायला हवीच .. तेवढेच होतकरूंना म्हणजे भावी पिढ्यांना मार्गदर्शन! आणि खरे सांगू तर या 'क्षेत्रात' तसे

ऑथेंटिक म्हणावे असे मार्गदर्शन मिळते कुठे? आज अभिमानाने सांगतो मी, आमच्या पिढीने स्वबळावर घडवून आणल्या आपापल्या प्रेमकहाण्या.. आम्हाला गाईड करायला कुणी नव्हते. खरेतर मी असे म्हणू नये.. पण तसेच काही होतेच ना तेव्हा. अडखळत अडखळत प्रेमाची पाऊले टाकली मी त्याची ही स्टोरी. आता ती इतरांनी एखाद्या पोथीचे श्रवण करावे तशी ऐकावी का? अर्थातच. कारण आपल्या शिक्षणपद्धतीत हे असले 'जीवनावश्यक' विषय कुणी शिकवतच नाहीत. तेव्हा माझ्यासारख्या स्वमेहनतीवर पुढे आलेल्याने इतरांना पुढे जाण्यास असे दिशादर्शन केलेच तर पाहिजे की नाही? म्हणजे पथदर्शन म्हणा.. मार्गदर्शन म्हणा किंवा काही म्हणा!

थोडक्यात हे मी सांगितलेच पाहिजे. त्याला मग तुम्ही गोष्ट म्हणा की हकीकत..!

पण हे असे झाले हे खरे!

२

## योगायोगाची सुरुवात योगायोगाने!

देव आपल्याला नातेवाईक का देतो? कुणी काहीबाही उत्तरे देईल याची. पण माझे उत्तर मात्र ठरले आहे. त्या लग्नगाठी विधात्याने ठरवल्याप्रमाणे बांधल्या जायला हव्या असतील तर अशा नातेवाईकांना पर्याय नसावा! अर्थात हे माझे फक्त स्वानुभवातून आलेले बोल आहेत. नातेवाईक, मग त्यांची मुलं, तुमचे भाऊ नि बहिण, त्यांची लग्नं, नि त्यातून निर्माण होणाऱ्या संधी .. म्हणजे माझ्या बाबतीत तरी झाले ते असे झाले. नाहीतर मी एकुलता. ना सख्खा भाऊ ना बहीण मला. पण चुलत नि मामे दोन्ही प्रकारच्या बहिणी मात्र आहेत मला. आणि माझ्याच या स्टोरीसाठी त्यांची योजना आहे की काय असा संशय तुम्हाला ही येईल माझी गोष्ट ऐकल्यावर.

तर माझ्या चुलत बहिणीची .. म्हणजे रागिणीची लग्नघटिका जवळ येत चालली तशी आमच्या घरी पण गडबड उडाली. मला तर लग्न घटिका जवळ येतेय याच्या ऐवजी घटिका भरत आली

असेच म्हणावे वाटते.. म्हणजे अगदी 'घटिका गेली, पळे गेली.. राम का रे म्हणा ना!' पण ती हल्लीची गोष्ट. तेव्हाची नाही. तेव्हा शादी का बुंदीचा लड्डू खायचा बाकी होता आणि तो किती गोड असावा याची स्वप्ने पहायचे दिवस होते ते. आणि याबाबतीत कुणी पुढच्यास ठेच लागली म्हणून शहाणा व्हायचा प्रयत्नही करीत नाही. सगळ्यांनाच आपापली ठेच खायची हौस..

तर तेव्हा मी नुकताच कॉलेजातून बाहेर पडलेला एक होनहार तरूण होतो. होनहार.. आणि होतकरू हे असे शब्द आहेत ना की त्यातून इतके आणि इतकेच कळते.. की हा बेटा हल्लीच परीक्षा पास झालाय.. ज्या काही बऱ्यावाईट मार्कांनी असेल.. आणि आता नोकरीच्या शोधात आहे! म्हणजे थोडक्यात सुशिक्षित बेकार म्हणा! पण कसाही खात असला तरी वाघालाही वाघोबा म्हणणारे आम्ही लोक.. बेकार तरूणांना बेकार म्हणत नाही आम्ही नि त्यांच्या नाजूक मनास ठेच पोहोचवत नाही. तोंडभरून होतकरू म्हणून कौतुक करतो त्यांचे. तसे त्यांना नोकरी मिळावी याच्याबद्दल आम्ही काही करू न करू पण त्यांचे मन दुखावले जाऊ नये म्हणून आम्ही त्यांना अत्यंत होनहारपणे होनहार नाहीतर होतकरू म्हणू. तर मी तसा होतकरू होतो. माझी चुलत बहीण,

रागिणी, तशी तिशीत आलेली. म्हणजे एकाएकी नाही तशी.. चांगली जन्मानंतर तीस वर्षांनंतर तशी झालेली. वाक्य काहीतरी विचित्र वाटतेय ना? पण त्यात खरेतर खोटे काहीच नाही! फक्त थोडेसे विचित्र लिहिले की वाचणारे पुन्हा वाचतात .. काय आहे बुवा या वाक्याचा अर्थ! हे म्हणजे माझे एक जनरल ऑब्झर्व्हेशन नेहमी प्रमाणे. तर तिचे लग्न जमवता जमवता एवढी वर्षे उलटून तिशीत आलेली रागिणी. आता तिसाचा भोज्या गाठणार होती ती. तिचे लग्न ठरले आणि त्यांच्या घरी आनंदीआनंद झाला. तिचे लग्न ठरले म्हणजे नक्की काय काय झाले नि ठरत नव्हते तेव्हा ते का ठरत नव्हते याची मला कल्पना नव्हती. पण तसे होत होते हे खरे. नाहीतर ती अशी तिशीत कशी पोहोचली असती? विशेषत: माझ्या काका काकूंची करडी नजर असताना? तर ते एक राहू देत .. म्हणजे मी काका काकू बद्दल सांगायला कांकू करतोय कारण माझे काका नि काकू म्हणजे एक स्वतंत्र विषय आहेत!

आमचे एक फॅमिली ज्योतिषी आहेत.. लोकांचे कसे फॅमिली डॉक्टर असतात तसे.. ते म्हणतात.. 'कुठल्याही गोष्टीचा योग यावा लागतो. आणि त्या जगन्नियंत्याच्या इच्छेवाचून.. इव्हन अ लीफ डझ नॉट मूव्ह!' शेवटचा इंग्रजी भाग आमच्या ज्योतिषांच्याच तोंडचा. त्यांना तशी सवय आहे. मध्येच मराठी इंटू इंग्रजी करायची. म्हणजे बोलता बोलता म्हणायचे, 'व्हॉट हॅपन्स टुमॉरो.. नो वन

नोज.. बट आय टेल्यू..' वगैरे. तर सांगायचे इतकेच की तसा योग येत नसावा आजवर आणि आता आला असावा जुळून आणि काय! नि चढल्या रागिणीबाई बोहल्यावर!

पण गंमत पहा.. तिच्या लग्नात माझा योग जुळून यावा.. म्हणजे अगदी लग्नबिग्न नाही पण त्यादिशेने पहिली चिमणी पाऊले पडावीत.. हा पण योगायोग? आता चिमणी वगैरे पाऊले या तारूण्यसुलभ विषयात खरेतर बसत नाहीत.. पण लिहिताना छान वाटते ना म्हणून लिहिलेय इतकेच! नाहीतर काय कावळ्यासारखी पावले लिहिणार मी? तर ज्योतिषी आमचे खरेच सांगत असावेत! योग आणि योगायोग यांचे योगदान मानवी जीवनात योग्य प्रमाणात समजून घ्यायला हवे हेच योग्य आणि काय.. आपल्याला योगायोगाने चुलत बहीण मिळावी, तिचा लग्न सोहळा असावा.. आणि त्यात योगायोगाने सारे घडून यावे.. योगायोगच सारा.. पण हे समजून घेण्याचा योग कुंडलीत हवा इतकेच!

३

## परिचयाचा इंट्रो

एकेकाच्या काय सवयी असतात नाही? आपल्या सवयी ही नंतर सवयीने सवयीच्या होऊन जातात! हे माझे एक जनरल ऑब्झर्व्हेशन.. आणि काही नाही!

तर माझी ही सवयच आहे.. माझ्या सवयीचा परिचय करून द्यायलाच हवा.. तर हीच ती सवय.. परिचय अर्थात इंट्रोडक्शन. म्हणजे लहानपणी निबंध लिहिताना माझी इंट्रोच मूळ मुद्द्याहून मोठी असायची. इंट्रो म्हणजे परिचय! मूळ विषयास येण्याआधी नमनास घडाभर तेल. पामोलिन नाही अगदी ऑलिव्ह ऑईल.. बोलाच्याच तेलात कशाला हवी कंजूसी.. घाला अगदी महागडे शेरभर ऑलिव्ह ऑईल आणि काय! पण ही लांबलचक इंट्रोची

सवय इतकी महाग पडेलसे वाटले नव्हते. म्हणजे झाले असे होते की निबंधात माझी परिचयात्मक माहितीच एवढी असायची की एकदा आमच्या मराठीच्या बर्वे बाईंनी मला खास ओरडा दिला होता. म्हणाल्या, अरे एवढा लिहितोस पण जरा विषयास धरून लिही.. थोडक्यात विषय राहिला बाजूला.. त्यापर्यंत

पोहोचण्याआधीच शेर सव्वाशेर तेल टाकले जायचे माझ्या कडून. तर हा नुसताच इंट्रो द्यायची सवय वैदेहीबरोबर बोलताना ही कायम राहिली.. मूळ मुद्द्यास हात घालणे नाही नि मग त्यामुळे बस मिस होतेय की काय याचा धोका निर्माण झाला.. पण ती गोष्ट नंतरची. वैदेही कोण आणि ती गोष्ट काय.. आताच नाही सांगत.. पुढे येईलच ती गोष्ट. तूर्तास सीरियलवाले कसे उद्याच्या नि परवाच्या भागात काय आहे ते दाखवतात तेवढीच ही झलक! आणि फक्त आजच्या होतकरूंनी ध्यानात घ्यावे ते इतकेच.. लहानपणीच योग्य सवयी लावल्या की पुढे उपयोगी पडतात.. मी काही तसा पोक्त नाही.. पण हा पोक्तपणाचा सल्ला आणि काय! तर या इंट्रोचीही पण लांबलचक इंट्रो न होवो!

झाले काय ना की.. लग्न म्हटले की लग्नघर आले. नशिबाने ते दूर होते! आता नशिबाने असे म्हणतोय मी. पण खरेतर आई म्हणालेली, 'आता आपल्याला चारेक दिवस आधी आणि चारेक दिवस नंतर राहावेच लागेल तिथे..'

तेव्हा पहिला निषेधाचा झेंडा मी दाखवला होता! 'इतके दिवस? काय करणार? मी नंतर येईन..' असा!

"माणूसघाणेपण सोड आता. लग्न म्हटले की चार माणसं येणार, लग्नघरात सतराशे साठ व्यवधानं असतात. मदत लागते. तेव्हा तिथे न थांबता पळून येणार? सगळेच गुण बापाचे नको घ्यायला."

आईची ही एक सवयच आहे. मला ओरडतेच ती पण काही संबंध असो नसो, बाबांना टोमणा मारून घेते त्यातच ती. कदाचित एका ओरड्यावर एक ओरडा फ्री अशी काही स्कीम असावी तिची. ओरडायचेच तर बाबांना त्यात ओढायलाच हवे.. तर आईने खरडपट्टी काढल्यावर मला तयार व्हावेच लागले.

तर दैवगती अगाध आहे.. होनी को कौन टाल सकता है.. और जो टाल सकते हैं उसे होनी कैसे कह सकते हैं? थोडक्यात मी जायला नि तिथे आठवडाभर रहायला तयार झालो! ते लग्नघर दूर नसते तर कसला मी आठवडाभर राहिला असतो नि कसली भेटली असती ती? तर योगायोग म्हणतात तो हा नि असाच असावा.. आणि घडणाऱ्या गोष्टी न टळण्यास कारणीभूत असलेच योगायोग असावेत.

काकाचे घर मोठे. वर गच्ची.. पुढे झोपाळा. मोठी बाग. घरातल्या घरात वर चढायला सिनेमात असतो तसा जिना. हे सगळे

मी का सांगतोय? कारण माझ्या स्टोरीत.. म्हणजे लव्हस्टोरीत हे सगळेच महत्त्वाचे होते. म्हणजे काका जवळ राहते.. त्यांचे घर लहान असते.. अगदी त्यांच्या घरात झोपाळा नसता तरी माझ्या या सीरियल मधले काही एपिसोड गळले असते. थोडक्यात एवढेच.. आमची वरात निघाली आणि लग्नघरी येऊन पोहोचली!

मला वाटते इतपत इंट्रो पुरे. मी इतक्यात थांबलो इंट्रो मध्ये हे पाहून बर्वेबाईंना भरून आले असते! गेल्या कधीच देवाघरी बिचाऱ्या पण अशा आठवण रुपी उरल्या आहेत. आणि अजून एक.. माझी मुख्य गोष्ट इंट्रोपेक्षा मोठीच असणार आहे! बर्वे बाईंना तर हे ऐकून गहिवरच आला असता. बाईंची आज खूप काढून झाली आठवण.. त्या तिथे लागत असेल का उचकी? कोणास ठाऊक!

तर आम्ही पोहोचलो काकाकडे.. मुक्काम पोस्ट काकास हाऊस! म्हणजे ग्राऊंड झीरो!

४

## नक्षत्राचे दर्शन

तर मु.पो.काकाचे घर!

हा काका म्हणजे दिन्या काका. माझ्या बाबांहून लहान. आम्ही त्याला एकेरीतच हाक मारायचो. दिन्या काका तसा लहान भाऊ असला तरी शिस्तीचा कडक. काकू म्हणजे रमाकाकू त्याच्याच सारखी. कडकलक्ष्मी! अर्थात दोघे तसे प्रेमळ होते. पण कर्मठ होते. आमच्या घरी बाबा असे नव्हते. देवधर्म वगैरे जेवढ्यास तेवढे. आई पण तशी धार्मिक नव्हती. पण काका मात्र अत्यंत काटेकोरपणे सारे देवधर्म पाळे आणि त्यातली चूक त्याला खपत नसे. त्यामुळे त्याच्या घरी मला त्याच्या शिस्तीचे टेन्शन असे. त्या शिस्तीच्या चिखलात माझ्या प्रेमकहाणीचे कमळ त्यामुळे अगदी उठून दिसते मला तरी आज मागे वळून पाहताना. काकाचे घर मोठे असले तरी

काकाने लग्नासाठी बाजूच्या एका घरात तात्पुरती सोय ही केलेली पाहुण्यांची. तेथे मग लोक येऊन बसायला लागले, गप्पांचा फड जमवायला लागले, दुपारी डोळे मिटून पडायला लागले. दोन्ही घरे तशी मोठी, सर्वांना पुरेशी पडतील अशी, तरीही लग्नघराचा

गोंगाट काही चुकायचा नाही. त्यामुळे शांतपणे मनन चिंतनासाठी हे बाजूचे घर बेस्टच होते. मला पण ते आवडले पहिल्यांदा.. पण ती गोष्ट वैदेहीच्या आगमनाच्या आधीची.

पहिला दिवस काकाच्या घरी तसा बोअर होता. दिवस म्हणावा तर खरेतर संध्याकाळपर्यंत . म्हणजे काका काकू भेटले. रागिणी भेटली. तिची चेष्टामस्करी केली. तिच्या सासरावरून नि होणाऱ्या नवऱ्यावरून चिडवायला नाही म्हटले तरी गंमत आली. पण सारे कसे काकाच्या करड्या शिस्तीत बसवून. काका बहुधा दिवसात किती हसावे याचा पण कोटा सकाळी ठरवून देत असावा. म्हणजे *'आजचा हास्य कोटा वाटप : रोज सकाळी सात वाजता..'* अशी काही नोटिस नव्हती त्याच्या घरी, पण मोजून मापून हसताना हे असे असणारच नाही असे नाही असे वाटले मला. आम्ही गेलो त्यादिवशी अजून कोणी पोहोचले नव्हते. पण नाही कशाला म्हणू.. रागिणीच्या कोण कोण मैत्रिणी येतील आणि त्या कशा असतील याची उत्सुकता होतीच. आडून आडून मी तिला विचारले ही.. माझे प्रश्न वाढत गेले.. पण ते फारसे आडून नसणार कदाचित. कारण माझ्या काही प्रश्नानंतर रागिणी म्हणाली, “तू माझ्या लग्नालाच आलायस ना.. की माझ्या मैत्रिणींची मैत्रीपूर्ण चौकशी करायला?”

मी कानाला खडा लावला. उगाच उघड गैरसमज नको कुणाचा. अर्थात गैरसमज कशाला म्हणा? तसा मी अगदीच ताकाला गेलो नव्हतो असे नाही पण तरीही आता भांडे लपवणे गरजेचे! आधी तिच्या येतील त्या मैतरणी पाहू मग ठरवू.. ताक वगैरे हवंय की नाही! भांड्यांचे काय.. दिसला एखादा सुंदर नमुना तर तर भांडंही काढू बाहेर आणि काय! अर्थात हे सारे आई वगैरे समोर नसताना. आणि माझी त्यात चूक काय होती? माझ्या त्या वयात मी दुसरे काय करायला हवे होते? तरी बरे काकांचे श्री जगद्गुरू जगदानंद जगदाळे स्वामी म्हणतात, 'सारे कसे वेळच्या वेळी होऊन जाऊ द्या नाहीतर नंतर पस्तावाल!' हे स्वामी प्रकरण मला माहिती नव्हते. पण आल्या आल्या.. म्हणजे आम्ही काकाच्या घरी आल्या आल्या काकाच बाबांना म्हणालेला तसे.. 'जगदानंदांची कृपा दादा.. स्वामी म्हणतात तसे सारे वेळच्या वेळी झाले.' पुढची तीन मिनिटे काकाने त्या जगद्गुरू बद्दल काही वाक्ये बोलली.. त्यातले ते मी वर उद्धृत केले ते! ( वरील वाक्यात वाक्ये बोलली ही चुकीची भाषा बोलली गेली असेल पण उद्धृत सारखा अवघड शब्द उद्धृत करून त्याचे कॉम्पनसेशन केले की नाही? शेवटी मराठीची काळजी आपणच नको घ्यायला? न वापराने उद्धृत सारखा एखादा शब्द गुडुप नको व्हायला!)

तर, मी तिथे तसा बोअर झालो होतो. नाही म्हणायला काकाची बाईक घेऊन मी थोडा फेरफटका मारून आजूबाजूच्या सौंदर्यस्थळांचा अंदाज घेतलेला. तेवढेच मनोरंजन. विशेष हाती काही लागले नाही. आणि दुपारी उन्ह चढल्यावर घरी परतावेच लागले. आणि हे जे स्थळ निरीक्षण आहे ते बाईक वरून नीट बारकाईने होत नाही.. तेथे चालणेच गरजेचे. हे एक आजच्या होतकरूंनी ध्यानात घ्यावे.

दुपार तशी लोळून काढली मी. कंटाळा येणार होताच. बाजूच्या घरात कॉटवर छान ताणून दिली. इकडे काकाच्या घरात कोणी न कोणी येत होते. धावपळ सुरू असावी. मध्येच काही मंजूळ आवाज ऐकून मी उठून पाहात होतो पण एकूण टेहळणीसाठी हे घर योग्य नव्हतेच.. फक्त या घरातल्या मागच्या व्हरांड्यातून काही आवाजांचा स्पष्ट अंदाज येई तो भाग वगळता. माझ्या कहाणीत हा व्हरांडा पण महत्वाचा होता.. पण ती पुढची गोष्ट.

संध्याकाळी माझ्या कंटाळ्याचा कडेलोट झाला. आईचे ऐकून उगाच इकडे आलो असे वाटायला लागले. कंटाळून तसाच झोपेतून उठून मी काकाच्या घरात शिरलो.

बाहेर काही चपला पडलेल्या. त्यात काही नाजूक लेडिज सॅंडल्सही होत्या. म्हटले काही नवीन चेहरे दिसतील अशी शक्यता

आहे. शितावरून भाताची घेतात तशी चपलांवरून आतील उपस्थित कन्यावर्गाची परीक्षा करीत मी  दरवाज्यात पाऊल टाकले. समोरच्या  जिन्यावरच आई कुणाशी बोलत होती. त्या बाहेरील सुंदर चपलांपैकी एकीची ती सुंदर तरूण मालकीण होती. ती कोण होती.. तेव्हा मला ठाऊक नव्हतेच. पण माझ्या अजागळ आणि गबाळया राहण्याबद्दल मला तेव्हा प्रकर्षाने जाणीव झाली. ती सुकांत चंद्रानना कोण असावी? एका नजरेत मला ती आवडून गेली. पण मी तिच्या समोर आता जाऊही शकत नव्हतो. अशा गबाळग्रंथी अवताराचे मला मनापासून वाईट वाटले. ती कोण आहे यापासून सुरूवात.. मी दरवाज्याच्या पाठी हळूच लपून अंदाज घेऊ लागलो. आई पाठमोरी होती आणि ती सुबक ठेंगणी आईशी मस्त गप्पा मारत होती. हसत होती. छानच होती. खरेतर ती ठेंगणी नव्हतीच पण उगाच बोलायची एक पद्धत. तिला पाहिले नि माझा कंटाळा क्षणार्धात दूर झाला. आता माझ्या लग्नघरात असण्याला प्रयोजन मिळाले होते. मला उगाच पेपरात वाचलेला ह. भ. प. बाळकृष्णबुवा पांगारकरांचा उपदेश आठवला.. बुवा म्हणाले होते, 'मनुजा, जीवनाचे प्रयोजन काय.. ते प्रथम शोध. निरूद्देश भटकू नकोस कारण तसे भटकताना तुला आयुष्य नीरस आणि कंटाळवाणे वाटू लागेल. पण जीवनाचे उद्दिष्ट ठरवले की मग हेच आयुष्य मंजुळ गाण्यासारखे सुमधुर भासू लागते. मनुजा, आयुष्यात

उद्दिष्ट ठरव आणि मगच तुझी प्रगतीपथावर वाटचाल होईल!' आजवर मी हे हसण्यावारी नेलेले पण इंग्रजीत मोमेंट ऑफ ट्रूथ म्हणतात ते याबद्दलच असावे. आता मला जीवनाचा उद्देश सापडला.. ती दिसली.. ती कोण आहे यापासून सुरूवात खरी पण ती या लग्नघरातीलच असणार.. त्यामुळे सापडेलच. आता माझ्या इथे असण्यासही अर्थ आला. पण फर्स्ट इंप्रेशन इज लास्ट इंप्रेशन म्हणतात.. ते तसे खरेच ठरू नये म्हणून प्रथम आपला अवतार सुधारला पाहिजे. नशीब मी नको नको म्हणत असताना आईने माझे काही चांगले टी शर्ट टाकले होते सामानात. कुणाच्या ध्यानात येऊ नये अशा बेताने मी दरवाजामागे उभा होतो. ती बोलत होती.. बोलता बोलता हसत होती.. आणि मध्येच आपल्या ओढणीशी खेळत होती. इकडे मी वेडापिसा उभा होतो. आता तयार होऊन यावे आणि ही निघून गेली तर? आणि हिला शोधू तर कुठल्या नावे? मी मनातल्या मनात तिचे नाव काय असावे याची कल्पना करू लागलो.. तिचे एकच नाव सुचले मला.. नक्षत्रा! आता तिच्याशी ओळख होईपर्यंत हेच नाव वापरेन मी! नक्षत्रा! वा! छान आहे नाव. इकडे आई बहुधा जाण्याच्या बेतात असावी. नक्षत्रा तिला हसून काही बोलली. वा!

पुढे मात्र माझ्या पाठीत धपाटा पडला. तो हात दिन्याकाकाचा होता! "काय रे.. इथे काय करतोयस?"

इथे मला एक तात्विक आणि सात्विक प्रश्न पडलाय तो विचारून टाकतो. म्हणजे बघा मोठमोठे महात्मे होऊन गेले.. सत्य हेच सर्वात श्रेष्ठ असे काहीबाही सत्य सांगणारे. सत्यमेव जयते पण म्हणून गेले. तर आता या इथे मी ते सत्याचे प्रयोग करावेत का? म्हणजे काकाला सरळ सांगून टाकावे.. 'ती जी सुकांत सुहास्य वदना अनामिका आहे.. पहाताच ती रम्य बाला.. कलिजा खलास झाला.. तिला पाहतोय.. आणि मनात मांडे खातोय..' असला रोखठोक कारभार मी करावा की नाही सत्यास स्मरून? पण माझे मन तसे हुशारीने वागले.. अशा प्रेमात चोरटेपणा आपसूक येतोच म्हणे. म्हणजे सत्याचा बट्ट्याबोळ! असू देत. युद्धात आणि प्रेमात सारेच क्षम्य.. तर हे असत्यकथन त्यातच मोडले पाहिजे. मी माझ्या मनाचेच ऐकले आणि म्हणालो, “काही नाही काका चाललो होतो बाहेर, पाय मोकळे करायला?”

“हा असा?”

माझ्या अवताराकडे पाहात तो म्हणाला. म्हणजे माझे माझ्याच कपड्यांबद्दलचे स्वयं मूल्यमापन बरोबर होते. काकाशी बोलण्यात वेळ दवडणे आता योग्य ही नव्हते नि धोक्याचेही होते. नक्षत्रा कुठल्याही क्षणी बाहेर आली तर काका माझी डायरेक्ट ओळखबिळख करून द्यायचा..

मी बाहेरच्च्या चपलांतील तरूणींच्या अशाव्यात अशांची नोंद मनात केली. काकाला 'अरे तिकडे काहीतरी विसरलो' म्हणून मागच्या बाजूस सटकलो.. पाठच्या दरवाजातून आत शिरताना ती नक्षत्रा पुढे येऊन ठाकेल याची काय कल्पना? मी त्या चेक्स च्या लुंगीबद्दल त्या क्षणी तडकाफडकी निर्णय घेऊन टाकला.. 'या नंतर चेक्सच्च्या लुंग्या बाद.. नाही.. लुंग्याच बाद.. मनातल्या मनात मी शपथ घेतली, यापुढे स्मार्ट राहिन आणि स्मार्ट दिसेन.. अगदी झोपतानाही, म्हणजे झोपेतून उठताना ती समोर आली तर.. सो, नो मोअर लुंगीस ..'

आणि तिच्याकडे पाहून न पाहता सटकलो.

मुली किती हुशार असतात पहा.. पुढची गोष्ट ही.. पण एकदा तिने माझ्यासाठी मुद्दाम चेक्सची लुंगी आणली.. खास भेट म्हणून.. देताना म्हणाली.. 'लाजू नकोस.. घाल.. यातच तर तुला मी पहिल्यांदा पाहिलेले..' तर ही अशी लबाड हे मला खूप नंतर कळाले.. खरे सांगू तर मी स्वतःला बावळट स्मार्ट समजत होतो.. आणि ही तर अती हुशार लबाड होती!

५

## धागे आणि दोरे

लुंगीत मी लुंगासुंगा वाटलो असेन का तिला? असेल.. जे व्हायचे ते होऊन गेलेले. त्यात करण्यासारखे आता काही नव्हते. आता फक्त स्मार्ट होणे आवश्यक. मी पटकन वर जाऊन कपडे बदलले. होता होईल तो स्मार्ट झालो नि बाहेर आलो. पण मी बाहेर येईतोवर नक्षत्रा निघून गेलेली. म्हणजे दरवाजा बाहेरच्या चपला नाहीशा झालेल्या. परत त्या येतील की नाही कुणास ठाऊक. आता करावे तर काय करावे?

मी वाचलेली सारी डिटेक्टिव्ह पुस्तके मनात जागी झाली. माहिती काढण्याच्या पद्धती असतात. माहिती देणाऱ्यास आपण माहिती देत आहोत हेच माहिती नसावे अशा काही! एखादा डिटेक्टिव्ह धनंजय जणू संचारला माझ्यात. आता आईकडूनच मिळतील डिटेल्स. मी कामाला लागलो.

समोर आई होतीच, तिला साळसूदपणे विचारले,“आई गं, कोण कोण आले गं दुपारी? किती तो आवाज?”

माझ्या मुख्य प्रश्नास बगल देत ती म्हणाली, “लग्नघरी धांदल असायचीच. इतकाही माणूसघाणेपणा बरा नव्हे बरं!”

माझे हे असेच. आवाजाबद्दलचा दुसरा प्रश्न नसता विचारला तर कदाचित पहिल्याचे उत्तर मिळाले असते की नाही? पण नाही.. उगाच काहीतरी लांबण लावायची सवय आहे मला. पण आता या पुढे अगदी टू द पॉईंट.. मी निर्णय घेऊन टाकला. माझे निर्णय असेच तडकाफडकी होतात!

“नाही पण कोण कोण आले गं..” मी दुसरा खडा टाकला.

“अरे येणार.. सगळीकडून येतात लोक. त्यात हे दिन्याकाकाच्या घरी पहिलेच लग्न.”

गंमत म्हणजे आई पण दिन्याला काकाच म्हणते! हा खडापण वायाच जायचा.

"नाही पण माझ्या ओळखीचे कुणी आले का?" तिसरा खडा माझा. त्याने मात्र थोडाफार निशाणा साधला मी. कारण आई म्हणाली,“अरे तिकडून अमेरिकेतून आलेत काही..”

“कोण गं..?”

“तुला काय.. आहेत रमाकाकूच्या माहेरच्या. तिकडे अमेरिकेत असतात. माझ्या मंगू मामाची ओळख निघाली!”

जग किती छोटे आहे नाही? म्हणजे आई त्या नक्षत्राशी बोलत होती ते काही याबद्दल असावे तर! आईच्या माहेरची ओळख म्हणजे इतक्या गप्पा तर हव्यातच! मला धागा व्यवस्थित सापडला. आता कल्पनाविस्तार करावा म्हणून मी काही म्हणणार तोच आई म्हणाली.. "तू बस टिवल्याबावल्या करत.. मी जाते काकूला मदत करायला."

असे म्हणून आई निघून गेली.

काही असो.. हे सगळे लोक रहाणार.. अमेरिकेतून जाऊन येऊन तर नाही अटेंड करणार लग्न.. एवढी कन्फर्म माहिती मिळाली मला. त्यातल्यात्यात तेवढाच दिलासा. तेव्हा आता त्यांची वाट पाहाणे आले. पण मला कामाचा पुळका आला नि आई पाठोपाठ मीही निघालो..

"काही काम असेल तर सांग.. बसल्याबसल्या कंटाळलो.."

या माझ्या प्रस्तावात थोडा धोका होता. पण धोका पत्करल्यावाचून थोडीच होतात मोठी कामे? आईने दळण वगैरे आणायला पाठवले तर.. कल्पना करा.. मी चक्कीत उभा.. केस पांढरे झालेत पिठाने. मग त्या पिशव्या उचलून मी येतोय.. माझी नवी जीन्स.. तिलाही पीठ लागलेय नि तिकडून नक्षत्रा येतेय..

आधी ती लुंगी आणि आता हे असे.. बाप रे! असे काही होऊ नये म्हणून म्हणालो, "काकू साधेच असेल असे काही काम द्या.."

"वा! स्वयंपाकखोलीत आलीय स्वारी.. चांगलेय.. पण माझा अनुभव सांगते तुला प्रमिला.. असे होते ना तर समजावे जरूर काहीतरी भानगड आहे!"

प्रमिला म्हणजे माझी आई.. आणि रमाकाकू तर चांगलीच स्मार्ट निघाली!

"जा ना.. मदत करायला आलो तर.."

मी मानभावीपणे म्हणालो खरा पण माझ्या अशा कामाची हौस आईला चांगलीच ठाऊक होती! तरी ती गप्प राहिली. कदाचित बेनीफीट ऑफ डाऊट देत असावी! मग मी टेबलाशी बसून त्यांच्या गप्पांतून काही क्लु मिळण्याची वाट पाहात राहिलो. आईने सारे विषय काढले पण त्या अमेरिकन टुरिस्टांबद्दल काहीच नाही. पण रमाकाकूच म्हणाली, "बरं काय रे मोदका.."

मोदक हे माझे टोपणनाव! माझे खरे नाव आमोद.. "अरे ते अमेरिकन पाहुणे आलेत ना.. त्यांना एकदा घेऊन जा बाहेर फिरायला.."

माझ्या मनात लाडू फुटायचे बाकी होते. काकाच्या गाडीत बसवून सर्वांना मी शहर दर्शन घडवतोय.. नक्षत्रा माझ्या बाजूला

बसलीय.. वा! इथे मी मागतोय एक डोळा.. खरेतर मी काहीच मागत नव्हतो अजून.. आणि डायरेक्ट दोन डोळे तेही अगदी रेबॅन गॉगल सकट मिळतायत मला. हा क्षण मला सोडायचा नव्हता. मी तो धागा पकडून म्हणालो, "कोण कोण आहेत गं काकू?"

"कोण कोण काय.. चौघे आहेत.. त्यातले मिस्टर बुरकुले कसले येताहेत.. राहिल्या मिसेस बुरकुले.. वैदेही आणि कृत्तिका. मिसेस बुरकुले आल्या तर ठीक, नाहीतर दोघींना जा घेऊन"

वा! काय काम आहे! आणि दोघी म्हणजे कृत्तिका आणि वैदेही.. म्हणजे दोघींपैकी एक नक्षत्रा! माझी! माझी? कशाला कशाचा नाही पत्ता आणि लागले गुडघ्यास बाशिंग बांधायला. असो.. प्रगती चांगली आहे. आणि उद्या खरेच गेलो आम्ही तर काय..?आईशी बोलत होती ती कोण.. हा प्रश्न अगदी जीभेच्या टोकावर आलेला.. पण तो मी कष्टाने आत ढकलला. म्हणजे गिळून टाकला. ती नक्षत्रा म्हणजे वैदेही किंवा कृत्तिका असावी.. इतपत माहिती मिळाली. माझ्यातल्या डिटेक्टिव्हने इथवर हुशारीने काढली माहिती. पण त्यावर समाधान न होता मी म्हणालो,

"म्हणजे काकू, बुरकुलेंना दोन मुली? शाळेत जातात का?"

हा शेवटचा माझा खास गुगली! म्हणजे दोघांची वये नि माहिती काढण्यासाठी. माझ्या या प्रश्नावर मी खूश झालो. पण

तितक्यात काका आला आणि संभाषणाच्या गाडीने रूळ बदलले. काका पुढे जे काही म्हणाला त्यातून एवढेच झाले की दुसऱ्या दिवशी गाडीतून शहर दर्शनाचा बेत रद्द करावा लागला. तरीही मी मनात म्हणालो, हे ही नसे थोडके. गाडी परत त्या बुरकुले कन्यांच्या विषयावर आणणे आता कठीण होते. मी अर्थात विसरलो नव्हतो पण मुद्दाम विषय काढणार कसा? पण चार एक तासांत मी बऱ्यापैकी माहिती काढली होती. वै किंवा कृ.. माझे भविष्य. चांगलेय!

रात्र झाली तरी ते बुरकुले कुटुंबीय परत आले नव्हते. त्यांची चौकशी करणार कशी?

रमाकाकू एकटीच आहे हे पाहून मी तिला म्हटले, “काकू अजून कोण कोण येणार आहेत गं..” रमाकाकूने यादी वाचल्यासारखी नावे सांगितली. मोठा इंटरेस्ट असल्यासारखे मी ते ऐकून घेतले.. आणि पुढचा प्रश्न टाकला, “काकू ते बुरकुले आलेले दिसत नाहीत अजून?”

“अरे येतील. काय आहे गेलेत एका नातेवाईकांकडे. ते काय जेवल्याशिवाय सोडतात?”

“त्यांच्या मुली तिथल्याच शाळेत असतील ना?”

माझा हा या ओव्हरमधला गुगली. रमाकाकू यावर हसू लागली. म्हणाली, “शाळेत..? मोठी आहे वैदेही.. कॉलेज पण पूर्ण झालेय.. चांगली डॉक्टर आहे तुझ्यासारखीच. आणि दुसरी तिची मैत्रीण कृत्तिका.. दोघी फास्ट फ्रेंड्स..”

आता आली पंचाईत! दोघींपैकी एकच बुरकुले.. दुसरी नॉन बुरकुले.. पण मी पाहिलेली कोण? कोण जाणे. ते शोधून काढायला काय प्रश्न विचारावा न कळून मी गप्प राहिलो. बघू. अजून लागतीलच हाती धागे नि दोरे! 'पोलिसतपास सुरू आहे' एवढे बातमीच्या शेवटी वाक्य घालून मी गच्चीवरच्या झोपाळ्यात जाऊन बसलो. एकटाच. आई आणि काकू काहीतरी करत बसलेल्या. बाबा नि काका लग्नाच्या पुढच्या प्लॅनिंगबद्दल बोलत बसलेले. बुरकुल्यांचा पत्ता नाही अजून. मी झोपाळ्यावर जाऊन आकाशातले तारे मोजत दिवसाचा हिशेब लावत पहुडलो. किती वेळ गेला पत्ता नाही. डोळा लागला असावा माझा.

६

## 'ती'चे मराठी!

रात्री खूप विचार करता करता डोळा लागला असणार माझा. कालचा पहिलाच दिवस इकडचा. तसा तो संमिश्र गेला. खरेतर संध्याकाळपर्यंत वायाच गेलेला तो. संध्याकाळ नंतर मात्र अचानक जीव आला जणू त्यात.. 'वो कौन थी?' चा विचार करत डोळा लागलेला माझा. आणि सकाळी उठलो तर माझ्या अंगावर कुणी शाल पांघरून टाकलेली.

मी शाल बाजूला सारली.. नि माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसेना. चक्क एक मुलगी माझ्या समोर बसली होती. माझ्या आजूबाजूला अजून कुणी नव्हते. माझ्या छातीत धडधडू लागले.. ही कोण? ही ती नक्षत्रा नव्हती. मग ही कोण असेल? वैदेही की कृत्तिका? त्यापैकीच असणार कुणी. कारण अजून कुणी पाहुणे पोहोचले तर नव्हते. कुणीही असो, हिला त्या दुसरीबद्दल विचारले तर चालेल? मी गोंधळून गेलो. बावचळणे यालाच म्हणत असावेत.

“काय मग.. झोप? अगदी छान? थेट नीले नीले अंबर के नीचे..”

“हो ना.. तुम्ही?”

“तुम्ही काय.. तू म्हण.. मी कृत्तिका.. वैदेहीची सख्खी मैत्रीण!”

“वा!” जणू वैदेही कोण हे मला माहितीच होते! या 'वा' ला काही अर्थ नव्हता, पण मी अजून काय बोलणार होतो?

“काल आम्हाला यायला वेळ लागला. तू ढाराढूर झोपून गेलेलास.. वैदेही आलेली वर बघायला.”

माझ्या छातीत धडधडू लागले. हृदयाचे ठोके वाढण्याची अनेक कारणे वाचलेली आमच्या डेव्हिडसनच्या मेडिसीनच्या टेक्स्टबुकात पण त्यात थिंकींग ऑफ अ गर्ल किंवा गर्लफ्रेंड हे कुठेच नव्हते! एवीतेवी पुस्तकीच ज्ञान ते. म्हणजे काल मी झोपलो तेव्हा ती स्वप्नसुंदरी माझ्याजवळ प्रत्यक्षात येऊन गेली? याचि देही बंद डोळा मला नाही दिसली ती? या झोपेबद्दल मला अत्यंत वाईट वाटले. ही निद्रा अशीच. आणि ही शाल.. डोन्ट टेल मी.. वैदेहीने आणून.. माझा खयाली पतंग उंच उडू लागला. कृत्तिका काही बोलत होती त्याकडे माझे लक्ष नव्हते. मला खरेतर विचारायचे होते.. वैदेही कुठेय.. पण म्हणालो, "वैदेही म्हणजे?"

"वैदेही म्हणजे? कोण ती हे विचारतोस की शब्दार्थ?"

ही कृत्तिका जरा जास्तच स्मार्ट दिसतेय..

"सांगेन मग.. लवकर ये खाली." म्हणत कृत्तिका निघून गेली.

मी थोडावेळ तसाच बसून राहिलो. रात्री काही घडले ते पचवत बसलो. मी झोपलेलो इथे आणि वैदेही जवळ बसलेली.. काय ती झोप.. यापुढे कधी झोपायचेच नाही.. मी तडकाफडकी निर्णय घेऊन टाकला!

खाली आलो. आज संध्याकाळी गावचे कुणी पाहुणे यायचे होते. रात्री अजून कुणी. घर भरून जाणार होते. भरलेले घर बरे की रिकामे? म्हणजे वैदेही भरल्या घरात भेटली तर कुणाच्या ध्यानात येणार नाही.. पण रिकाम्या घरात ती भेटण्याच्या संधी वाढतील.. अशा विचारात असताना समोर कृत्तिका आणि बुरकुले बाई बसलेल्या दिसल्या. मिसेस बुरकुले म्हणजे वैदेहीची आई म्हणून सांगण्याची गरज पडू नये अशा. गोऱ्यापान आणि सुंदर. म्हटले उगाच नाही वैदेही अशी! अर्थात सुंदर असण्यासाठी गोरेपणा हवा हे मला तेव्हाही नव्हते वाटत नि पटत नि आता ही. पण त्या दोघी तशा होत्या हे मात्र खरे.

मी झटपट तयार होऊन यावे म्हणून निघालो.. तो नाईट ड्रेसमध्ये.. घाईघाईत जाताना समोर ती! म्हणजे वैदेही! फर्स्ट काय, सेकंड इंप्रेशन पण असे! माझ्या छातीत धडधडू लागले परत. पण तरीही मी लक्ष नसल्याचे दाखवत झटक्यात पुढे गेलो.. म्हटले तयार होऊनच येऊ. पोटात बाकबुक होत होती. इकडे मी तयार होत होतो आणि सगळे ध्यान खाली काय चालू असेल याकडे होते.

तयार होऊन आलो तर वैदेही समोरच बसलेली. बाजूला तिची आई. कृत्तिका नव्हती. रमाकाकू माझ्या आईने बनवलेले पोहे वाढत होती. आई पोहे मस्त बनवते.

“अरे हा आला बघ मोदक.. येरे..”

काकू बोलली. मी पुढे आलो. अगदी वैदेहीसमोर. काकूने तिच्या समोर तरी मला मोदक म्हटले नसते तर चालले असते.

“अरे तुझी ओळख करून द्यायची राहिली.”

त्या बुरकुले कुटुंबातल्या बाकी सदस्यांबद्दल काकू काय बोलली कुणास ठाऊक.. अर्जुनाला पक्ष्याचा डोळा दिसावा तसे माझे लक्ष्य एकच होते.. ती म्हणजे वैदेही! वैदेहीची ओळख करून देताना काकू बोलत होती. माझ्या कानात शिरणारे शब्द मेंदूत मात्र शिरत नव्हते..

माझी ओळख करून देताना काकू म्हणाली, “हा डॉक्टर मोदक.. म्हणजे आमोद. लाडाने मोदक म्हणतो आम्ही..”

यावर ती खुदुखुदू हसली. का कोण जाणे तिला ते माहिती असावे असे वाटले मला.

“हाय.. सॉ यू यस्टरडे..” ती म्हणाली.

म्हणजे काल लुंगीतल्या अवताराबद्दल म्हणतेय ही की रात्री शाल पांघरायला आली त्याबद्दल?

रमाकाकू म्हणाली, “अरे हिला मराठी थोडेफारच येते..”

“बॉर्न ॲंड ब्रॉट अप देअर.. बट आय लाईक मराथी.. इन फॅक्ट आय वॉन्ना लर्न मराथी..”

मराठीतल्या ठी चा थी केला हिने. पण ते बोलताना पण तिची मोहक मुद्रा मी बघत होतो. काल आईशी इंग्लिशमध्ये काय बोलली असेल ही?

“आय अंडरस्टॅंड फुल्ली.. पन बोल्ता नाही येते..”

ती तोडक्यामोडक्या भाषेत बोल्ली! ते शब्दही कानाला गोड वाटले. वा! किती गुलाबजाम सारखे पाकात घोळलेले शब्द.. गोडवा शब्दाशब्दात भरून उरलेला. पाकच म्हणायचा तर तशी जिलबीची पण उपमा देता आली असती. पण आधीच गुलाबजाम म्हटल्याने नाईलाज आहे. तर मी त्या गोड शब्दांमुळे संमोहित

झालो हे खरे. पुढे काय काय झाले.. गॉड नोज! आम्ही बराच वेळ तिथे बसून होतो. वैदेहीपण आपल्या तोडक्या मोडक्या मराठीत बोलत होती. आणि गंमत म्हणजे अमेरिका रिटर्न्ड असल्याने असावे पण तिच्या त्या मराठीचे साऱ्यांनाच कौतुक वाटत होते. मी तर तिला मराठी शिकवून तिच्या मराथीपणातून बाहेर काढायला एका पायावर तयार होतो. अगदी रीतसर मराठीचे क्लासेस घेईन हवेतर!

शी लाईक्स मराथी.. अँड आय लाईक हर! शिकवून टाकेन की! आहे काय नि नाही काय! नाहीतरी लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी .. नाही का?

७

## रूम फॉर द इंडियन ग्रूम!

दिवसाची सुरूवात तर छानच झाली. चक्क तिच्यासमोर बसून आणि काही बोलणेही झालेले. अर्थात माझा वेंधळेपणा काही कमी झाला नव्हता..  पोहे खाताना मी ते थोडेफार सांडलेच. पण नेहमीच्या वेंधळेपणापेक्षा हा वेंधळेपणा वेगळा होता! एरव्ही वेंधळेपणा करत असे मी पण त्याला अंगभूत वेंधळेपणाच कारणीभूत होता. पण आताच्या या वेंधळेपणाला काही कारण होते.. खरेतर कार्यकारण भाव होता! कारण प्रत्यक्ष ती समोर बसून पाहात होती माझ्याकडे! पोहे सांडले खरे पण फक्त ते  सांडताना वैदेहीचे लक्ष नसावे याचेच समाधान तेव्हा वाटले. तेव्हा म्हटले मी कारण पुढे तिने या पोहे सांडण्याचाही उल्लेख केव्हातरी केलाच. तिचे असे लक्ष होते बारकाईने माझ्याकडे तर!

गप्पा झाल्या आमच्या. खाणे झाले. मी आधीच तयार होऊन आलेला होतो. काकूला म्हणालो, “कुठे जायचे असेल तर मी मोकळाच आहे!”

या अमेरिकी पाहुण्यांना फिरायला घेऊन जाण्याबद्दल मी विचारत होतो पण काकूने धोबीपछाड घातला.. म्हणाली, “अहो.. याला घेऊन जा. केळीची पानं नि विड्यावी पानं आणायला. पत्रावळ्या नि द्रोण पण आणा.. नीट बघून.”

आता आली पंचाईत. कुठे ही सुहास्यवदना सुकांत चंद्रानना आणि कुठे त्या सुक्या पत्रावळ्या. कुठून मी माझ्या पायावर धोंडा टाकला असे वाटले. पण काकाच म्हणाला, “त्यासाठी त्याचे काय काम. मी जाता जाता मठात जातो. मग आणतो.. स्वामींच्या पायावर पत्रिका वाहायची बाकी आहे. याला दर्शन घ्यायचे असेल त्या स्वामींचे तर येऊ देत..”

मी मान हलवून लगेच 'नको नको' म्हणालो.. मग हात हलवून 'नाही' म्हणालो.. त्यानंतर तोंडाने 'च्यक' आवाज करता करतानाच वैदेही म्हणाली, “क्यानाय कमलॉग अंकल?”

मी पस्तावलो. स्वाभाविकच होते ते. एका सेकंदात माझ्या तीन तीन नकारघंटा होकारात कशा बदलणार होतो मी? काकाचे काम शिस्तीचे. दहाच्या ठोक्याला निघणार तो. फक्त दोन मिनिटे बाकी होती.. म्हणाला, “ऑफकोर्स.. शुअर.. चल बरोबर..”

पुढच्च्या दोन मिनिटांत दोघे शिस्तीत निघून गेले. हात चोळण्याव्यतिरिक्त माझ्या हाती आता काय होते? काका आता तासा दोन तासाशिवाय येत नाही.

वैतागून मी बागेतील झोपाळ्यावर जाऊन बसलो.

माझे आडाखे असे चुकत होते. तरी बरे आज दुसराच दिवस. अजून चार पाच दिवस बाकी होते.. कंटाळून मी मुक्काम दुसऱ्या घरातल्या व्हरांड्यात हलवला. मला अध्यात्माची थोडी जरी गोडी असती तर आज अख्खे दोन तास तिच्याबरोबर काढता आले असते. पण आता वेळ निघून गेलेली. स्वामी म्हणतात ते सत्य.. उगाच गेलेल्या वेळाबद्दल पश्चात्ताप करण्यात काय हशील? हे स्वामी कोण? कोण जाणे. पण कुठल्याशा स्वामींनी म्हटलेच असणार हे. तेवढ्यात कृत्तिका वर आली. म्हणाली, “इथे काय करतोयस?”

उगाच इंप्रेशन पडावे म्हणून म्हणालो, “विचार, मनन आणि चिंतन..”

मी कसले.. खरेतर कोणाचे.. मनन नि चिंतन करत होतो हे मलाच ठाऊक होते.

“वा! भारीच तत्वचिंतक आहेस.. तू नाही गेलास वैदूबरोबर?”

माझ्या जखमेवर मीठ चोळत ती म्हणाली.

“नाही.. स्वामी लोकांचे मला वावडे आहे..”

“मला देखील.. पण वैदू आहे ना तिला इकडचे भारी आकर्षण! म्हणते इंडिया इज इंडिया.. जमले तर तिला परत यायचेय इथे.”

“हुं..”

माझ्या एका 'हुं' मध्ये माझा आनंद व्यक्त होत होता.. मला अमेरिकेचे आकर्षण कधी नव्हतेच.. वै बरोबर मला ही जावे लागले असते की नाही? हाच विचार ही कृत्तिका येण्याआधी माझ्या मनात होता. कशाचा कशाला पत्ता नाही पण हा विचार मात्र होता मनात आणि त्याचे अगदी रेडीमेड उत्तर मिळाले मला.. त्या स्वामींच्या कृपेनेच असेल.. बाय द वे.. चांगल्या डॉक्टर झालेल्या वैदेहीला ही कृत्तिका 'वैदू' काय म्हणतेय? मी तिला वै हे एकेरी एकाक्षरी संबोधन ठरवून टाकले.

"आणि तिला इंडियनच 'ग्रूम' हवा आहे.." कृत्तिका म्हणाली.. मला परत स्वामींच्या कृपेचा भास झाला.

"ओह! छान!"

माझ्या मनातल्या फुटणाऱ्या लाडवांचा आवाज बाहेर कृत्तिकाला ऐकू येऊ नये याची काळजी घेत मी म्हणालो. पुढे तिला

कसा मुलगा हवा आहे वगैरे माहिती काढणे या स्टेजला जरा कठीण होते. कदाचित मी तिला ते विचारलेही असते पण खालून वै च्या आईचे बोलावणे आले आणि कृत्तिका निघून गेली..

मी परत बसून राहिलो विचार करत नि कवितांचे शब्द जुळवत..

झिप झॅप झूम
झिप झॅप झूम
वॉव.. सम इंडियन ग्रूम!
धिस गर्ल जस वॉट्स इंडियन ग्रूम..
वॉव वॉव! आय कॅन सी द रूम..
झिप झॅप झूम

झिप झॅप झूम..
शूऽऽ
झिप झॅप झूम
ओ फूल, डोन्ट टॉक लाऊडली..
पाठीवर पडेल बुरकुल्यांचा ब्रूम..

मग ठोकावी लागेल

धूम धूम धूम!

असल्या काहीतरी ओळी जुळवीत बसलो.. मनाशीच! माझी पहिलीच कविता म्हणावी ही! प्रेम माणसाला कवी बनवते म्हणे. पण कवितेत असले ब्रूम नि झाडू अलाऊड असतात? असतील किंवा नसतील .. पण उत्स्फूर्त आतून येते तीच कविता म्हणे. मग त्यातले शब्द कसेही असोत. सच्चे शब्दच ते. मग माझ्या आतून हे असले झाडू वगैरे यावेत? नाही, काहीतरी नाजूक नि हळवे शब्द हवेत.. येणार कुठून? तरीही जमेल तितका शब्दजुळार करायलाच हवा.. केला मी.. शाब्दिक हातोडीने शब्दास शब्द जोडले मी!

ताक धूम धूम

ताक धूम धूम

शी विल बी माईन

लेट मी नॉट अ‍ॅझुम

हवा इंडियन तिला

तर दिसेन मी
न करताच झूम
वॉव सम इंडियन ग्रूम!

गोड किती ती
जणू श्रीखंड जिलबी
गुलाब जामुन
प्यार है फिरभी
गोड गोडातही मजला
आवडते मशरूम
वॉव सम इंडियन ग्रूम!

मोस्ट एलिजिबल
मीच तर बॅचलर
प्रेम युनिव्हर्सिटीचा
मी व्हाइस चॅन्सलर
मी नसेन तर कोण असेल?

होईल सगळीकडे सामसूम
वॉव सम इंडियन ग्रूम!

ताक धूम धूम
ताक धूम धूम

वा! काय आशावादी प्रेमकविता लिहिली मी! मीच माझ्यावर खूष झालो. आणि मी इंडियन, स्वप्नात रंगलो इंडियन ग्रूमच्या!

८

## देवाची करणी आणि बागेत पाणी

कविता करणे संपवून मी उठलो नि काहीतरी करावे म्हणून फिरू लागलो इकडे तिकडे. पण आज किंवा आजवर जे झालंय त्याचा विचार काही मनातून जाईना. एक दोन दिवसात एवढा बदल होऊ शकतो? दुनिया बदल गई वगैरे गाणे गातात ना, त्याचा अनुभव घेत होतो. पण एकूण माझा विश्वास बसणार नाही असेच घडत होते आतापर्यंत. त्यात

लग्नघरात लाडवांची कमतरता नसते. हवे तितके खा बुंदीचे लाडू. आजवर जे झाले त्यामुळे माझ्या मनातही असेच खूप सारे लाडू फुटत होते. सारे संकेत इथे अनुकूल दिसत होते. शेवटी काय योग म्हणावा! मी इथे येतो काय आणि ही वै भेटते काय. आणि तिला इथेच भारतात अमेरिका सोडून यायचे आहे काय! आणि वर तिला अगदी भारतीय वर हवा आहे काय! योगायोग पण असे योगायोगानेच घडतात! म्हणजे एकूण हे जमायला हवे!

आणि सगळयात मोठी गोष्ट म्हणजे त्यादिवशी बागेत संध्याकाळी वै भेटली मला!

म्हणजे संध्याकाळपर्यंत अजून पाहुणे येऊन पोहोचले. त्यांची गडबड होती. इकडतिकडच्या गप्पा मारत होते सारे. आता घर भरलेले होते. पण माझे लक्ष लागेल तर ना? मनात वै चे विचार. उगाच कुणाशी बोलण्याचा कंटाळा आला मला. त्यात सकाळच्या हुकलेल्या संधीबद्दल अजून मी चुकचुकत होतो. थोडा बोलण्यातला शब्द क्रम बदलला असता तर दिवसाचे चित्र बदलले असते. अर्थात त्या इंडियन ग्रूम बद्दलची अनमोल माहिती या वेळात मला मिळाली हा एक फायदा! सकाळी गेलेला काका दुपारी केव्हा तरी आलेला परत. वै आली, पण वर तिच्या खोलीत निघून गेली. तिला पाहिले मी, पण बोलणे काहीच झाले नाही माझे. त्याची हुरहूर आणखी ॲड झाली. तेव्हा या सर्वांवर उतारा म्हणून मी बागेत निघून आलो. तेही मागच्या बाजूस.. जिथे वर्दळ नसेल.. एकट्यानेच विचार करण्यासाठी. पण त्या बाजूलाच वै च्या खोलीची खिडकी असेल असा मात्र अंदाज नव्हता मला..

मी झाडाच्या पानांकडे पाहात होतो. फुलांकडे पाहता पाहता उगाच बागेतल्या फुलांवरची हिंदी सिनेमातली प्रेमगाणी आठवत

होतो. फूल आणि फुलपाखरू जुन्या सिनेमावाल्यांचे लाडके. ते एक एक आठवत, बागेतली झाडे पाहत फिरता फिरता मला आयडिया सुचली. जवळच नळी होती. बागेतील नळाला ती लावून मी झाडांना पाणी घालू लागलो. आमच्या घरी असली बाग नाही नि असे पाणी घालणेही नाही. नळीने बागेतील झाडांना पाणी घालता घालता ती झाडे एकदम ताजीतवानी झाल्यासारखी दिसत होती. नळीने पाण्याचे फवारे उडवत होतो नि थोड्याच वेळात वरून आवाज आला.. तिचा.. होय वै चाच!

"मोडक, यू देअर? आयॅम कमिंग.."

तिच्या तोंडी मी मोदकाचा मोडक झालो! माझ्या छातीची धडधड वाढली. तिच्याशी काय बोलावे याचा विचार करेपर्यंत ती पाठच्या जिन्याने धावत पोहोचली देखील. पण ती पोहोचेपर्यंत तेवढ्यातल्या तेवढ्यात माझ्या मनात विचार आला.. सिनेमा असता तर हा.. मग ही या पाण्यात भिजली असती चिंब.. मग एखादे गाणे.. मग.. जाऊ देत.. असले स्वप्नरंजन त्या सिनेमा-वाल्यांनाच परवडते. तोवर ती पोहोचलीच. काही असो, पण ती स्वतःहून आली हे ही काही स्वप्नाहून वेगळे नव्हते.

येता येता म्हणाली, "वॉव.. आय लाइक वॉटरिंग द प्लांट्स.."

माझ्या हातून नळी घेत ती पाणी घालू लागली..

मी काही न सुचून उभा होतो. बोलण्यासारखे खूप होते पण तोंडून शब्द फुटेल तर.. मी तिच्याकडे पाहात होतो नि ती लहान मुलीसारख्या उत्साहाने झाडांना पाणी घालत होती. ती हिरवीगार पाने अजून हिरवी नि ताजी दिसत होती. पाणी घालता घालता अचानक ती म्हणाली..

“मोडक टेल मी वन थिंग, व्हाय डिड यू अव्हॉइड मी?”

तिच्या या प्रश्नाची अपेक्षा नव्हती मला. मी मारे स्वतःला गुगली टाकणारा समजत होतो.. हिने पहिल्याच वाक्यात बाऊन्सर टाकला..

“मी?”

काय गंमत आहे ना? हा मी मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषेत एकाच अर्थाने येतो!

“यस्स.. यू रॅन अवे इन द इव्हिनिंग यस्टरडे.. अँड टुडे मॉर्निंग..”

“नो .. नो..”

मला इंग्लिश येत नाही असे नाही पण आता बोलायला माझी जीभ अडखळत होती. काहीतरी बोलावे म्हणून मी म्हणालो.. “काही नाही गं.. जरा गबाळग्रंथी कारभार सुधारायला गेलो घाईघाईत.”

तिला एवढे मराठी पचणार नाही माहिती असल्याने मी बिनधास्त बोलून गेलो.. मग भाषांतर केल्यासारखे म्हणालो.. “यू नो आय वॉज इन अ हरी.. इफ आय डोण्ट मेक इट इन टाइम यू पीपल विल फिनिश द होल ब्रेकफास्ट अँड आय विल हॅव टू फास्ट.. सो हॅड टू कम फास्ट!”

माझ्या उत्तरावर मीच खूष झालो. म्हणजे मला हे लगेच सुचले म्हणून. त्यात मूळ प्रश्नाला बगल मिळत होती नि थोडेफार विनोदीही होते ते उत्तर. म्हणून मी हसत हसत बोललो तशी ती पण हसू लागली. तिचे हसणे, दात खरेतर सगळेच फार सुंदर होते.. खरेतर ती इतकी छान दिसत होती ना की तिला माझीच नजर लागण्याची भीती वाटत होती मलाच.

ते काही क्षण मंतरलेले असल्यासारखे वाटत होते मला. मी भारावून गप्प होतो. खरेतर देवाने छप्पर फाडके संधी दिलेली. तोंडी परिक्षेस तोंड देणे मला नेहमीच अवघड जाई.. तेव्हा हे माझ्यासाठी अनपेक्षित नव्हते. फक्त मला भीती होती.. ‘व्हाय ॲम आय अव्हॉयडिंग’ सारखे मी न बोलल्याने तिचे गैरसमज तर नाही होणार..

एकाएकी काही सुचून मी म्हणालो, “सो हाऊ डू यू फाइण्ड इंडिया..”

“नाईस.. यू नो आय लाईक इट हिअर.. देअर इज रियल लाईफ आऊट हिअर.. पीपल आर सो कॉर्डियल अ‍ॅंड नो फॉर्मल रिलेशन्स.. सो गुड..”

“या.. आय नो.. इव्हन आय अ‍ॅम फॉंड ऑफ धिस..”

अजून असेच काहीबाही बोलत राहिलो आम्ही. ती खरेच हुशार होती आणि बोलण्यात चतुर. पण मी श्रोता म्हणून तसा हुशारच होतो!

९

## सुंदर फुलाशी गप्पा

तो अर्धा तास स्वप्नात रंगल्यासारखा होता.

झाडांना पाणी घालता घालता गप्पा.. वै आणि मी. आमच्या गप्पा कशाबद्दल व्हाव्यात? आम्ही काहीबाही बोलत होतो.. पण त्यात तिला माझा वेंधळेपणाच जास्त दिसावा असे माझे बोलणे असावे असे माझे मलाच वाटत होते. पण मन ही मन में लड्डू फुटण्याचा आवाज येत असताना मी अजून करणार तरी काय होतो?

उगाच विषय काढायचा म्हणून म्हणालो मी, "काय म्हणाले काल स्वामी?"

"ओह! स्वामी! ही लुक्ड लाईक अ डिव्हाईन सोल. म्हंजे माला आवडला स्वामी अँड आश्रम. तशी माझा फेथ नाही स्वामी आणि बाबाजीवर. बट इट वॉज नाईस टू बी विथ दिनकर."

ही युएस मधली पद्धत. कितीही मोठा असला तरी माणसाला नावाने डायरेक्ट हाक मारतात हे लोक.

"यू नो ही टोल्ड मी सो मेनी स्टोरीज .. बाबाजीस स्टोरीज. त्यांचा अन्भव कसा होता सिन्स सो मेनी इयर्स. मी आइकली सगळं. मला सगळं नाही अ‍ॅग्री. बट इट्स ओके."

आमच्या गप्पा या विरक्त आध्यात्मिक स्वामीबद्दल होणार की काय? प्रिचिंग्स अँड टिचिंग्स ऑफ द ग्रेट जगदुरू जगदाळे? काही असो, ती बोलत होती आणि संभाषणाला दुसरे वळण द्यावे यासाठी मला काहीच सुचत नव्हते. मी श्रोत्याचे काम करण्याचे ठरवले. खरेतर हे ही किती आणि कसे धोकादायक होते हे मला नंतर समजले. पण समोर स्वप्नवत सारे सुरू असताना मला बोलायला सुचावे हे कठीणच नव्हते का?

"तू काय नाही आला काल. इट वुड हॅव बीन नाइस."

ती बोलली हे आणि माझ्या छातीतली धडधड तिला ऐकू जाते की काय असे वाटायला लागले मला.

"तसं नाही गं. बट आय डोण्ट बिलिव्ह इन ऑल धिस.." मी उगाच बचाव केला. खरी गोष्ट मलाच ठाऊक होती. कालचे ते लगेच शब्द मागे घेता आले असते तेव्हा तर मी तिच्याबरोबर त्या स्वामींच्या आश्रमात दोन तास काय दोन दिवस ही जायला तयार होतो.

"मोडक, आय लाइक इट हियर. माला इक्डे खूप खूप आवड्ते. इक्डे म्हंजे इंड्यात. तुला?"

यावर मी काय बोलणार? मला ती जिथे तिथे आवडेल.. अगदी आफ्रिकेतल्या नामिबियात की चाड नामक देशात का असेना! पण हे काही मी बोललो नाही. म्हणालो, "ऑफकोर्स. आय लाईक इट हियर."

"पन तू माला काल अव्हॉइड करून का पळाला ते नाही सांगलं माला."

"मी? व्हेन?"

"व्हेन? इव्हिनिंग .."

"ते..? ओह! म्हणजे दॅट वॉज इन व्हेन..!"

मनातल्या मनात शेवटचा भाग म्हटला मी.. म्हणजे तिने त्या लुंगीत म्हणजे पाहिलेच मला. आता मीच तिला पाहिले नाही सांगावे का? तिच्यासारख्या सुंदरीस न पाहता मी निघून जाण्याइतका अरसिक तर नाही वाटणार तिला? किंवा खरे सांगून टाकू? खरे हेच की ती मला आवडली, अगदी ॲट फर्स्ट साईट. तिला मी त्या अवतारात नि चौकडीच्या लुंगीत कसा आवडणार होतो? हे तिला सांगावे तर कसे?

"नथिंग वैदेही. अगं मी जस्ट झोपेतून उठून आलेलो. सो जरा झोपेत होतो ना.."

मी संपूर्ण सत्यही नाही नि असत्यही असे काही नरो वा कुंजरोवा पद्धतीने सांगितले तिला. त्यावर ती पुढे काहीच न बोलता म्हणाली,

"सो, व्हॉट्स फॉर पी.जी?"

हे सोपे होते. मेडिकल नि कॉलेजच्या गप्पा तशा सोप्या मारायला!

"ओह! आय लाइक नॉन क्लिनिकल ब्रांचेस. पॅथॉलॉजी. तू?"

"आय डीड रेडिओलॉजी. जस्ट ओव्हर. माला पण क्लिनिकल ब्रांच नाय आवडत."

"पण यू नो विथ सो मच इंटरव्हेंन्शन्स, रेडिओलॉजी नाऊ इज लाइक अ क्लिनिकल ब्रांच!" मी मध्येच इंटरव्हेन्शन करत म्हणालो.

"ट्रू. बट आय लाइक इट.."

"छान. मग पुढे काय प्लॅन्स?"

"पुढे? फ्युचर? हू नोज!" ती नोज म्हणजे नाक उडवत म्हणाली.

तिला इंडियन ग्रूमबद्दल विचारायची खरेतर योग्य वेळ होती ही.. मनातल्या मनात तिला मी विचारले ही, तुझी मैत्रीण सांगत होती तुला इंडियन नवरा हवा आहे म्हणून .. आणि तेही इथे राहणारा. एकदा मला ही चान्स देऊन बघ की! शेवटचा भाग मनातल्या मनात बोलणेही अजागळपणाचे होते हे खरे. पण त्याला काय इलाज होता?

तितक्यात तीच म्हणाली,

"इट्स सो नाइस हिअर. सगळं मोक्ळं मोक्ळं. सो मेनी पीपल अराउंड. माला हे आवडेल.."

"सो.. वेलकम.. टू इंडिया! अँड वुई इंडियन्स वुड बी हॅपी टू हॅव इट हिअर..!"

वाक्यात 'वुई इंडियन' च्या ऐवजी 'आय वुड बी हॅपी' म्हटले तर काय बिघडणार होते? आणि 'हिअर' च्या ऐवजी 'माय हाऊस'? पण नको तेव्हा माझी जीभ अडखळते. चिकटून बसावी तशी हलत नाही अजिबात, बोलायचे राहून जाते. एका स्पेसिफिक विधानाला असे जनरल विधान बनवत संधी वाया घालवणे कुणी माझ्याकडून शिकावे.

हे सारे होत असताना मी बागेतल्या फुलांकडे पाहात होतो. समोर फुललेला गुलाबांचा ताटवा, बाजूला पांढरा शुभ्र मोगरा नि सोनटक्का.. या सगळयांत जास्त सुंदर कोण? फुलं की वै? मी ठरवत होतो बघत बघत. आणि खरे फूल कुठले? ती की बागेतली फुले? हे मी तिला सांगू शकलो असतो का? खरेतर कधी सांगू शकेन? कितीतरी वेळ असा गेला.. पण काही क्षणच गेल्यासारखे वाटत होते. हे असेच सुरू रहावे असे वाटत होते.. त्यात वै म्हणाली,

"ओह! विल हॅव टू गो डियर.. आई वाट बगते .. विल सी यू अगेन. म्हंजे पुना भेटू. बाय" बाय म्हणून ती निघून गेली.

संध्याकाळी आम्ही असे बागेत फिरत होतो आणि आई वरून खिडकीतून पाहात होती.. याचा मला पत्ता देखील नव्हता..

१०

## माझी होशील का?

वै निघून गेली नि मी तसाच बसून राहिलो.. फुलांकडे पाहात. जवळ कुणी असते तर चिमटा काढून कन्फर्म केले असते.. हे सत्य आहे की भास.. आभास, माझ्या फुकाच्या वल्गना की मनीच्या कल्पना! कल्पना वरून आठवले.. कॉलेजात माझा मित्र होता दोडक्या.. म्हणजे दिनेश दोडके.. त्याला दोडक्या म्हणत असू आम्ही सारे. त्याची लाईन होती एक कल्पना नावाची. एकदा असाच संध्याकाळी कट्ट्यावर बसलेला कॉलेजच्या. तिकडून कल्पना आली. याच्याशी बोलली काहीतरी. दोडक्या आपला आ वासून बसलाय ती निघून गेल्यावर. थोड्यावेळाने आम्ही पोहोचलो. दोडक्या म्हणतोय, अरे कुणी चिमटा काढा, हे स्वप्न आहे की सत्य! अर्थात ही चिमटे काढण्याची संधी आम्ही वाया नाही घालवली. पण आज त्या कल्पनाची नि त्या चिमट्याची आठवण आली. माझीही गत तशीच झालेली आज.

पण गेल्या दीड दिवसाचा आढावा घेतला तर माझ्या एकूण वेगाच्या मानाने माझ्या प्रेमकहाणीची गाडी जरा जास्तच जलद

चालली होती. नुसती भेट नाही, तर ओळख नि बातचीत .. सारे काही जलदगती.. एक्सप्रेस! अर्थात हे सारे अमेरिकन एक्सप्रेसवाले लवकरच परत जायचेत, तर हा वेग पण तसा मुंगीचाच म्हणायला हवा. पण थोडक्यात समाधान मानावे हा कुठल्याशा स्वामींचा उपदेश आठवून चित्ती समाधान ठेवत ठेविले अनंते तैसेच राहण्याचे ठरवले मी. गंमत म्हणजे मि. बुरकुल्यांचे नाव अनंत होते! आणि पुढे याच अनंत बुरकुल्यांनी मला जावई

म्हणून ठेविले!

.. तर आजवरची प्रगती पाहता हे ही नसे थोडके म्हणून मी विचार करायला लागलो!

त्या मंतरलेल्या अर्ध्या तासात खरे तर माझी तंतरली होती. मनी वसणारी स्वप्न सुंदरी समोर उभी. ती मनमोकळी बोलायला तयार आहे नि मी शब्द शब्द जपून कसले, लपवून ठेवल्यासारखा ते शोधत बसलोय.. किती छान संधी होती इंप्रेशन पाडायची. पण कसले काय नि कसले काय. माझ्या मनात आलेली वाक्ये मनातून जिभेवर यायलाच तयार नसतील तर काय करणार? पण काही असो वै स्वतःहून आली हे ही नसे थोडके.

आणि माझ्यासारख्याला हेच अल्पसंतुष्टतावादी धोरण परवडते. परवडते म्हणण्यापेक्षा तेच एक धोरण जमते.. त्याला काय करणार? म्हणजे कॉलेजमध्येही माझ्या मैत्रिणी होत्या, नव्हत्या असे नाही. पण कधी कुठल्या गंभीर विषयावर गंभीर चर्चा मी केलीच नाही. उगाच गमतीदार बोलणारा एक विदूषक म्हणून माझी प्रसिद्धी होती. विदूषकाच्या टोपीखालचा गंभीर मेंदू कुणी पाहिला नसेल! कोणी म्हणेल विदूषक वगैरे म्हणणे काही कौतुकाने असेल, पण तसे नाही. कॉलेजच्या साऱ्या कन्यका एक एक करून बुक झाल्या.. संपल्या.. पण माझ्या वाटेस कौतुक करणारी कुणी कौतुकसुंदरी कन्यका आली नाही कॉलेज सुटेपर्यंत. विदूषक रडतो तरीही लोक हसतात म्हणे! अर्थात मी काही रडत बिडत नव्हतो नि नाही ही. आणि जे झाले ते बरेच झाले, नाहीतर ही वै.. तिचे काय? अर्थात अजून ती माझी झाली नाहीए .. फक्त एक लेटर ऑफ इंटेंट टाइप करायला घेतले होते.. एमओयू म्हणजे मेमोरंडम ऑफ अंडरस्टॅंडिंग बाकी होता.. पुढे डील वगैरे तर पुढची बात! माझ्या या बिझिनेस भाषेबद्दल आश्चर्य वाटेल तुम्हाला. पण माझे हे असेच होते.. नको तेव्हा नको ती भाषा वापरली जाते नि..

संध्याकाळ अशी छान गेली. एक पाऊल पुढे पडले. सफलता की ओर एक कदम! माझ्या अल्पसंतुष्टतेसाठी आज इतके पुरे.. वै ला तिच्या आईने बोलावले तशी ती 'गॉट्टू गो.. कमिंग.. आली आली ग' म्हणून धावत गेली निघून. मी उगाच पाठमोऱ्या तिच्याकडे पाहात राहिलो नि नंतर उगाचच बागेत भटकत राहिलो. आज इतके.. उद्या काय.. संध्याकाळची कातर वेळ.. वै तू माझी होशील का? होशील का? आजही एक कविता होऊन जाऊ देत.. मनात शब्द जुळवत बसलो. कविता आणि प्रेमाचे असे नाते असते का? कशीही असो आजवर कधीच सुचली नाही मला कविता. आणि आता दोन दिवसांत कवितांचे शब्द आपोआप मनात यायला लागावेत? रस्त्यावर भांडण होत असताना बघ्यांची गर्दी जमावी किंवा मुंबईच्या लोकलमध्ये गर्दी जमावी तसे? ह्या उपमा चुकल्या असतीलही, पण मला सुचल्या त्या ह्याच! शब्दच नव्हे तर उपमाही अशा चुकीच्या सुचाव्यात मला! तर आकाशात काळे सावळे मेघ दाटून यावेत तसे शब्द दाटून आले.. आणि दाटीवाटीने बाहेर पडले.. थोडक्यात मी मनात जुळवलेल्या कवितेचे शब्द बाहेर पडू लागले ..

तू स्वप्न आहेस की सत्य

मी चिमटा काढून पाहिले
काढला जोरात इतका
की भान नाही राहिले

चिमट्याच्या चिमटीत अडकून
झालो रक्तबंबाळ जसा
मिरवीत फिरेन जखमा या
शूरवीर मी आहे कसा

होशील का माझी तू
एकच प्रश्न असतो मनी
कोण न दिसेल तुजविन
तूच एक ती मन्मनी

कविता म्हटले की नाजूक साजूकच शब्द कशाला? मी चांगले चिमटा नि रक्तबंबाळ सारखे वापरून घेतले शब्द.. आणि अर्थात मन्मनी सारखा मुलायम शब्दही वापरला मी!

तर हे सारे राहू दे .. लिहायला आता खूप लिहिता येईल पण ते त्यावेळचे विचार नसतील. कारण मी पूर्ण ब्लॅंक झालेलो. त्यामुळे आता त्या विचारांचे प्रत्यारोपण कशाला करा!

११

वै चे गुडनाइट!

मी घरात परत आलो.. संध्याकाळ सगळी बागेत फुलांमध्ये गेलेली. शेवटी सगळे विचार संपवून नि ती कविता करून घरात शिरलो तर रात्र झालेली. घर भरलेले. सारी जेवायला बसली मंडळी. उद्याचा एक दिवस. मग हळदीचा समारंभ.. मग लग्न सोहळा.. हे अमेरिकन टूरिस्ट कधी जाणार परत ठाऊक नाही पण त्याच्या आत काही तरी केले पाहिजे.. पण करावे तर काय करावे?

मला आमच्या लास्ट इयरच्या परिक्षेसारखे टेन्शन आले एकाएकी. दोन चार दिवसात एवढा सारा पोर्शन पूर्ण करायचा? तशा परीक्षा दिल्यात खूप. अभ्यास करूनही नि कित्येकदा अभ्यास न करता ही. मेडिकलचा अभ्यास म्हणजे हनुमानाचे शेपूट. संपता संपतोय थोडीच तो. 'तरीही जगायचं कुणी थांबतं का?' च्या चालीवर परीक्षा द्यायचे कधी कुणी थांबतं का? तशा मी ही दिल्या. पण त्या साऱ्या परीक्षांना एक ठरवलेला अभ्यासक्रम होता. काहीतरी मार्गदर्शन होते. पण ही नवीन परीक्षा .. ना तिचा

अभ्यासक्रम ना काही माहिती. सारे आपणच बनवावे नि आपणच पेपर काढावा .. त्यात उत्तीर्ण होणार की अनुत्तीर्ण? यावर पुढचे आयुष्य अवलंबून असावे? बाकी परीक्षेत पुन्हा बसता येते. पन्नास टक्के पासिंग असते.. इथे मात्र तसे नाही काही. पुन्हा प्रयत्न नाही नि शंभर टक्क्यांहून कमी मार्क्स चालायचे नाहीत. वेळ थोडा.. सोंगे फार.. काय करावे की पुढे सरकेल गाडी?

आजचा दिवस तर संपला. रात्री बसलो परत गच्चीवर जाऊन. कदाचित आज येईल परत ती गच्चीवर म्हणत. मग अंगावर शाल टाकेल ती. दो घडी वो जो पास आ बैठे.. इफ ओन्ली! म्हणजे मग पुढे थोडे घोडे दामटता येईल. बात बढाने के लिए बात शुरू तो हो.. कालचेच ते तारे पाहात बसलो. का? तर ती यावी म्हणून .. पण नाही! माझ्या मागोमाग कुणी यावे? ती तर नाहीच, तर मामा नि काकाच्या ओळखीचे दोन चार जण आले गच्चीवर. मी डॉक्टर आहे म्हटल्यावर प्रत्येकाने आपापली तक्रार सुरू केली. कुणाला बीपी तर कुणाला डायबिटीस.. कुणाला काही. माझ्या मनात तिचा विचार आणि बोलतोय मी ते या सगळ्यांच्या प्रकृतीबद्दल. जमेल तसे मोफत मत वाटप करत बसलो. असले सल्ले हे घेण्यासाठी असतातच असे नाही. ते असतात आपापल्या डॉक्टरनी

सांगितलेले किती योग्य वा अयोग्य ते तपासून बघावे यासाठी किंवा बघूया या नवीन डॉक्टरला काही येते की नाही हे पहायला.. तर हे चुकलेय थोडीच नवशिक्या डॉक्टरला? मी एक डोळा जिन्याकडे लावून ती येतेय का बघत होतो. नि दुसऱ्याने इतरांकडे पाहात सल्ला वाटप करत बसलो होतो. चकण्या डोळ्याने का होईना तेवढेच पुण्यकर्म! मागे कुणी बाबा की स्वामी सांगून गेलेत ना .. पुण्यका फल मीठा होता है. मला वाटते सब्र का फल गोड म्हणाले ते स्वामी .. पण सब्र काय की पुण्य काय सब का फल पण मीठाच असणार, नाही का? तर म्हटले यापैकी कुणाचा तरी शुभाशिर्वाद मिळावा नि गाडी सरकावी पुढे. पण वै चे यायचे लक्षण काही दिसेना. सल्ला सत्र सुरूच होते. कदाचित पुण्यकर्मात या सगळ्याची नोंद करतही असेल चित्रगुप्त गुप्तपणे. पण तरीही एकाक्षणी संयम संपला माझा. शेवटी मी खोट्या जांभया द्यायला लागलो नि झोप येते खूप म्हणून खाली निघून आलो.

रात्र बरीच झाली होती. मंडळी आपापल्या ठिकाणी विसावली असावीत. किंवा कुठेतरी बसून गप्पा मारत असावीत. त्यामुळे सगळीकडे सामसूम होती. वै कुठे असेल? तिला भेटून काहीच तास झाले होते, पण खूप वेळ झाल्यासारखे वाटत होते.

कुठे तरी वाचलेली 'एक अनामिक हुरहूर' तशी ती हुरहूर वाटत होती. तासनतास बोलत बसावे .. तिने, नि मी बघत बसावे.. तिला.. तासनतास.. रात्र झाली तरी ती झोपण्याआधी किमान एकदा तरी दिसावी.. दिसली तर बघून हसावी.. गुडनाईट तरी म्हणावे .. खरेतर दोन शब्द तरी बोलावे माझ्याशी.. असले ये दिल मांगे मोअर एवढेच विचार होते मनी. पण हे होणार तरी कसे?

तिच्या रूमकडे नजर टाकली मी. दरवाजा बंद होता. आवाजही नाही काहीच. त्या बंद दरवाज्याकडे पाहात मान वळवून जिन्यावरून उतरताना पाठून आवाज आला, “मोडक..”

माझ्या हृदयाचे ठोके चुकले.. वै होती..

“गोईंग टू स्लीप.. गुडनाईट..”

"आली नाहीस आज गच्चीवर?"

"नो.. टायर्ड यार. थोड्या गप्पा मारली सगल्याबरोबर. आताच गेले सगळे ज्होपायला. तू कुटे होता?"

"इथेच. गच्चीवर. आय वॉज डुईंग मेडिकल कन्सलटेशन यू सी!"

"ओह! आय नो. डॉक्टर लाइक यू इज ऑलवेज मोस्ट वाँटेड देन!"

मी तिला 'बाय हूम?' विचारणार होतो .. पण नाही विचारले.

"चल मी झोपटे.. तुला काय बोलायचा होतं?"

"अगं नाही. असंच.. तू झोप. दमली असशील."

"ओके. तू म्हणतो तर जाते.."

मी भांबावलो.. ही बोलत बसेल तर मी रात्रभर जागायला तयार होतो. आणि वै मला डायरेक्ट गुडनाईट करतेय? मीच मग संभाषणाची गाडी पुढे ढकलावी म्हणून म्हटले, “गॉट ओव्हर विथ हॅंग ओव्हर?”

मला हे असले शब्दजुळवणीचे तंत्र चटकन जमते. ती संध्याकाळी भेटली तेव्हा विचारायचे मला आता झोपायच्या वेळी सुचले! पण असे काही जमले म्हणून मी स्वतःचीच पाठ थोपटून घेतली ..

“काइंडॉफ.. बट फीलिंग अ बीट स्लीपी. झोफ.. नाई झोप येटे..”

“ओह! स्लीप देन.. स्वीट ड्रीम्स.. गुड नाईट..”

स्वीट ड्रीम्स! तिच्या स्वप्नात मी येईन का? खरेतर जाईन का? किंवा ती येऊ देईल का?

“उद्या बेटू.. गुडनाईट..”

ती म्हणाली आणि आपल्या खोलीत निघून गेली. मी पाठमोऱ्या तिच्याकडे पाहात राहिलो ती रूममध्ये दिसेनाशी होईपर्यंत. नंतर मग मला तिकडून परत फिरण्याशिवाय दुसरा कुठला पर्याय होता? मी माझ्या खोलीकडे निघालो.

१२

## स्वप्न सुंदरी!

ती गेली नि मी पण माझ्या खोलीत आलो. वै म्हणाली, मी म्हणतोय म्हणून जाते.. असे का म्हणाली ती? म्हणजे काय? आधी तीच खूप झोप येते म्हणालेली.. मी तिला आग्रहाने 'झोपतेस कसली? जागी रहा नि गप्पा मार' म्हणायला हवे होते? की अजून काही? आधीच माझी बोलण्याची गडबड, त्यात हा अजून गोंधळात गोंधळ! म्हणजे कन्फ्यूजन ही कन्फ्यूजन आणि काय! यात माझी चूक होती.. बोलण्यात की समजण्यात? उद्या परत ही म्हणेल का.. व्हाय वेअर यू अव्हॉयडिंग मी? काही असो. झोप तर मलाही येत होतीच. आणि आज काही ती आता येणार नाही तेव्हा झोपायला हरकत नाही. कालचा माझाच पुन्हा कधीच न झोपण्याचा पण मोडत मी झोपायला आलो.

खोलीत आलो तर आई माझी जणू वाट पाहातच बसल्यासारखी बसलेली. मला पाहताच म्हणाली,

“आलास.. काय म्हणत होती ती?”

“कोण गं?”

आवाजात जमेल तितका साळसूदपणा आणत मी म्हणालो. तसा मी बरा ॲक्टर असणार म्हणजे. आता येतानाच वाटलेले मला.. फॉरेनची ही पाटलीण आई स्वीकारेल का.. कदाचित तिच्या मामाकडून कनेक्शन आहे म्हटल्यावर स्वीकारेल ही.. की शेवटी संघर्ष हमारा नारा है?

“तीच..”

“कोण?”

“ती बागेत.. संध्याकाळी.. वैदेही..”

“हां.. ती होय.. काही नाही.. असेच इकड तिकडचे.."

"म्हणजे?"

"कॉलेजच्या गप्पा. रेडिओलॉजीवाली आहे ती."

"हुं. आणि काही?"

"आणि काय?"

"कसंय तिकडे अमेरिकेत?"

"मला काय ठाऊक? अगं, तिचे इंग्लिश कळतानाच किती वेळ जातो..”

हे शेवटचे वाक्य माझी जित्याची खोड न गेल्याचा पुरावा म्हणून म्हटल्यासारखे मी म्हणालो. त्यात आईच्या माहेरची लिंक असल्याचे विसरलो मी.. आणि आई तिची बाजू घेत म्हणाली, “अरे ते इतकी वर्षे तिकडे राहून.. तरी ती मराठी शिकायचा प्रयत्न करतेय..”

हे माझ्या फायद्याचे होते. आईच्या मनातला हा सॉफ्ट कॉर्नर ती जगातील कुठल्याही कॉर्नरातून असली तरी पुढच्या दृष्टीने फायद्याचाच होता! तरीही मी म्हणालो,

“हो ना.. मराथी!”

मी म्हणालो काय.. खरेतर पचकलो. माझे मलाच काय झाले ते कळेना. इकडे तिची स्वप्ने पाहतोय आणि आई समोर उगाच काहीबाही बोलतोय.

"तसं नाही रे, तिकडे नेहमी जी भाषा बोलत असतील तर भाषेला तो टोन येतो. पण तिची बोलायची इच्छा आहे ना? ती जास्त महत्त्वाची. हो की नाही मोदका?"

"हुं. असेलही." बोलण्यात बेपर्वाई वाटावी असा बोललो मी. म्हटले ना मी तसा बरा ॲक्टर आहे ते!

"मोदका, बाग मात्र छान आहे हां काकाची. पाणी घालायला मजा आली असेल. आपल्या शहरात अशी बाग कुठली मिळायला .. हो की नाही?"

"हो ना.."

"बरं झालं आलास नाही इकडे? म्हणजे आपल्याकडे असली फुलझाडं नाहीत. छान आहे ना?"

"हो ना."

"आवडली तुला?"

"कशाबद्दल बोलतेस गं?"

"बाग रे.. तुला काय वाटलं?"

“काही नाही गं.. झोप आलीय चांगलीच..”

विषय वाढू नये म्हणून मी म्हणालो.

आई माझ्याकडे पाहात होती.. आणि मी झटकन डोळे मिटून घेतले.

स्वप्नसुंदरीची स्वप्ने पहायची तर स्वप्न पडायला हवे आणि स्वप्नासाठी झोपायलाही हवेच! मी डोळे मिटून पडून राहिलो. आई बाजूलाच होती. मी किलकिल्या डोळ्यांनी पाहात होतो. ती उगाच

गालातल्या गालात हसल्याचा भास झाला मला. वै च्या विचारात मी परत रंगून गेलो. संध्याकाळी आमचे झालेले संभाषण .. कानात जणू रेकॉर्ड झाले असावे नि परत रिवाईंड करावे तसे आठवत होतो. मध्येच कदाचित मी हसलो असेन. कदाचित खुदकन ही. कारण आई म्हणाली, "काय झाले रे, स्वप्न पडले की काय..? हसतोयस तो झोपेत?"

मी हळूच डोळे उघडून पाहिले नि गाढ झोपेचे बेअरिंग घेत परत मिटून घेतले ते. संभाषणाची रिवांयडेड रेकॉर्ड संपली असावी नंतर. कारण मला खरोखरीच झोप लागली.

माणूस का झोपतो? आमच्या मेडिकलच्या अभ्यासात झोपेचीही चिरफाड होती. झोपेच्या वेगवेगळ्या स्टेजेस नि त्यात घडणाऱ्या घडामोडी.. झोपेतल्या मेंदूच्या वेगवेगळ्या लहरी असतात. त्यात मग कधी स्वप्ने पडतात. स्वप्न पडल्यापडल्या काही सेकंदांत डोळे उघडले तर ती लक्षात राहतात म्हणे. मनी वसे तेच स्वप्नी दिसते.. मग मला स्वप्नात ध्यानीमनी वसणारी वै दिसली नसती तरच नवल.

तर कधीतरी झोप लागली. स्वप्न ही पडले..

त्यात वैदेहीही सदेह आली.. माझ्या मागे धावत धावत. ती बोलत होती. खूप काही. इकडतिकडचं नाही. काहीतरी महत्वाचे. मी मान हलवतोय..तिच्या बोलण्याकडे माझे लक्ष आहे.. मी तिच्याकडे पाहातोय.. पाहातच राहतोय .. एकाएकी ती म्हणते, तू काहीच बोलत नाहीस तो? मग मी बोलायला सुरूवात करणार तर जीभ उचललीच जात नाही .. मोठया कष्टाने ती उचलली जाते.. एखादे शिवधनुष्य उचलल्यासारखी.. मग आवाज फुटतो माझा.. नि मी एकाएकी बोलू लागतो.. काहीतरी. आणि माझे ते बावचळत बोलणे ऐकून ती हसत सुटते.. हसताना ती छानच दिसते पण म्हणून तिने माझ्यावरच हसावे?

स्वप्नातून घाम फुटून मी जागा झालो.. पहाट झाली नव्हती अजून.. म्हणजे हे काही स्वप्न खरे होत नाही! मी नि:श्वास टाकला नि परत झोपी गेलो!

१३

## तिचे वर संशोधन?

कालच्या दिवसाने माझ्या अपेक्षा वाढवल्या होत्या.  काही नाही तर 'मोडक मोडक' म्हणत ती येईल.. मग गप्पा मारीत बसू. उगाच घाई नको म्हणून लवकर उठून तयार होऊन बसलेलो. सकाळी उठून मी गप्पांसाठी विषयही निवडून ठेवलेले! आयत्या वेळी काही सुचण्या न सुचण्याची चिंता नको. नको तेव्हा तोंडी परीक्षेत ब्लँक व्हायची सवय माझी मोडायलाच हवी. पण तोपर्यंत परीक्षेत कॉपी करावी तसे रेडिमेड गप्पांचे विषय शोधून ठेवावेत. आणि मग जमेल तसे बोलत सुटावे. म्हणजे उगाच ती नको म्हणायला, व्हाय आर यू अव्हॉयडिंग वगैरे.

तयार होऊन मी खाली आलो. आता मी कात टाकून अगदी टीपटॉप झालेलो. लुंगीबिंगी कायमची बाद. स्मार्ट टी शर्ट नि जीन्स.. माझ्या मते मी ही त्यात स्मार्ट दिसत असावा. वेळ कशी सांगून येत नाही, तशी ती ही काय कधीही भेटू शकते. रामदास स्वामी सांगून गेलेत तसे सदा सावधान राहणे गरजेचे!

थोड्या वेळात काकू आली. आईदेखील उठलेली. बरीच मंडळी बाजूच्या घरात झोपली होती. आठ वाजेतोवर उठली नव्हती. येता येता बुरकुल्यांच्या खोलीवर नजर टाकलेली मी. तिकडे सामसूम होती. अगदीच काही आवाज नाही. आई आणि रमाकाकू आजच्या जेवणाच्या बेताबद्दल बोलत होत्या. त्यांच्या गप्पांत कळले.. सकाळीच ही बुरकुले फॅमिली कुठेतरी निघून गेली. कुठे गेली असावी? मी न विचारता गप्प राहिलो आणि कुठे गेली यापेक्षा परत कधी येतील यातच मला जास्त इंटरेस्ट होता. तरीपण आपसूक काही माहितीचे तुकडे.. (म्हणजे पीसेस ऑफ इन्फर्मेशन.. आता वै शी बोलायचे तर अशा भाषांतराची सवय हवी!) कानी पडतात का याची वाट पाहात बसलो. इतक्यात रमाकाकू म्हणाली, ‘‘काय मोदका.. लवकर उठलास?"

"अगं, झोप झाली असेल त्याची. काल रात्री लगेच झोपून गेला तो."

"आणि असा तयार होऊन कुठे निघालास सकाळ सकाळीस?"

"मी? कुठे नाही."

"मग असा झकपक.. स्मार्ट दिसतोयस हां आजकाल.. कुणाला भेटायला जायचंय?"

"काय तरीच काकू. इकडे कोण असणार माझ्या ओळखीचे."

"ते ही खरेच. पण ओळखी काय केल्या की होतात. हो की नाही? आणि लग्नघर म्हणजे लोक भेटतातच, दूरदूरचे."

काकू नक्कीच माझी चेष्टा करतेय.. तिला किंवा आईला माझ्या वै बद्दलच्या भावना कळल्या की काय? की माझी देहबोलीच काही बदललीय?

"मोदका, तुला बोअर तर नाही ना होत इकडे?”

“अगं तो कसला बोअर होतोय.. मस्त बाग आहे. पाणी घालायला हो की नाही?”

अशा वेळी निर्विकार चेहरा कसा ठेवावा? तरी जमेल तितके मी दुर्लक्ष केले. पण काकू मुद्दा सोडायला तयार नव्हती.

"हो ना. मी तर म्हणते हा मोदक आहे तोवर माळ्याला सुट्टीच देऊन टाकते.. काय मोदक? "चालेल, घालेल ना हा रोज पाणी झाडांना!"

दोघांनी मला असे अडचणीत आणायचे ठरवूनच टाकलेय की काय? नशिबाने काकू स्वतःच ट्रॅक बदलत म्हणाली,

“काय मोदका.. कशी आहे कृत्तिका?”

हा हिचा गुगली की काय?

मी गडबडत म्हटले, “मला काय माहित.. आज सकाळपासून कोणी नाही आहेत ते म्हणालीस ना तू..”

“ओ हो! म्हणजे लक्ष सगळे आपल्या बोलण्याकडे होते प्रमिला..”

“तू काही लक्ष देऊ नकोस रमे.. न बोलून शहाणा. वडलांच्या वळणावर गेलाय.”

कारण नसताना आईने येथे बाबांचा उद्धार केला.

मी इंग्रजीत स्ट्रेट फेस म्हणतात तसा बसायचा आटोकाट प्रयत्न करत बसलो.

इथून जावे का.. नाहीतर ही रमाकाकू वकिली बाण्याने नामोहरम करायची.. पण अजून वै परत कधी यायची याची माहिती मिळायची बाकी होती.

"हां. गेलेत बाहेर सगळे खरे. इतक्या लांबून आलेत, इकडची कामे करून टाकतील. नंतर वेळ मिळायचा नाही ना. तरी मी म्हणाले मिसेस बुरकुल्यांना, लवकर निघा म्हणजे सगळे संपवून येता येईल. हो की नाही रमे?"

"हो ना. गेलेत सकाळी, थोडा उशीर झाला. आता तयारी म्हटले की थोडा उशीर तर होणारच की नाही. त्यात वैदेहीची तयारी. थोडा वेळ लागणारच.."

मी कान टवकारून ऐकू लागलो. रमाकाकूने धागा सोडला नाही.. पुढे म्हणाली, ‘‘काही नाही रे आलेच आहेत तर एक दोन मुलगे बघून घ्यावेत वैदेहीसाठी म्हणून गेलेत.. परत परत कसे येतील? त्यांना इकडचेच स्थळ हवेय. प्रमिले, वैदेही तशी चांगली मुलगी आहे नाही? कुणीही हसत हसत पसंत करेल.’’

"रमे, मी तर म्हणाले त्यांना, आलाच आहात तर नक्की करूनच जा. खरं की नाही मोदक?"

यावर मी काय म्हणावे अशी अपेक्षा असावी त्यांची? बोलता बोलता काकू आणि आई माझ्या चेहऱ्यावरच्या उडणाऱ्या रंगाकडे पाहात होते.. की तो माझा निव्वळ भास होता?

एकाएकी माझ्या हातापायातले त्राण गेल्यासारखे झाले. बुरकुले मंडळी खरेच वर संशोधनास लागलीत की काय? कालपर्यंत फक्त चार दिवसात खूप सारा पोर्शन पुरा करायचे टेन्शन.. ते नुसते पासिंग मार्कांचे होते, आज.. आता अभ्यास असा करा की नंबरही पहिलाच आला पाहिजे! इथेही कॉंपिटिशन?

रात्रीचे ते स्वप्न आठवून मी परत अजून काळजीत पडलो. पहाटेचे नसेल ही ते स्वप्न पण वै काय विचार करत असेल माझ्याबद्दल? ती मला खरंच हसत असेल की काय? आता काय करावे? आज दोन मुले पाहणार आहे ती. तिला काय कोणीही करेल पसंत. पण तिला मी पसंत पडेन ना? कठीण आहे. वै बद्दलचे हे माझे एकतर्फी खयाली पुलावाचे घाणे घालणे बंद करू की अजून अथक प्रयत्न करू? आणि अजून प्रयत्न म्हणजे मी काय करणार होतो? आज संध्याकाळपर्यंत आवडला असेल वै.. नाही, वैदेहीला कोणी तर? पत्ता डायरेक्ट कट माझा? द एंड ऑफ द शॉर्टेस्ट लव्ह स्टोरी?

१४

## मेंदीच्या पानावर!

एकूणच चित्र जुन्या जमान्यातल्या कुठल्याशा कृष्णधवल सिनेमासारखे धूसर होते. मी उदास झालो. आणि कंटाळून शेजारच्या घरात येऊन बसलो. तरी लग्नघरात कुणी साधे उदास पण बसू देत नाहीत.. डॉक्टरला तर नाहीच नाही.

माझ्या मागोमाग कालचे ते हाय नि लो बीपी आणि स्पांडिलायटीस नि डायबिटीस वाले वरती आले.

कालचे अर्धवट राहिलेले संभाषण ते पुढे चालवू इच्छुक होते. आणि आता या सकाळच्या वेळी झोपेची सबब सांगणे पण शक्य नव्हते. आता आज मोबाईलच्या युगात हे किती सोपे झालेय.. रस्त्यात कुणी येताना दिसतोय.. लावा मोबाईल आपल्या कानास आणि टाळा त्याला पद्धतशीर. ते तेव्हा मात्र शक्य नव्हते. मग नाईलाजाने मला बसावेच लागले कन्सल्टिंग करत! मनात विचार वैदेहीचे आणि चालू आहे पद्धतशीर सल्लासत्र. सकाळ अशीच गेली. सगळ्यांचे प्रश्न संपले असावेत किंवा कदाचित विचारून

थकले असावेत. एक एक करून सारे निघून गेले. नि मी एकटाच उरलो तिथे.

मी पण वैतागून समोरील घराच्या व्हरांड्यात पाय पसरून बसलो. पुढे काय घडणार? खरेतर वै.. नाही वैदेही.. जोवर ती माझी नाही होत तोवर वैदेहीच.. भेटून पुरते अठ्ठेचाळीस तास नाही उलटले. तिच्याशी बोललो असेन ते फक्त अर्धा एक तास पण ती अशी हुरहूर लावू शकते? सिनेमा असता तर डायलॉग मारता आला असता.. ये प्यार नहीं तो और क्या है मेरे दोस्त.. पण इथे शंका होतीच कुणाला. फक्त हे वैदेहीपर्यंत पोहोचवायचे कसे इतकाच प्रश्न होता. आणि तिला ते मान्य होईल का हा त्याहून गहन प्रश्न.

आजवर न पडलेला प्रश्न मला पडला.. जगभर इतक्या जोड्या जुळतात.. म्हणजे कोण न कोण कुणाला न कुणाला या जगात कुठल्याही क्षणी कोठे न कोठे प्रपोज करतच असणार.. 'मी फक्त विचारले तिने लाजून हो म्हटले' वगैरे कवितेतच नाही प्रत्यक्षात येत असणारच. मग या गोष्टीबद्दल कुठे ऑफिशियल मार्गदर्शन नको? सगळे काही पुस्तकी ज्ञान..

तिथल्या आरामखुर्चीत बसून पाय लांब करत जग निरखून पाहण्याशिवाय आता मला काही काम नव्हते आणि दुसरे काही जमले पण नसते. म्हणून मी तेच करत बसलो. नशिबाने ती नातेवाईक गॅंग माझा पाठलाग करीत आली नाही.. कदाचित गरज सरली म्हणून या वैद्यास सोडून दिले असावे. किती वेळ गेला कुणास ठाऊक. रिकाम्या डोक्याने बसलेलो मी. मला अशी अधेमधे झोपायची सवय नाही, नाहीतर चांगली ताणून दिली असती.

काही वेळाने खालून आवाज आला.. “मोदका.. तू इथे आहेस?”

हा आवाज कृत्तिकाचा.

“अगं वर ये.. कालपासून दिसली नाहीस ती..?”

“येते..”

वर आल्या आल्या तिने माझी ताणायला सुरूवात केली.

“मी इथेच आहे रे पण तुला दिसत नसेन तर.. तुला दिसते ती..”

“तू दिसत नाहीस? म्हणजे.. तू भूत बित आहेस की काय? पाहू तुझे पाय? उलटे.. नाहीत.. आणि ती पहा तुझी सावली.. भुतास

सावली नसते.. ॲज लाँग ॲज माय नॉलेज गोज, द भूत्स डोण्ट कास्ट अ शॅडो..”

मूड नसताना पण मी, पोरी ज्याला फनी म्हणतात तसे कितीही बोलू शकतो.. मग नेमके वै.. नाही वैदेहीसमोर का फाफलतो मी?

माझ्या बोलण्यावर कृत्तिका हसली. क्षणभर विचार आला.. अरे ही पण चांगली आहे.. वैदेही नसेल तर. आणि दुसऱ्या क्षणी माझी मलाच लाज वाटली. असे उठसूठ पक्ष बदलायला मी काही राजकीय नेता थोडीच होतो..

“मला कळतं बरं मराठी.. नाही तुझा गैरसमज होत असेल तर.. ती मी नव्हेच..”

विषय बदलत मी विचारले,

“आणि काय कधी आलीस?”

“मी? कुठून?”

“बाहेर गेलेत ना बुरकुले मंडळी? तू पण..”

“छे रे.. ते तिकडे त्यांच्या एका दूरच्या नातेवाईकांना भेटावयास गेले आहेत. वैदू नाही नाही म्हणत होती पण मीच पिटाळले तिला. एवढ्या लांब आली आहे तर.. तिचे इथे नाहीतरी काय काम?”

म्हणजे आजच्या सकाळची खलनायिका ही कृत्तिका आहे.. दोन प्रेमी जिवांची ताटातूट घडवणारी.. प्रेमी जीव! छे! हे अगदीच नाटकी आहे..

“म्हणजे? नुसतेच गेलेत ते बाहेर?”

“ऑफकोर्स.. आणि नुसतेच म्हणजे काय?"

"नुकतेच म्हणालो मी.." मी बचावात्मक पवित्रा घेत म्हणालो. पण कृत्तिकाने डाव साधलाच.. हळूच म्हणाली,

"तुला काय वाटले? कुणी स्थळ वगैरे..”

ती शेवटचे वाक्य तोंडातल्या तोंडात बोलली पण मला ते ऐकू आले. म्हणजे ते मुलगे बघणे वगैरे झूट? आई आणि काकू माझी विकेट घेऊ पाहात होत्या की काय? माझी बॉडी लॅंग्वेज इतकी तर नाही ना बदलली? ही कृत्तिका पण माझ्याशी असे बोलतेय..

“तर, आज काय उपास की काय? तीन वाजलेत.. आई म्हणाली बोलावून आण जेवायला म्हणून आले..”

“मला इच्छा नाही गं जेवायची..”

“कां.. कुणाची वाट बिट बघतोयस.. नाही आई बोलावते म्हणून..”

“आई अशीच आहे गं.. उगाच मागे लागते..”

“तुला काय ठाऊक?”

“म्हणजे? आई माझी.. मला नसणार ठाऊक?”

“तुझी? तुझा काय संबंध.. वैदेहीची आई बोलावित होती. एकत्र जेवू म्हणे.. जाऊ देत.. मी सांगते तुला इच्छा नाही..”

कृत्तिका अशी बदमाश असेल असे वाटले नव्हते. आता मी पवित्रा बदलून म्हणालो.. “चल. उगाच माझ्यामुळे नको कुणास ताटावर ताटकळत ठेवायला.. कधी आलेत गं?”

“तू चल.. मी सांगते..”

खाली आलो तशी ती परत म्हणाली, “आली नाही काही.. मी फक्त गंमत केली.”

या कृत्तिकाला शिव्या घालाव्यासे वाटले मला. पण एकतर तिला मी इतके ओळखतही नव्हतो आणि माझी शिवीसंपदा अगदीच मर्यादित. वर वैदेहीची जवळची मैत्रीण. उगाच असले नसले इंप्रेशन खराब व्हायचे. आता निघालोच म्हणून आलो घरी तर समोर वैदेही. निळया गर्द ड्रेस मध्ये. मस्तच.

सकाळपासूनचा सारा राग क्षणात नाहीसा झाला. नक्कीच ही काही मुलगा बिलगा बघायला गेली नसणार. त्यासाठी किमान साडी तरी नेसून गेली असती.

“मोडक.. हाय.. व्हेअरार्यु सिन्स मॉर्निंग?”

“मी? आयॅम हिअर ओन्ली.. तुम्ही लोकच नव्हतात इथे."

"ओह! गॉन आऊट समव्हेअर. पन आता आलो ना परत? तू जेवला अजून नाही?"

"नाही. चला जेवूया.. भूक लागली..”

शेवटचे शब्द बोलता बोलता मी कृत्तिकाकडे पाहून जीभ चावली. कृत्तिकापण डांबिसपणे हसली.

मग आम्ही घरी आलो जेवायला. वै किती चाखत माखत जेवते ते पाहात होतो. रमाकाकू मला आग्रह करून वाढत होती. आणि दरवेळी त्या वैदेहीला ही विचार सांगत होती. त्यावर ती तिची लांबसडक बोटे आडवी करत 'नाही' म्हणत होती. जेवणापेक्षा माझे तिच्याकडेच जास्त लक्ष होते..

जेवता जेवता गप्पा झाल्या, पण दोघांनीच गप्पा मारण्याची मजा नव्हती त्यात. तरीही नाही पेक्षा चांगलेच. आता संध्याकाळी काही ना काही भेटणे बोलणे तरी होईलच. मी जेवता जेवताच संध्याकाळची वाट पाहू लागलो. जेवण उरकून उठलो .. वैदेही तिच्या खोलीकडे निघाली.. कृत्तिका ही तिच्या पाठोपाठ.. जाता जाता म्हणाली.. “आता विश्रांती घे.. आम्ही बिझी आहोत.. मेंदी लावण्यात.. इझंटीट डिअर वैदू.”

"या.. ॲम सो एक्सायटेड.. बाय मोडक.."

"मोडक.." कृत्तिका हसत सुटली.. "ड नाही द.."

असू देत.. मोडक.. किती गोड वाटते हिच्या तोंडी.. मी मनातल्या मनात म्हणून पुढे निघालो. आता सामूहिक मेंदी म्हणजे आता यापुढे आजतरी देवीदर्शन नाही.. तरीही तिच्या हातांवर रंगलेल्या मेंदीच्या पानावर आता माझे मन झुलणार होते.

काही असो. बुरकुले मंडळी काही 'स्थळ' दर्शनाला नाही गेलेली.. म्हणजे 'स्टोरी में जान अभी बाकी है दोस्त' एवढा निष्कर्ष काढून मी खोलीवर आलो.. आजच्या दिवसात एवढेच नशिबात आणि काय! म्हटले आता ताणून द्यावी. बाकी पुढचे पुढे!

१५

## हाऊ टू स्पीक!

सारे काही अकल्पित घडले.

मी येऊन बसलो आपल्या खोलीत. कसला तरी विचार करत बसलेलो. तर हळूच वैदेही आत आली. माझ्यापुढे हात दोन्ही पसरून म्हणाली, "मोडक, बघ ना, आय हॅव कम.."

मी पाहिले तर तिच्या दोन्ही हातांवर मेंदी रंगलेली मस्त.

"छान आहे हां. मस्तच!"

"अजून काही?"

"काही नाही. बाकीच्या सर्वांची झाली?"

"हुं.." ती फणकाऱ्यात म्हणाली नि गप्प झाली एकाएकी. ती जायला निघणार इतक्यात कृत्तिका आली पाठोपाठ.

"मोदका.. तुला इतकेही नाही कळत? नीट बघ ती मेंदी.."

कृत्तिकाने वैदेहीचे हात समोर माझ्या समोर धरले. मी निरखून पाहिली मेंदी तर त्यात माझे नाव लिहिलेले. त्यानंतर जे झाले.. मी लाजलो चक्क. पाठोपाठ वै ही.

नंतर आमची सगळ्यांची बैठक झाली. सगळे बसलेले समोर. वै चे आई बाबा, माझे आई बाबा नि काका काकू देखील.

बोलणी सुरू होती. वै खाली मान घालून बसलेली. मध्येच हळूच माझ्याकडे कटाक्ष टाकत होती. त्या बैठकीतल्या सगळ्या बोलण्याकडे माझे लक्ष नव्हते. तिच्या चोरट्या कटाक्षांकडे मी पाहात होतो. मला आमच्या पहिल्या वर्षात शिकलेली ॲनाटॉमी आठवली. डोळ्यांच्या स्नायूंना एकदम बाजूला बघायला मदत करणारे स्नायू असतात, त्यांना लव्हर्स मसल्स म्हणतात! बाकी ॲनाटॉमी विसरलो पण इतकी गोष्ट मात्र अजून लक्षात माझ्या. तर त्या लव्हर्स मसल्सना कामाला लावत बसलेलो. सगळे लग्नाच्याबद्दल बोलत बसलेत..

लग्न तिथे अमेरिकेत होणार का? की इकडेच?

"आमच्या वैदूला आपली भारतीय पद्धतच आवडते. त्यामुळे इथेच करू सारा समारंभ." वै ची आई.. म्हणजे मिसेस बुरकुले अर्थात सासूबाई माझ्या.

"छानच!" आई.

"अहो, आपण ते इथेच करूयात. याच घरी." रमाकाकू.

"पण दादा तुला चालेल ना? म्हणजे माझे कसे सारे साग्रंसगीत. देवादिकांना साक्ष ठेऊन. उगाच इकडतिकडचे हॉल कशाला. आणि स्वामींचा पण आशीर्वाद मिळेल."

"त्यांना काय विचारायचेय.. मी सांगते ना. इथेच करूयात सारे." अर्थातच आई.

"ठीक आहे, ही म्हणेल तसे. ही म्हणेल तसे ही सुखी संसाराची गुरूकिल्ली आहे. आजवर ही गाइडलाईन पाळल्यानेच तर सुखी झालोय.."

"काहीतरीच तुमचे. जणू कोणी विश्वासच ठेवेल यावर."

"का? मी सुखी नाही?"

"ते नाही, माझे ऐकून सगळे करता यावर."

हे सारे होताना मि. आणि मिसेस बुरकुले हसत होते गालातल्या गालात. जणू काही घरोघरी मातीच्याच चुली असाव्यात. वै अशी बसलेली की मला मुद्दाम पहायला लागत होते तिच्याकडे. पण सासूबाई समोरच होत्या आणि त्यांचात नि वै च्या हसण्यात खूपच साम्य होते.. म्हणून त्यांच्याकडे पाहून दुधाची तहान ताकावर भागवत होतो. बोलणी सुरूच होती. मी आपल्या भाग्याचा हेवा करत बसलो होतो. काय घडले ठाऊक नाही, एकाएकी वै उठली, नि आम्हा सगळयांच्या हातात कांदेपोह्यांच्या

बशा देऊ लागली. सगळे त्या पोह्यांवर लिंबू पिळत होते. तिच्या हातचे ते स्वादिष्ट पोहे खात गप्पा सुरू होत्या नि मी मात्र गप्पच होतो! इतक्यात काहीतरी घडले. म्हणजे वै परत उठून उभी राहिली. आणि धावत धावत बाहेर पडली. पाठोपाठ मि. आणि मिसेस बुरकुले पण बाहेर पडले. त्यांच्या मागे मी.

वैदेही तिच्या आईबाबांसोबत धावत निघाली. समोर एक हॉल होता. अगदी सनई वादन सुरू होते. आत धावत गेली ती. तिथे आंतरपाट घेऊन भटजी, त्यामागे एक मुलगा हार घेऊन उभा होता. वैदेहीने धावत उडी मारत त्याच्या गळयात हार घातला. मि. आणि मिसेस बुरकुले टाळया वाजवत उभे बाजूला. ते कमी की काय म्हणून माझे आई नि बाबा त्या दोघांच्या डोक्यावर अक्षता टाकताहेत.. कृत्तिका माझ्या पाठीवर हात फिरवत सांत्वन करतेय. आणि मी? पुस्तक घेऊन बसलोय, हाऊ टू स्पीक अँड इन्फ्ल्यूयन्स पीपल..

मी जागा झालो अचानक. आई बाजूलाच होती. तिला म्हणालो, "ते माझे पुस्तक कुठे गेले गं मी वाचत होतो ते?"

"कुठले ते पुस्तक? स्वप्नात पाहतो आहेस?"

मी गडबडून जागा झालो. नशीब काहीतरी दुसरे बोललो नव्हतो मोठ्याने स्वप्नात! संध्याकाळचे स्वप्न ते! अर्धे खरे व्हायला हवे! म्हणजे पहिले अर्धे!  काही असो ते पुस्तक मिळवायला हवे! हे महत्त्वाचे.. हाऊ टू स्पीक! पण हे ही मी कोणाला आणि कसा सांगणार होतो?

१६

## डिलिव्हरी बॉय!

नंतर मला झोप लागली असावी.

स्वप्न पडलेले ते विसरून मी मनसोक्त झोपून उठलो. अंधार झालेला. पाहुणे अजून काही पोहोचले असावेत. आवाज येत होता खालून. मी आळस दिला. किती वाजलेत त्याचा अंदाज घेतला. बहुधा रात्र झाली असावी.

आई खोलीत आली नि म्हणाली,"आज बागेत नाही गेलास.. पाणी टाकायला?"

"अगं झोप लागली.."

"हुं.. परत स्वप्न बिप्न काही..?"

मी उगाच तिच्या ट्रॅपमध्ये अडकू नये म्हणून विचारले.. "वाजले किती?"

"तेच.. तुला उठवायला पाठवलेय. उठ. काकू बोलावतेय.."

"मला? कशाला?"

"मदतीसाठी. आणि काय."

“आलो. मी? आणि कसली मदत करणार?"

"तूच बघ जाऊन."

मी उठून किचन मध्ये गेलो तर काकू ताटं तयार करत होती. म्हणाली, “आलास.. छान. एक काम कर. तेवढी ही ताटं नेऊन दे..”

“कोणाला?”

“अरे तिकडे मेंदी लावतायत त्यांच्या खोलीत..”

माझ्या चेहऱ्यावर अचानक लॉटरी लागल्यावर फुटावे तसे हसू फुटण्याच्या बेतात होते. ते आवरून उगाच बेफिकिरी दाखवत म्हणालो.. “मी?”

“बरं राहिले.. मीच जाते..”

“नको नको.. जातो मी.”

घाईघाईत मी म्हणालो. हे म्हणजे चोराला खजिना उघडून देण्यासारखे होते. असली आयती संधी मी कसली सोडणार होतो? काकू त्यात अजून काही बदल करण्याच्या आत मी ताटं उचलली आणि निघालो. बुरकुल्यांच्या खोलीचा दरवाजा बंद होता. आतून पोरींचा कलकलाट ऐकू येत होता. मी दार ठोठावले..

"डिनर रेडी.. मे आय कम इन फॉर डिलिव्हरी..?"

"ओह! डिलिव्हरी बॉय इज हिअर..?" कोणीतरी खिदळत म्हटलेले मला ऐकू आलेच.

“यस, कमिन..”

हा वै चाच आवाज. मी तृप्त कानाने दार उघडले. हे वाक्य चूक असेलही व्याकरण दृष्टीने किंवा अन्य कुठल्याही दृष्टीने चूक असेल पण तुम्हाला सांगतो प्यार व्याकरणबिकरण नहीं जानता. अधीरतेने मी दार उघडून आत गेलो.

आत चार पाच मुली बसलेल्या कृत्तिका आणि वै सोडून. बाजूला वै दोन्ही हातापायांवर मेंदी लावून बसलेली. बाकी काही रागिणीच्या मैत्रिणी आलेल्या. खोटे नाही सांगणार.. मी साऱ्यांकडे एकदा पाहून घेतले. होत्या चांगल्या पण एकीला वै ची सर नव्हती.

वै दोन्ही हात पकडून बसलेली. ही खाणार कशी? मला पडलेला प्रश्न मागे सारत म्हणालो,

“सो.. अंडर हाऊस अरेस्ट.. कान्ट मूव्ह?”

मी मला सुचलेला डायलॉग बोलून स्वतःवरच खूश झालो.

तेवढ्यात रागिणीची मैत्रीण म्हणाली, “हो ना जेलर साहेब..”

“कैद में है बुलबुल..” कुणी दुसरी म्हणाली.

सगळ्या हसू लागल्या. मला उगाच माझी बुलबुल म्हणजे वै लाजल्यासारखी वाटू लागली. खरेच लाजली का ती? की मला झालेला भास नुसता?

“अजून ताटं आणतो..”

मी सटकलो. मी पण लाजल्यासारखा दिसलो असेन का? असेल की नसेल.. कोणाला विचारणार होतो मी. आता या सगळ्या त्यांच्या रूममध्ये अडकून पडल्यात.  मला काय काम नंतर.. ताटांची डिलिव्हरी मुद्दाम टप्प्याटप्प्यात देत मी वै ला तीन चारदा पाहून घेतले. त्या सगळ्या हात वर पकडून कशा जेवल्या असतील कुणास ठाऊक.

हातापायावर मेंदी लावून बसलेल्या वै ची रूपे डोळ्यांत साठवत बाहेर आलो. काकू आणि आई टपून बसल्यासारख्या मागे आल्या.

"अरे, तू पण जेऊन घे.."

"अगं, त्याचं पोट भरलं असेल आपोआप.."

"म्हणजे गं? संध्याकाळी तर काही खाल्लं नाही त्याने."

"तेच गं. आज नुसता झोपून होता. भूक कसली लागतेय. पण एक आहे, घरी कामाला हात लावत नाही.."

"तुझं काहीतरीच प्रमिला, मी बोलावले ताटं द्यायला आला की लगेच. उगाच नाव ठेवतेयस.."

"तसं नाही. हवं ते काम करेल तो. नको ते सांगून बघ, म्हणजे कळेल."

मी निमूटपणे ऐकून घेत होतो. दोघीही चिडवत होत्या आडून आडून. मी शक्य तितका चेहरा सरळ ठेवून ऐकत होतो. वै बद्दल काहीतरी अजून बोलतील तर ते ऐकायला मिळावे म्हणून.

"छान रंगेल मेंदी बरं. रागिणी खूश दिसते."

"तिच्या मैत्रिणी आल्या म्हणून. आणि या कृत्तिका नि वैदेही दोघींचे चांगलेच जमलंय त्यांच्याशी."

"अगं, वैदेही आहेच तशी. तिचे कोणाशीही सहज जमेल.. हो की नाही मोदक?"

आता मी यावर काय बोलावे अशी अपेक्षा होती त्यांची? हो म्हणावे तर तू तिला इतका कसा ओळखतोस विचारतील.. नाही म्हणावे तर कां म्हणून विचारतील! उगीच नाही प्रत्यक्ष धर्मराजाने नरो वा कुंजरोवा अशी उत्तर देण्याची पद्धत डेव्हलप केली. तरी मला तसे काही उत्तर सुचले नाही आणि नुसताच "हुं" म्हणून गप्प झालो.

अजून इथे बसणे धोक्याचेच. दोघीही कशी विकेट काढतील सांगता येत नव्हते. अशा या विकेटवर यांच्या बाउन्सिंग डिलिव्हरीज वर या डिलिव्हरी बॉयला तग धरणे कठीण. तेव्हा सारे तसेच सोडून उठलो नि गच्चीवर निघून आलो.

१७

## मौनं सर्वार्थ?

दोघांचा ससेमिरा टळावा म्हणून मग गुपचुप मग गच्चीवरच्या झोपाळ्यावर जाऊन बसलो. आकाशात पौर्णिमेचा चंद्र होता. टिपूर चांदणे पडलेले. दुपारच्या झोपेनंतर आता कसली झोप येतेय. दिवसभरात आज हार्डली काही वेळ भेटली वै. सगळ्या दिवसाचा हिशेब.. त्यापेक्षा गेल्या दोन दिवसांचा हिशेब लावत लोळून राहिलो. नशिब कोणी नवीन पाहुणे मंडळीपैकी वैद्यकीय सल्ल्यासाठी पाठोपाठ आली नाहीत. बहुधा उद्या विचारतील.. आज ही काही ओळी सुचल्या. मेंदीवरून..

हातावर तुझ्या नक्षी गं मेंदीची
तू सखी माझ्या खास गं प्रीतीची..
माझ्या मनीची प्रीत तू गं लाजरी
माझ्याच मनी तू दिसशील गं साजरी..
वाटते अर्थहीन आणिक गं उदास

तुजविण सखये सारे गं जग नव्हे आभास..
विचारात तुझ्या मी असला गं गुंगलो
कुंतलात तुझिया असला गं गुंतलो..
येशील तू झडकरी पाश सारे गं सोडूनी
मेंदीची शपथ तुला हृदय दिले मी गं तोडूनी..फ

शेवटच्या ओळीवर माझे मलाच हसू फुटले. आधीच्या काही कवितांपेक्षा ही बरी होती, शब्द पण तसे नाजूक होते. कवितेत शोभण्यासारखे. पण हृदय म्हणजे काय झाडावरचा आंबा आहे तोडून द्यायला? तरीही मला आवडली माझीच कविता. छान.. मनात म्हणेतोवर जिन्यावरून पावलांचा आवाज यायला लागला. कुणीतरी येतेय.. कुणी काका वा मामा असतील तर? परत ते कन्सल्टेशन? नकोच.

मी लगेच डोळे मिटून घेतले. कुणी नको असलेले असले तर झोपलोय म्हणून समजून परत जाईल..

“झोपलाय वाटते..”

“हाऊ मच डझ ही स्लीप..”

बाप रे! ही तर कृत्तिका आणि वै ची जोडी. मी डोळे सताड उघडून उठून बसलो..

“झोपलो नाही काही.. जस्ट लुकिंग ॲट स्टार्स..”

पुढे म्हणणार होतो.. नाऊ द्याट यू हॅव कम.. मला चंद्राकडे बघण्याची काय गरज.. पण कृत्तिका तिथे होती.. आणि नसती तरी मी तसे बोलण्याची शक्यता नव्हतीच.

“ओ हो! तर डॉक्टर इथे स्वतःच्याच छातीचे ठोके मोजत बसलेत..”

कृत्तिका म्हणाली.. तिला खात्री असावी.. दोन गोष्टींची.. एक मला वैदू आवडलीय आणि वैदूला मराठी विशेष कळत नाही याची.

कृत्तिका नि वै हात नि पायावरील मेंदी सांभाळत बसल्या.

कृत्तिका अजून फॉर्मात येत म्हणाली, “तर मेहंदी रंग लायेगी ना?”

“व्हॉट्डुयू से? मेहंदी..”

“वैदू.. इट इज सेड द्याट युवर मेहंदी विल बीकम डार्कर इफ युवर हजबंड लव्हस यू अ लॉट..”

“ओह.. माय.. बट व्हॉट अबाउट मी देन.. माजे काय?"

“डोन्ट वरी.. इफ इट गेट्स डार्कर.. मीन्स युवर फ्युचर हजबंड इज थिंकिंग अबाऊट यू..”

कृत्तिका बिनधास्त माझ्याकडे पाहात बोलत होती. मी वै कडे पाहात होतो. चंद्राच्या प्रकाशात ती अजून सुंदर दिसत होती. आमचे संभाषण थोड्या नाजूक वळणावर येतेय असे वाटत होते मला. म्हणजे त्यातून वै ला काही सूचना मिळाली तर चांगलेच होते पण तिचा काही गैरसमज झाला तर?

कृत्तिका मग इकड तिकडचे बोलत बसली. वै पण त्यात भर घालत होती. माझे काय? मी बोलत होतोही आणि नव्हतो ही. म्हणजे मला सुचायचे छान पण बोलताना शब्द हवे तसे बाहेर येतील तर ना. थोड्या वेळाने काही आठवल्यासारखे करीत कृत्तिका गेली. मी आणि वै दोघेच उरलो. माझ्या हृदयाची धडधड तर तिला ऐकायला जाणार नाही ना.. मला भीती वाटली..

"सो लाइकिंग धिस.. मेहंदी अँड ऑल?"

"ऑफकोर्स. इट्स सो कलरफुल हियर इन इंडिया."

"हुं.."

"यू नो आज खूप मजा आली. नाइस फन.. विथ फ्रेंडस. रागिणीच्या मैत्रीणी.. आणि कृत्तिका. वुई लाफ्ड सो मच.."

"हुं.."

“कृत्ती सेड यू आर सो टॉकेटिव्ह.. बट आय हार्डली हिअर यू टॉक..”

“हुं.. नथिंग लाइक दॅट.”

“यू नो आय ॲम सो एक्सायटेड विथ धिस मॅरेज.. इंडिया इज टू गुड.. बोअर्ड ऑफ अमेरिकन लाइफ..”

“आय नो.. कृत्तिका वॉज टेलिंग मी..”

ही तिची हिंट समजावी का? आणि ते समजून मी पुढे काही बोलावे का? आणि तिला नाही पटले नि रागावली तर? मी 'मौनं सर्वार्थ साधनं' असे काही गीर्वाण भाषेत वाचले होते. संस्कृतात सुभाषितांचा खच पडला असतो म्हणे त्यातील हे एक. आणि मला हेच येत असावे? पुढे हे अति धोकादायक आहे हे मला कळले.. म्हणजे नंतर .. पुढच्या भागात कळेलच ते तुम्हाला.. कृत्तिकानेच सांगितले मला की मी न बोलण्याचा वै ने काढलेला अर्थ मला इंटरेस्ट नसल्याचा होता म्हणे! नशीब मला जास्त काही सुभाषिते येत नाहीत. अर्थात ही पुढची गोष्ट. आता माझ्यासमोर स्वप्नसुंदरी बसलीय. आजूबाजूला कोणी नाही.. टिपूर चांदणे पडलेय. आकाशात एक आणि माझ्याबाजूला एक असे दोन चंद्र आहेत बरोबर.. याहून रोमॅंटिक सेटिंग काय मिळणार होते? बाकी काही

नाही तर किमान काही इंटरेस्टिंग तर बोलावे.. पण माझी जीभ रेटेना पुढे.

वै काहीबाही बोलत होती आणि मी या प्रसंगाला माझ्या मनात साठवून नि गोठवून ठेवण्याच्या भानगडीत हुं.. हां.. शिवाय काहीच बोलत नव्हतो.

शेवटी ती वैतागली की काय कुणास ठाऊक.. म्हणाली, "से समथिंग.. आय वॉन्ना हियर यू टॉकिंग.."

तिचा हा निर्वाणीचा इशारा असावा.

मी सकाळी तिच्याशी बोलण्यासाठी शोधून काढलेले विषय आठवले.. कितीतरी होते. पण त्यातला एकच आठवला मला.. रेडिऑलॉजी! तिचाच विषय! आणि ती त्यातली टॉपर होती म्हणे..

म्हणून मी तोच विषय निवडला..

"आय वॉटेड टू आस्क यू समथिंग.."

"या.. गो अहेड.."

'यू नो वुई युझ बकी फिल्मस.. इज देअर डिफरन्स इन रेडियेशन एक्सपोझर बिटवीन नॉर्मल अँड धिस फिल्मस? यू नो वॉट आय मीन?"

माझ्या प्रश्नाने तिला काय वाटले कुणास ठाऊक..

"आय विल टेल यू समटाइम्स.."

म्हणत ती उठली आणि तरातरा निघून गेली. मी गोंधळलो. ती बोलत होती तेव्हा मी गप्प होतो. तिच्या आग्रहाखातर बोललो तर ही निघून जावी? ती रागावून गेली असा मला संशय आलाच होता. पुढे मला ती रागावूनच निघून गेलेली ते तिनेच सांगितले. म्हणजे माझ्या आयुष्यातला तिचा हा पहिला फणकारा! मी पण काय ग्रेट होतो.. चांदनी रात है.. तू मेरे साथ है.. आणि साथमें रेडिऑलॉजी की बात है? रागावणार नाही तर काय ती?

दिवस असा संपला. माझ्या शाब्दिक करंटेपणाचा करंट मला असा बसत होता.. आता यातून मार्ग काय? कदाचित तिला मी आवडत असावा अशी शंकाही मला येत होती.. घालवलेल्या संधी येतील का परत?

- संस्कृतातील सुभाषितांनी घातला गोंधळ आणि काय.. मानवी मन कसे असते नाही.. स्वतः सोडून दुसऱ्या कुणालाही दोष द्यायला सदैव तयार..

# १८

## हळदीचा दिवस..

दुसरा दिवस उगवला तोच मुळी उत्साहात. म्हणजे मी ठरवून टाकले. आता कात टाकायलाच हवी. काहीतरी छान बोलायलाच हवे. वै ला काल रात्री आला तसा राग जन्मभरात कधी म्हणून येऊ द्यायचा नाही.. मी तडकाफडकी निर्णय घेऊन टाकला. म्हटले दिवसाची सुरुवातच अशी करावी ना त्याने पुढचा मूडच बदलून जावा. आज संध्याकाळी हळद. तर सकाळी सगळे तसे मोकळे असणार. त्यात काही संधी मिळते का ते पाहिले पाहिजे. जमले तर कालची चूक सुधारली पाहिजे. बोलण्यात तसा मी हुशार. आई तर म्हणते, नुसता बोलण्यातच हुशार .. अर्थात याबरोबर ती 'अगदी बापासारखा' हे म्हणून आपले कर्तव्य पार पाडते.. तर ही वै समोर आली की काय बोलावे हेच उमगत नाही. एकतर मी तिचे बोलणे ऐकत बसतो, नाहीतर तिच्याकडे पाहात बसतो.. आणि डे ड्रीमिंग करत बसतो. त्या भानगडीत बोलायचे काय ते सुचत नाही. वर तिचा गैरसमज.. तिला वाटते मीच बोलणे टाळतोय तिच्याशी. पण आता हे असे नाही चालणार. काहीतरी करायलाच हवे. खरेतर

नुसते माझ्यासाठी नॉर्मल म्हणावे असे काहीही बोललो तरी निम्मा कार्यभाग साधला जाईल. एका दृढ निर्धाराने उठलो मी आज. 'होंगे कामयाब' हीच आजची थीम आणि तेच आजचे उद्दिष्ट.

त्याचा एक भाग म्हणून सकाळसकाळी उठून बागेत गेलो. त्याच ठिकाणी म्हणजे वै च्या खिडकी खाली. आणि व्यायाम सुरू केला. मुद्दाम छानसा टी शर्ट आणि शॉर्टस. स्पोर्ट्स शूज आणले होते याचा मला आनंद झाला. 'मेरी जान मेरी जान आना विंडो में' म्हणत पोहोचलो खाली.. आणि वै चुकून तरी खिडकीत यावी एवढी एकच इच्छा मनी धरून व्यायामाचा घाट घातला. मधूनमधून व्यायामाच्या प्रकारात तिच्या खिडकीकडे नजर टाकणे ही सुरू ठेवले. मला तशी व्यायामाची आवड होती असे नाही.. त्यामुळे त्यात कष्ट पडले .. ते ठीक.. पण वै ची वाट पाहाण्याचे कष्ट मात्र जरा जास्तच जाणवत होते.

.. आणि चमत्कार व्हावा तशी ती खिडकीत आली. नुकतीच उठली असावी. पण गोड दिसत होती. तिनेच हाक मारली .. “हाय मोदक.."

आणि खिडकीतून तिने हातही केला..

मेंदी मस्त रंगलेली मला खालूनही दिसत होती. आणि ड चा द झालेला एका रात्रीत.. म्हणजे मी 'मोडका'चा 'मोदक'ही ही झालो

होतो. म्हणजे कष्टाने ही रात्रभर माझ्या नावाचा सराव करत होती की काय? नसेल.. नाहीतर उचक्या नसत्या लागल्या मला? नाहीतर कृत्तिकाने प्रत्यक्ष कृती करत शिकवले असावे तिला. म्हणजे माझ्या मागे ही ती माझा विचार करत असणार?

"हाय.. वै.. देही..  ये ना खाली.."

मी तिला बोलावले.. आणि चक्क तिला ते कळले देखील..

"या.. येटे.. कमिंग.. इन फाइव्ह मिनिट्स.. जस्ट वेट.."

आता हिच्यासाठी पाच मिनिट काय मी जन्मभरही थांबायला तयार होतो हे मी तिला कधी सांगू शकणार होतो?

पाचेक मिनिटात ती आलीच. टी शर्ट आणि जीन्स मध्येही ती छानच दिसत होती. मला ते सुभाषित आठवले.. 'जातीच्या सुंदरास काहीही सुंदरच दिसते'.. तितक्यात कालचा तो सुभाषित फियास्को आठवला आणि मी तडकाफडकी निर्णय घेऊन टाकला.. नो मोअर बिलिव्हिंग सुभाषित्स.. काहीही होवो.. सुभाषिते आऊट!

"पाहू मेंदी .. वॉव!"

मी तिच्या हातांकडे पाहात उत्स्फूर्तपणे म्हटल्यासारखा म्हणालो. म्हणजे हे म्हणायचे मी काल रात्रीच ठरवले होते.

माझ्या बोलण्याने तिची कळी खुलली.

“इव्हन आय लव्हड इट..”

हिच्या इंग्लिशमध्ये 'इट' च्या ऐवजी 'यू' असा बदल केला तर.. एका सर्वनामा ऐवजी दुसरे! पण जे झाले तेही नसे थोडके!

ती बाजूलाच बसली. आता मी व्यायाम सुरू ठेवणे बरोबर की हिच्याशी गप्पा मारणे बरोबर? मला कळेना. अशा रियल लाइफ समस्यांबद्दल कुठेच कुणी का शिकवत नाही? मी व्यायाम थांबवून तिच्याशी बोलण्याचा निर्णय घेतला आणि तिच्या बाजूला जाऊन बसलो. ती हसली. म्हणजे माझा अंदाज बरोबर होता. आजचा दिवस माझा! खूश होत मी संभाषण स्वतःच सुरू केले..

“यू नो हळदी टुडे..”

“या हर्ड अबाऊट द्याट.. एनी आयडिया व्हॉटस दॅट?”

“या ऑफकोर्स.. धिस इज अ पार्ट ऑफ मॅरेज.. टर्मेरिक सेरेमनी..”

“टर्मेरिक सेरेमनी? व्हॉट्स दॅट?”

“सी.. यू नो.. लग्नाआधी आपल्या इथे ही पद्धत आहे.. नववधूला..”

“हू इज दॅट वडू?”

“वडू नाही.. अगं वधू.. नवरी. नववधू म्हणजे नवीन नवरी..”

“म्हणजे.. आय विल गेस.. ब्राईड..”

“ब्राईड .. व्हेरी.. ब्राईट.. तर ती जी नववधू असते ना तिला अंगाला हळद लावतात..”

“हडळ?”

“बाप रे! मीनिंगचा अनमिनींग.. आय मीन अर्थाचा अनर्थ.. ह.. ळ.. द.. दॅट इज टर्मेरिक..”

“ओह.. यू मीन ऑल स्पायसेस म्हंजे मसाल्याचे पदार्त लावतात.. तिखट.. मिरची.. गरम मसाला.. ओ गॉड..”

“गॉड कशाला पाहिजे इथे?”

“सो.. मसाला झोंबणार नाही?”

“अगं तो थोडीच लावायचा.. ओन्ली टर्मेरिक.. द्याट डझन्ट झोंब.. तर तू संध्याकाळी पाहशील.. सेरेमनी.. टर्मरिक.. हळदीचा समारंभ..”

“वॉव.. दॅटस कुल..”

“हो ना.. हळद लावून कुल वाटते नवरीला..”

“हाऊ डू यू नो? तू कधी नवरी होता?”

“दॅट्स गुड वन.. अगं हळद लावली की नवरीच्या अंगावर तेज येते..”

“स्टेज? ऑर समथिंग लाइक दॅट..”

“तेज.. म्हणजे ग्लो..”

“म्हणजे नवरी ग्लोज लाइक अ लाइट?”

“अगं नाही..”

“ओके.. आय अंडरस्टूड.. नव्री चमकते.. राईट?”

“ॲब्सोल्यूटली.. यू आर सो क्लेव्हर..”

“आय नो.. इंडियन ब्रेन अब्रॉड..”

"या.. अँड अ ब्राईट वन दॅट टू.."

"रियली.. खरेच?" ती हसत म्हणाली.

"ऑफकोर्स यार. यू आर टू ब्रेनी.."

"यू टू.. डिअर पॅथॉलॉजिस्ट.."

खरे सांगतो, डॉक्टरच्या डोक्यातून त्याची किंवा तिची डॉक्टरकी कधीच जात नाही. अगदी झोपेतून उठवल्यावरही. त्यामुळे वै ला माझे पॅथालॉजिस्ट असणे याही वेळी आठवले तर नवल नव्हते.

१९

## समरभूमीकडे कूच!

काही असो, कालच्या पातकाचे प्रायश्चित्त झाले म्हणून मी निश्वास सोडला. खरे सांगू तर वायफळ आणि निरर्थक बोलण्यात माझ्याशी स्पर्धा करणारे कोणी नसेल पण इथे आल्यावर हिला बघून मी आतापर्यंत ब्लॅंकच होत आलो होतो. बहुधा ते आता संपले. मग मी माझ्या भाग्याचा हेवा करत बसलो. काय सुंदर दिवसाची सुंदर सुरूवात अशा सुंदर साथीने.. हे क्षण असेच फ्रीझ करून ठेवावेत.. लेखक वगैरे असतो तर मनाच्या कुपीत बंदिस्त करून ठेवावेत असे म्हटले असते.. असा विचार करत बसलो आणि तिथेच परत फसलो. कारण पुढे काय बोलावे सुचेना मला. मी तिच्या हातावरल्या मेंदीकडे पाहात बसलो.. काही वेळ गेला असावा. मग एकाएकी म्हणालो, “हॅड यू अप्लाइड मेहंदी एनी टाइम अर्लीयर..”

“नो.. फर्स्ट टाइम.. व्हेरी फर्स्ट टाइम.. इट्स सो ब्युटिफुल नो..”

“या..”

पुढे तुझ्याहून नाही म्हणायचे होते मला पण नाही म्हणालो. असे काही बाही सुचते पण जीभेवर का येत नसेल ते? याबाबतीत काही कुठे सुभाषित.. मला थोड्याच वेळापूर्वीचा माझा निश्चय आठवला.. म्हटले मारो गोली टू सुभाषित्स..

तरीही पुढे म्हणालो.. “सो? हॅप्पी हिअर इन इंडिया?”

“या.. यू नो बट आय कुड हॅव बीन हॅपीयर..”

म्हणजे? हिला विचारू? ही हिंट तर नाही.. आणि नसेल हिंट तर.. किती गैरसमज? मी चूप राहण्याचा निर्णय परत घेतला. एकदा ठेच लागून शहाणा न झाल्याची शिक्षा होईल का मला? विचार करे पर्यंत झालीच.. कारण एकाएकी वै उठली..

“आय विल लिव्ह.. गॉट्टु गेट रेडी..” म्हणत ती गेली निघून. मी पाहात राहिलो.. परत माझे काही चुकले की काय? आणि ही रागावली की काय?

असे रियल लाईफ प्रॉब्लेम्स कुणीच कुठेच का शिकवत नाहीत?

सकाळ अशी सुरू झाली. बरीचशी गोड. थोडीशी आंबट. वर आलो तर आई हसत होती माझ्याकडे पाहून. कारण सरळ होते.. आज किती वर्षांनी मी व्यायाम करीत होतो, ते ही स्वतःहून.

“काय मग.. काय विचार?”

“काही नाही गं, खूप दिवसात अंग जरा जड झाले..”

“हो का? मग काय म्हणाली वैदेही?”

“ती.. ती कशाला काही म्हणेल.. आणि म्हणाली तरी तिची भाषा कळतेय थोडीच!”

हा माझा उगाच शेंड्या लावायचा उद्योग होता. काय आहे की अमेरिकन लोक तोंडातल्या तोंडात बोलतात खरे पण याबाबतीत वै ला नाव ठेवायला जागा नव्हती हे खरे. तरी मी असा का बोलत होतो.. मूळ स्वभाव.. कुठेही पचकायचा..

“पण चांगली आहे ती मुलगी..”

“असेल.. अगं चांगले नि वाईट आपण समजण्यावर असते!”

बाप रे! माझी ही फिलॉसॉफीकल बाजू मला देखील आजवर ठाऊक नसावी?

आईने माझा नाद सोडला. म्हणाली, “लवकर तयार हो.. खाऊन घे काहीतरी.”

हे माझ्या लक्षात आलेच नव्हते. ब्रेकफास्टला वै येईलच. मी झपाटल्यासारखा तयारीस लागलो. पटापट आटोपून आलो खाली

तेव्हा कृत्तिका, वै आणि रागिणीच्या मैत्रिणी ब्रेकफास्ट संपवून परत आपल्या खोलीत चालल्या होत्या खिदळत. मला पाहून त्यातील एकीने हाय म्हटले.. मी हात हलविला आणि झटक्यात निघालो. मी थांबायला हरकत नव्हती. पण नाही थांबलो. पोरी कुठे चालल्या असाव्यात? कुणास ठाऊक. हळदी समारंभ संध्याकाळी होता आणि रात्री आमचे मॅरेज हॉलवर कूच! तसा हॉल जवळ होता पण काकाच्या शिस्तबद्ध तयारीसाठी जाणे भाग होते. लांब चेहऱ्याने खायला बसलो ब्रेकफास्ट. व्यायामानंतर भूक लागतेच. खूप दिवसांनी तो केला तर भूकही खूपच लागते!

आता वै नाही आहे घरात एवढे नक्की तर करायचे काय? शेजारील घरातील व्हरांडा माझ्या खास आवडीचा. मस्त पाय पसरून बसावे, जाणारे येणारे न्याहाळत बसावे. वै भेटण्याआधी मी काकाच्या घराच्या अवतीभोवती सर्वेक्षण केले होते. पण त्याच संध्याकाळी वै ला पाहिले नि पुढच्या सर्व्हेची गरज उरली नाही. तरीही व्हरांडयात बसलो मी. वै आणि इतर कधी परत येतात हे बघायला. व्हरांडयातून काकाचे घरही नीट दिसते त्याचा हा फायदा! दुपारी काकूने जेवायला बोलावले. काकूच्या तावडीत सापडणे तसे धोकादायक, पण वै बद्दल माहिती न मागता

मिळण्याचे आमची अन्य कुठेही शाखा नाही म्हणणारी ती एकमेव जागा होती. त्यामुळे थोडा धोका पत्करूनही काकूच्या पुढे जाणं गरजेचेच होते.

"कंटाळलेला दिसतोस .. घरी कुणी नाही म्हणून?"

"नाही, आहेत ना सगळे .. कंटाळून कसे चालेल?"

मला वाटले मी चांगलाच धोबीपछाड घातला काकूला! पण ती सवाई, म्हणाली, "खरंय तुझं रे. पण काही जणं नसली तर करमत नाही ना?"

"कोणाबद्दल बोलतेस तू?"

"अरे, ती बुरकुले मंडळी. तुला काय वाटते?"

आता काकूला मी काय उत्तर देणार? मी काय बोलायला हवे? खरे उत्तर तर नाही देणार मी.. मग नेहमीचे उत्तर देऊन मोकळा झालो..

"हुं.." आणि विषय बदलण्यासाठी म्हणालो, "काकू आई कुठेय?"

इतक्यात आईच समोर उभी. आता एका ऐवजी दोन जणी ताणणार माझी..

"ही बघ. अगं हा आतुरतेने वाट पाहात होता.."

"कुणाची?"

"अजून कोण? तुझीच असणार. आली बघ रे आई तुझी."

काकू वाढत होती नि वाढता वाढता असले काही बोलत होती. मी घाईघाईत खाणं आटोपून परत शेजारच्या घरी येऊन बसलो.

दुपार अशीच गेली. चार एक वाजले असावेत. सगळ्या जणी परत येताना दिसले मला. पटकन् मी खाली यायला निघालो. आता तरी ही भेटेल.. बोलेल. खाली घाईघाईत निघालो, मुद्दाम निघालो असे वाटू नये अशा चालीत. पोरी घरात शिरतच होत्या. मी आत शिरणार तोच काकाची हाक आली,

म्हणाला, “मोदका, बरा भेटलास. तुलाच शोधत होतो. आता तुझे काम सुरू. तुला दिलेली कामे समजावून सांगतो. आता तुझी खरी गरज आहे राजा.”

थोडक्यात काय मिशन रागिणी लग्नाच्या समरभूमीवर म्हणजे लग्नाच्या हॉलवर कूच करण्याचा हुकूम आला काकाकडून.. आता पुढे काय?

२०

**विरहाग्नी!**

काकाने मला सगळ्या कामाला लावून माझा मामा केला. कामाचे काही नाही पण आधीच मर्यादित वेळात वै शी बोलू कधी आणि पुढे करावे तरी काय? रात्र थोडी सोंगे फार म्हणतात तसा आधीच वेळ थोडा आणि त्यात आता ती भेटणारही नाही विशेष. लग्न लागले की झटकन् उडून जाईल अमेरिकेत. नि मग तिचा कॉन्टॅक्टही नाही. आणि मी स्वत:ला ओळखून तर आहेच. मी काही जास्त हातपाय हलवणार नाही. मग पुढचे काय?

तिच्याशी बोलायला हवे. त्यासाठी ती भेटायला हवी. त्याकरता वेळ हवा. वेळ मिळाला तरी अर्थात पुढच्या दोन दिवसांत होणारे काम नाहीच ते. पण किमान एक आयडिया .. जो जिंदगी बदल दे.. तिच्या पर्यंत पोहोचवावी.. किंवा तसा किमान प्रयत्न तरी करावा मी. पण काकाच्या त्या ऑर्डरने सारे कठीण करून टाकले. काका मोठया मिलिटरी शिस्तीचा. त्याने माझ्याकडच्या कामाची एक टाइप्ड लिस्टच माझ्या हाती दिली. त्यात आज संध्याकाळ पासून लग्नानंतर रात्रीपर्यंत सारे काही

वेळेवार नि क्रमाक्रमाने लिहिलेले. त्यात माझ्या वाटच्या कामांना हायलाईट करून ती लिस्ट मला दिलेली. त्यासाठी आजच मला हॉलवर कूच करावे लागेल.. तिकडे गाद्यांची सोय.. पाणी भरून ठेवणे.. उद्यासाठी जे लागणारे सामान त्यांच्या दुकानात जाऊन त्यांना आठवण करून देणे इत्यादि कामे आजसाठी. सगळी आज संध्याकाळीच करण्याची कामे. म्हणजे हळदी समारंभातून माझा पत्ता कट. ती कामे संपवून मग मोकळा होऊन गच्चीवर वै ला भेटावे म्हटले तर सरते शेवटी .. रात्री हॉलवरच झोपणे हे ही काम माझेच. म्हणजे संध्याकाळपासून ते आता लग्न लागेतोवर मी बिझीच राहणार. वै.. तिचे काय? मनातून मी रडवेला झालो पण सांगतो कुणाला. त्यातल्यात्यात आज सकाळी बऱ्यापैकी बोलणे झालेले याचाच आनंद. नाहीतरी तसा मी अल्पसंतुष्ट आहेच!

हळदीच्या समारंभाच्या वेळी मी घरात नव्हतोच. हॉलवरच्या कामांना निपटवणे हेच मुख्य काम. पण त्यात मला वै ची आठवण आल्यावाचून कशी राहिल? काही निमित्त काढून दोन तीनदा मी घरी फिरकलो. एकदा ती दिसली. पिवळ्या रंगाच्या कपड्यांत. मस्त. तिला पाहून घेतले नि परत फिरलो. तिनेही पाहिले मला. ती तसेच सुंदर हसली. मी ही न बोलता निघालो. घाई होतीच..

लगीनघाई आणि काय. त्यामुळे बोलायला वेळ नाही मिळाला. आता तिला मी टाळतोय असे न वाटो म्हणजे झाले.

मग रात्री जेवणाच्या वेळी घरी परत फेरी झाली. मोठया अपेक्षेने. पण परत काकाच्या तावडीत सापडलो. म्हणजे काकाने आग्रह करून आधीच जेवायला वाढायला लावले. बुरकुले मंडळी आपल्या खोलीत असावीत. मी वै ला शोधतोय नि दिन्याकाका जेवून लवकर जा म्हणून सांगतोय!

"मोदका, तू थकला असशील. पटकन् जेऊन घे. सगळ्यांसाठी थांबशील तर उशीर होईल तुला. आणि गाद्या मोजून घेतल्यास ना? बेडशीट्स स्वच्छ आहेत ना ते पाहून घे. नळाला पाणी सकाळी येईल ते लवकर उठून चेक कर. नाहीतर त्या हॉलवाल्याच्या ऑफिसातून फोन कर.." काकाचे बोलणे संपत नव्हते नि मी जेवता जेवता "मेरी नजर ढुंढे तुझे" म्हणत एक एक घास गिळत होतो. जेवण होईतोवर तरी ती आली नाही समोर नि काकाच्या शिस्तीपुढे मी पण जास्त वेळ थांबू नाही शकलो.

परत आलो हॉलवर. आता तिथे हॉलवरच राहणारा एक काळा कुत्रा नि मी दोघेच उरलेलो. अजून रात्र झाली तसा माझा

धीर खचला जणू. सगळी कामे संपल्यावर हॉलवर कशाला झोपायला पाहिजे? पण काकाला प्रश्न नाही विचारता येत. त्यामुळे त्याची ऑर्डर पाळायलाच हवी. मी शेवटी तिथल्याच एका गादीवर अंग टाकले. विचार करायला लागलो.. आज ही गच्चीवर ती येईल का शोधत मला? खरेतर सारे माझ्या मनाचे खेळ आहेत की ती मला खरेच मिस करेल.. गॉड नोज.. तरीही अकरा वाजता मी बाईकवर टांग मारून घरी आलोच. बाय चान्स ती आली असेल तर.. गच्चीवर आलो.. सारी सामसूम. बुरकुल्याच्या खोलीत ही सामसूम. खाली येता येता हाक मागून आली.. मोदक!

तिचाच आवाज! मी वळून मागे पाहिले.. कुणीच नव्हते. भास नुसता. होणार नाही तर काय. सदा तिचाच विचार केला तर तिचा भास होणारच ना.

काकाच्या हुकुमानुसार हॉलवर परत आलोच झोपायला. नाईलाजानेच. तिची आठवण काढत. विरहाग्नीत प्रेमी जीव जळतात म्हणे. म्हणजे तसे ऐकून होतो. चार दिवसापूर्वी आलो इथे तेव्हा साधा एकटा जीव होतो. त्याचा एकदम प्रेमी जीव झालो मी इतक्यात. कुठे तरी वाचलेले आठवले.. ये प्यार भी कितनी प्यारी चीज है! असणारच. तीनचार दिवसांत जगच बदलून गेले. आणि तेही वै अजून माझी आहे की नाही ते गुलदस्त्यातच असताना. ती

हो म्हणाली की काय होईल? माझ्याकडे शी लव्हस मी.. लव्हस मी नॉट बघण्यासाठी पाकळ्या उखडून टाकायला गुलाबाचे फूल नव्हते. आता या विचारात रात्रभर तळमळणे आले. आज झोप येईल का? नींद क्यूं आती नहीं रातभर.. मला एक ऐकलेला शेर आठवला. आणि एकाएकी मी मनाशी म्हणालो, जुन्या जमान्यात ते तळमळणे वगैरे होत असेल.. किंवा ते तळमळून घेत असतील आपला जीव-बिव पण हे बदलून टाकू.. तळमळ कशाला.. त्यापेक्षा आठवण काढीत बसतो.. म्हणजे झोपतो! पण आठवणींनी झोप आली नाही तर.. तेही तळमळणेच.. च्यायला.. कुठूनही ते तळमळणे आलेच.. त्यापेक्षा मस्त गाणी म्हणत झोपू. कवितेचा नि माझा संबंध दुरूनही नव्हता आजवर. इथे आल्यावर केल्या त्या पहिल्या वहिल्या दोन कविता.

आज ही येतील शब्द ओठांवर तर जुळवून पाहीन काही शब्द.. आतून आले तर जुळतील सहज..

नजरेने पाहिले मी तरी
ही तर अस्मानीची परी..
भेटली ती मज सुंदरी
सुकांत चंद्रानन सोनसरी

अप्सरा सुंदरा ही जरी
वरमाला घेऊन उभी करी..
म्हणजे लागली नय्या पार
मोदका जस्ट डोन्ट वरी..

वा! जुळल्या ओळी.. अजून जुळतील.. पण त्यासाठी.. खरेखुरे काव्य जन्मण्यासाठी हवी ती प्रतिभा नाहीच माझ्याकडे हे मान्य करायला काय हरकत आहे.. त्यापेक्षा गाणी आठवत म्हणून बघतो.. म्हणता म्हणता पहिलेच गाणे आले ओठावर ते..

सोचा था प्यार हम ना करेंगे..
सूरत पे यार हम ना मरेंगे..
फिर भी किसी पे दिल आ गया..

किती खरेय हे.. म्हणजे गाण्यात काही ओढूनताणून बसवत नाहीत भावना! भाव आणि भावना! कालचा तिचा तो राग आठवला..

नाकाच्या शेंड्यावर

तुझ्या रागाचे गं घर ..

विसर विसर सारे राणी..

आता तू मला वर!

हे छान आहे! पण वै ला मराठी येत नाही.. आणि इंग्रजीत कविता जन्माला घालू इतके इंग्रजी मला येत नाही.. रागावण्यासाठी तरी ती दिसेल का.. ती रागावलीय..

तुम रूठी रहो.. मैं मनाता रहूं

इन अदाओं पे और क्या आता है..

विचार करता करता किती वेळ गेला कळले नाही.. उद्या काम भरपूर आहे.. वेळ कमी.. रात्र थोडी सोंगे फार.. वै तिकडे झोपली असेल की जागीच असेल.. आठवत कुठल्या इंग्लिश कविता? मी घड्याळात पाहिले.. अडीच वाजून गेलेत.. लवकर उठणे आहे उद्या.. पण उठणार तेव्हाच जर झोपलो तर.. आणि आलीच नाही झोप तर..

इब्तदायी इश्क में हम सारी रात जागे..

अल्ला जाने क्या होगा आगे..

मग विचार आला.. हा हिंदी सिनेमा असता तर? आता मी डोळे मिटले असते. मी झोपलोय..स्वप्नात ती धावत धावत येतेय.. जमाने के बंधन तोडकर. मग एखादे गाणं.. 'न जा छोडकर तुम मुझे तुझसे नहीं रह सकती जुदा .. छोड आई पीछे जमाना अब जमाने को विदा.. ' आम्ही हाथोंमें हाथ लेकर बसलोय.. किंवा मग मीच निघालोय इथून. बाईक धूम सोडलीय मी. घरी येतो मी. अंधारात मी बागेतल्या झाडावरून  वै च्या खोलीच्या खिडकीतून आत शिरतो. ती जागी होतेय.. तू.. आता.. ? इथे कसा? मी म्हणतोय, 'बेकरार जिया मुझे खींच यहांपर लाया .. कौन है जो करेगा हमें जुदा .. सनम बेशक आए भी गर खुदा.'

स्वप्नातले स्वप्न पाहात स्वप्नातच कधीतरी झोप लागली मला.

२१

## वाजवा रे वाजवा!

केव्हातरी लागली असावी झोप.. सकाळी जाग आली कशीतरी. आज लग्न. उशीरा उठून चालायचे नाही. काकाच्या शिस्तीत सारे काही त्याच्या ऑर्डरप्रमाणेच व्हायला हवे. सारी जबाबदारी माझ्यावर. काकाचे काम ही कसे.. फुलवाल्याकडून सकाळी साडेसातास फुले घेऊन येणे.. गुलाबाची फुले शंभर मोजून घेणे.. नशीब प्रत्येक फुलाच्या पाकळ्या मोजून घेणे नाही लिहिले! वाजंत्रीवाल्यांना आठ वाजून वीस मिनिटानी फोन करून आठवण करून देणे .. सनई वादकांस कोणकोणते राग वाजवणे याची यादी देणे.. भटजीबुवांना सकाळी नऊ वाजून आठ मिनिटांनी फोन करून आठवण करून देणे.. आणि नऊ पंचावन्नला घेऊन येणे.. भटजीबुवा मंत्र विसरले नाहीत याची खात्री निघण्यापूर्वी करून मगच त्यांना घेऊन येणे.. आचारी म्हणजे जेवणाच्या केटरर्सना फोन करून आठवण करून देणे.. त्यांना सगळ्या पाककृती नीट येतात याबद्दल त्यांची आधी तोंडी परीक्षा घेणे.. त्यांच्याकडील भाज्या नि बाकी सामानाची संपूर्ण तपासणी करणे.. फुलवाल्यांस फुलांची

आरास करण्यासाठी वेळेवर येण्याची आठवण करून देणे.. त्यासाठी घड्याळात अलार्म लावून ठेवणे.. त्याचबरोबर फुले ताजी असण्याबद्दल फुलवाल्यास सज्जड दम भरणे.. असली कामाची यादी. त्यातल्या काही अर्थातच माझ्या ॲडिशन्स! त्यात चुकांना वाव नाही. त्याच्या शिस्तीस त्याच्याहून वयाने मोठे असलेले माझे बाबा पण घाबरून असतात. त्यामुळे कामात टंगळमंगळ नाही. आणि तसा अभ्यास नि कुठल्याही कामाच्या बाबतीत मी ही सिन्सियर मध्येच गणला जाणारा. म्हणूनच तर काकाने ही जबाबदारी माझ्यावर टाकलेली. पण इश्कने निकम्मा किया वरना हम भी हैं कुछ काम के! ही वै नसती तर इतका काही विचार नसता केला मी. पण गेल्या चार एक दिवसांत दुनिया बदल गई हे खरे!

सकाळी सकाळी तयार व्हायला घरी आलो. नवरीचा भाऊ, तो ही एकुलता एक म्हणून माझी डिमांड असणार आज. नवऱ्याचा कान पिळायचे काम असणार मला. हे एक मस्त आहे.. जोवर मी पिळणार दुसऱ्याचे कान तोवर. पण मला धोका नाही कारण वै ला भाऊ नाहीच कोणी, माझा कान पिळायला. किती पुढचा विचार माझ्या डोक्यात यावा? अजून कशाचा नाही पत्ता आणि मी विचार करतोय माझ्याच लग्न सोहळ्याचा. पण उम्मीद पर ही जीती है

दुनिया! आशा इज होप! अशा विचारात चाललो असताना काकाने पकडले नि सगळ्या कामाचा हिशेब घेतला माझ्याकडून. काका बोलतोय माझ्याशी नि तिकडूम वै घाईत चाललेली. मला हात केला तिने नि नंतर जवळ येत म्हणाली, “हाय! ऑलवेज इन अ हरी मोदक?”

मी कसनुसा हसलो. काका काही सोडत नव्हता मला.

"या, टू मच टू डू.. टू लिट्ल टाईम .." माझ्या बोलण्याला दोन्ही अर्थ होते एकाच वेळी. म्हटले ना, बोलण्यात मी हार नाही जात कुणाला, फक्त ही वै समोर आली की जीभ एका जागी घट्ट चिकटून राहते!

"ओ. के. सी यू ॲट द व्हेन्यू." म्हणत ती निघून गेली.

या काकाला मला खलनायक ही म्हणता येईना .. त्याच्याच घरी तर मला ही भेटली. आणि आता त्याच्याच मुळे मला तिच्याशी बोलता येत नाहीये.

"लवकर तयार होऊन जा. आम्ही आलोच. यू आर डुईंग गुड वर्क. दादा म्हणालेला मला, तुझ्यावर जबाबदारी टाकली की परत बघायला लागत नाही."

पहिल्यांदा मला माझ्या जबाबदार असण्याचा पश्चात्ताप झाला! पण आता रूबाबदार बनून जायलाच हवे हॉलवर. जमेल तेवढे वै शी बोलायला हवे दिवसभरात.

हॉलवर आलो नि लागलो कामाला. सगळीकडे लक्ष देत होतो. त्यात मी म्हटले ना तशी भटजीबुवांपासून फुलं नि पानं नि जेवणावळ.. सारी जबाबदारी माझ्यावर.  वै चे काय होणार हा एकच प्रश्न सतावीत असताना हा कामाचा डोंगर..खरा तर सह्याद्रीतील एखाद्या शिखरासारखा. पण येता जाता तिच्या विचारामुळे वाटतोय एव्हरेस्ट सारखा.

साडेनऊच्या सुमारास सारे हॉलवर आले. त्यात रागिणीच्या बरोबरीने साऱ्या मैत्रिणी. त्यात वै पण. लाल साडीत.. वॉव. सुंदरच दिसत होती ती.

'यू लुक सो ब्युटिफुल' म्हणून तिला सांगायला हरकत नव्हती पण नेहमीप्रमाणे नाही बोललो. नुसताच 'हाय' म्हणून पुढे कामाला लागलो. हॉलमध्ये एक झाले.. ती वारंवार दृष्टीस पडत होती. जाता येता भेटत होती. बोलायला वेळ नव्हता तरी काहीतरी बोलणे होत होते. त्यात मला खरोखरीच घाई होती.. त्यामुळे माझे आधीच

जुजबी बोलणे अजूनच जुजबी होत होते. लग्न लागले. यथासांग. डोक्यावर अक्षता पडण्याची वेळ झाली रागिणीच्या. त्यातल्यात्यात संधी साधून मी वै ला गाठले..

"रागिणी इज लुकिंग सो गुड नो?"

"या.. द ब्लशिंग ब्राईड.."

"अँड द डॅशिंग ग्रूम!" मी म्हणालो तर ती हसली.

"तुला सात फेरे माहिती आहेत ना?" मी विचारले.

"ऑफकोर्स. मी इंडियन वेडिंगची इन्फो काढून ठेवलीय."

"ओह! सो यू आर वेल इन्फाॅर्म्ड हां.."

"काइंड ऑफ आय गेस.. सी हाऊ रागिणी इज ब्लशिंग.."

"आय नो. नथिंग मोअर ब्युटिफूल द्यान अ ब्लशिंग ब्राईड.. एक्सेप्ट.." मी बोलता बोलता थांबलो.. एक्सेप्ट यू म्हणणार होतो मी.

"एक्सेप्ट व्हॉट मोदक?"

‘‘नथिंग.. सी, नाऊ व्हॉट दे सिंग आर कॉल्ड मंगलाष्टकास.."

"ओह. वॉव.."

"धिस इज टिपिकल वे दे सिंग देम.."

"ओह! आय सी!"

"ॲंड देन इट विल बी वाजवा रे वाजवा..”

“मीन्स?”

“मीन्स दे विल देन एक्सचेंज गारलॅंड्स..”

“आय नो .. सीन हिंदी मूव्हीज..”

“ॲंड थ्रो धिस राईस ऑन हेडस ऑफ ब्राईड ॲंड ग्रूम!”

"ओके.. वॉव! बट व्हाय?"

"हाऊ डू आय नो.. इट्स रिच्युअल.."

“वॉव.. थ्यांक्स .. रिच्युअल ऑर ॲक्च्युअल.. आय वुड ऑल्सो लाइक मॅरेज धिस वे डियर..”

मी ताडकन उडालो. तिच्या या इंग्लिश वाक्याचा नक्की अर्थ काय? ऑल्सो? म्हणजे ती स्वतःबद्दल सांगतेय? मग मला का सांगतेय? की आयॅम ओव्हररीडिंग इट? काही असो पण तो शेवटचा डिअर शब्द मला सुखावून गेला. पण साहेबी भाषेत या डियर ला तसा अर्थ नसतो हे मला माहिती होतेच. त्यामुळे त्यातून जास्त काही अर्थ न काढणेच श्रेयस्कर होते. काय असेल ते असो. मी बिझी होतोच. जास्त विचार न करता कामाला लागावेच लागले. पण डीड शी एक्सपेक्ट माय रिस्पॉन्स?

"आय थिंक आय विल हॅव टू गो. मला जेवणाची तयारी बघायला लागेल.."

"यस. टू बिझी हां. बट आय टेल यू. नव्रा नव्री ची पोझिशन बेस्ट. त्यांना काय बगायला नाय लागत."

"हो ना.."

यावर 'विश वुई वेअर इन देअर प्लेस' असं काही अजून काही छान डायरेक्ट बोलता आलं असतं पण नेहमीप्रमाणे नाही बोललो.

लग्न लागले. पंगती बसल्या. सारे पाहुणे एका मागोमाग एक बसले. आमचे अमेरिकन पाहुणे ही बसले पण वै चा पत्ता नव्हता त्यात. सगळ्यांना आग्रह करून वाढणे झाले.

नवरीच्या घरचे काही थोडे मागे राहिले नि नवरा नवरी. आम्ही सारे शेवटी पंगतीला बसलो. रागिणी नि तिचा नवीन नवरा दोघे बसले. क्षणभर रागिणीच्या जागी वैदेही आणि नवऱ्या मुलाच्या जागी मी अशी कल्पना केली मी. माझ्या बाजूला एक खुर्ची रिकामी होती.. आणि त्यावर वै येऊन बसली. पंगतीला आग्रह करून वाढत होते काही. नाव घेणे झाले.. घास भरवणे झाले..

"हे.. व्हॉट इज धिस?"

नाव घेण्याला इंग्लिशमध्ये काय म्हणतात ते कळेना.

तरीही घोडे दामटले पुढे ..

"नाव घेतात दोघे, उखाण्यात. यू नो टू ऑर थ्री लाईन्स इन पोएट्री फॉर्म. अँड ॲड नेम ऑफ युवर हजबंड ऑर वाईफ इन इट!"

"सो दे हॅव रिहर्स्ड इट?"

"आय डोन्ट नो. बट इट्स डिफिकल्ट नो?"

"कम ऑन. डोन्ट टेल मी तू तुझ्या लग्नात नाय बोलणार हे!"

मी काय बोलणार होतो यावर? नुसताच हसलो. मनात म्हटले हिचे नाव घालून उखाणा बनवून ठेवला पाहिजे आताच.

"यू लाइक्ड इट?"

"येस्स. लव्ह एव्हरी मोमेंट हियर.. आय टोल्ड यू.. आय लाइक इंडिया.."

मी तिला हा इंडियन आवडतो की नाही हे विचारता आले असते आता. पण संधी आलेली हातातून घालवत राहिलो. पंगत उठली. मी निघून गेलो. ती देखील मैत्रिणींच्या घोळक्यात रमली. संध्याकाळपर्यंत हे असेच चालले. म्हणजे कामामुळे मी देखील हॉल बाहेरच जास्त वेळ होतो.

रागिणीच्या सासरी जाण्याची वेळ आली. मला काही कारण नसतानाही ह्या प्रसंगात रडू आवरत नाही. एका मित्राच्या लग्नात

तर त्याची ती बायको रडत नव्हती पण माझ्याच डोळ्यात पाणी येत होते! त्यामुळे मी शक्यतो मागे राहतो अशा प्रसंगी. आणि तिथे नेमकी वै माझ्या बाजूला येऊन उभी राहिली. तिला काही बोलायचे असावे.. पण तिला माझ्या डोळ्यातले पाणी दिसू नये म्हणून मी हळूच सटकलो काही न बोलता.

नंतर सारे निपटता निपटता काका, बाबा नि मी घरी येईपर्यंत रात्रीचे दोन वाजले. घर सामसूम होती. फक्त रमाकाकू आणि आई जाग्या होत्या. बाबा नि काका त्यांच्याशी काही बोलत बसले. मी हळूच बुरकुल्यांच्या खोलीकडे पाहिले. झोपले असणार गाढ. हॉलमध्येच एक सोफ्यावर मी पडलो.

मला जाग आली तर आजूबाजूला उजेड पडलेला. मी उठून बसलो. दुपारचे दोन वाजलेले. म्हणजे मी इतका वेळ झोपून काढला? कालचा थकवा असावा. वै कुठे असेल? घरात सामसूम होती. बहुतेक आलेले पाहुणे परत गेले असावेत. बुरकुल्यांची खोली उघडी दिसत होती पण त्यात हालचाल जाणवत नव्हती.. मी आळोखे पिळोखे देत उठलो तर समोर कृत्तिका उभी होती..

२२

## वैदेही गमन!

कृत्तिका उभी समोर नि मी जांभई देत बसलोय.

आजूबाजूचे काही समजेना मला. वैदेही कुठे असेल? निघून तर गेली नसेल ना? मी डोळे चोळत कृत्तिकाकडे पाहात म्हणालो,

“बाकी कोणी दिसत नाहीत?”

“बाकी म्हणजे? आहेत ना.. सगळे आहेत.. काकू आहे.. काका.. आई.. बाबा सगळे आहेत..मी आहे, तू ही आहेस.”

का कोणास ठाऊक मला तिचा आवाज थोडा कडवट वाटला.

न राहवून मी विचारले .. “आपण सगळे आहोतच पण बाकीचे गेस्ट..?”

अजूनही मी वै बद्दल थेट विचारू धजत नव्हतो..

“आहेत की.. ते मंगू मामा नि तात्या आहेत. झालेच तर रत्नागिरीच्या मावशी आहेत. राजापूरच्या आत्याबाई आहेत. सगळे आहेत. बाजूच्या घरात. झोपले आहेत.”

“हुं.. खूपच झोपलो मी.. थकलो होतो.”

“झोपलास ना.. छान! आता मी झापणार आहे तुला..”

"अगं पण कृत्तिका .."

माझे न ऐकताच कृत्तिका तरातरा निघून गेली.

एकूण लक्षात आले ते हेच.. बुरकुले फॅमिली म्हणजे वै निघून गेली होती.. त्यांना जाणे भाग होतेच. पण मग आता पुढे काय? विचार करून डोके चालेना.

बागेत एकटाच येऊन बसलो. बागेत पाणी घालण्याचा प्रसंग आठवला.. नि व्यायाम करतानाच्या गप्पा ही. जगात कित्येक गोष्टी न बोलल्याने बिघडतात नाही? नको ते बोलणे नि हवे ते न बोलणे सगळ्या समस्यांचे मूळ आहे.. कुठल्याशा स्वामींनी म्हटले असणारच हे. असला फिलॉसॉफिकल विचार करत बसलेलो तर मागून कृत्तिका आली..

“काय मग..?”

“तू मला झापणार का होतीस..”

“झापणार? नुसता झापणार नाही, ठोकणार मी तुला. युजलेस. तू अकलेचा कांदा.. वैदू गेली निघून.. तू डायरेक्ट ते ही मला विचारत नाहीस..”

“गेली.. माहिती आहे.. पण मला नव्हते ठाऊक.. इतक्यात जाईल ते.”

“हो.. आणि ठाऊक असते तर फार फरक पडला असता?”

मी विचारात पडलो..

"म्हणजे तू होऊन तिच्याशी बोलणार होतास?"

"मी कालच बोललो तिच्याशी..

"छान! हवा पाण्याच्या गप्पा की तुमच्या मेडिकलची डिस्कशन्स? वैदूने सांगितले मला."

"अगं पण.. मी अजून काय बोलू तिच्याशी?"

“नाही ना कळत? मग काल ती तुला काही सांगू पाहात होती नि तू टाळत होतास तिला.."

"मी? मी कशाला टाळेन तिला?"

"ते माहिती नाही पण ती मला म्हणाली असे.. आणि आज ती गेली तेव्हा तू ढाराढूर.. काय समजावे तिने?”

“म्हणजे? तिला .. ती ..”

“तुला अक्कल कमी आहे का? कमी आहे का नाही.. कमीच आहे अक्कल तुला. मद्दड. कसा डॉक्टर झालास कुणास ठाऊक..

कॉपीबिपी करून पास झालास की काय.. साधी भाषा कळत नाही. ती तुझ्यापाठी येते नि तू बोलायचे टाळतोस?"

"मी?"

"नाही.. मी.."

"ऐक ना कृत्तिका.. झाले ते झाले.."

"मग गात बसा गाणे .. झाले गेले विसरूनी जावे.."

"प्लीज.. तुला खरे सांगतो.. वै मला आवडली.."

"वै?"

"हो.. वैदू नाही वै च. इतकी की तिला पाहताच मी ब्लॅंक होतो.. मग तिच्याशी बोलू ते काय नि कसे? त्यात तिला मी आवडेन की नाही ते माहित नाही.. तुझ्याशी मी बोलतो की नाही हवे तितके.. तो माझा स्वभाव, पण ती समोर आली की.. आणि गेले दोन दिवस पाहतेस तू.. इतके काम की.."

"छान.."

"आता?"

"आता काय..खाली डोके वर पाय.. गेली बस निघून आता करा ठणाणा.. करा भजन.. मला का विचारतोस?"

"म्हणजे.. नो रिटर्न..?"

“तू वेडा की खुळा.. इतक्यात सोडून देतोस.. हलव की हातपाय..”

“हलवेन.. पण कुठल्या दिशेने?”

“ते ही मीच सांगू? इच्छा तिथे मार्ग..”

“सांग ना.. अगं खरे सांगतो गेल्या चार दिवसात एक ही क्षण गेला नाही ज्यात तिचा विचार आला नाही.. आता..”

“आता काय? मारा बाता..”

“प्लीज.. यू आर द होल अँड सोल.. प्लीज हेल्प..”

“ठीक.. ग्रांटेड ऑन वन कंडिशन..”

“बोल.. लवकर बोल..”

“एक.. तू तिला उद्देशून पत्र लिहायचे..”

“मी?”

“नाही मी.."

"ठीक करतो काहीतरी."

"आणि दुसरे.."

“पण.. तू एकच कंडिशन बोललेलीस..”

माझ्याकडे दुर्लक्ष करत कृत्तिका म्हणाली, “दुसरे हे की तू स्वतः ते पत्र तिला द्यायचे!”

“मी?”

“नाही मी..”

“तसे नाही गं.. विषयच असा की मी मी म्हणणाऱ्यांची वाट लागते.”

“अव्वल दर्जाच्या स्टुपिडा.. मीच विचार केला तुझा म्हणून सांगते.. तिच्याशी डायरेक्ट बोलणे तेरे बस की बात नहीं.. म्हणून लिही.."

"आणि बाय पोस्ट पाठवून देऊ.. ती पोहोचेपर्यंत पत्र अमेरिकेत. पण कुणा दुसऱ्याच्या हाती पडले तर.. पण हे जमेल.. डन्.."

"तू मला पुरते बोलू देत नाहीस.. ते पत्र तुझ्या शिवाय दुसरे कुणीच तिला ते दिलेले चालणार नाही.. दिलेलेच.. हँड डिलिव्हरी.."

“अगं पण.. ती अमेरिकेत.. मी कसा जाणार..”

“वाटलंच तू असे विचारणार. पण ती गेलेली नाही अजून.."

"ओह! ती इथेच आहे? म्हणजे शी इज हिअर?"

"स्टुपिड. मला कळते नीट मराठी. उगाच इंग्रजी नको माझ्या समोर.."

"ते ठीक गं. पण ती कुठेय? गेली नाही ना अजून?"

"युजलेस, मूर्खा, आज रात्रभर असेल ती मुंबईत. आजच गाठ तिला.. उद्या जातील सगळे अमेरिकेत. काल बिचारी रात्रभर हैराण होती. झोपली पण नाही..”

“खरेच?”

“नाही.. खोटे सांगते तुला.. मी असते ना तर सरळ काट मारली असती तुझ्यावर.. पण या अमेरिकन बाई ठरल्या सतयुगातील.. ती काय बोलली माहितीय..”

“बोल.. वै जे काय बोलली..”

“आता ऐक.. तुझ्याबद्दल तिला आधीच ठाऊक होते.. म्हणजे फोटो बिटो पाह्यला होता तिने.. आणि तसा तू आहेसच म्हणा रूबाबदार .. ॲंड इट्स लव्ह ॲट फर्स्ट साईट .. ऑफ फोटोग्राफ!”

“काय सांगतेस.. माझ्याबद्दल तू आज पहिल्यांदा काही चांगले बोलतेयस..”

“हुं.. कधी कधी खोटे बोललेले आरोग्यास हितावह असते .. दुसऱ्याच्या. तर ती म्हणाली, मला आवडतो हा गाय..”

“गाय? हा गाय .. की ही गाय? साधे मराठी व्याकरण कृत्तिका..”

“चूप.. इंग्लिश मधला गाय.. त्यामुळे तुला पटवण्याचा ती प्रयत्न करत होती..”

“ती?”

“नाही मी.. आणि तू दूर दूर पळतोयस.. मूर्ख. अक्कल कशाशी खातात माहिती नाही.. तरी बरे मी सगळा ट्रॅक ठेवलाय तिचा .. आणि आय टेल यू शी इज अ जेम ऑफ अ पर्सन”

“आय नो ..”

“व्हॉट यू नो? मी तिला तुझ्याहून जास्त ओळखते..”

“हुं.. काही वर्षे.. मी जन्मजन्मांतरी..”

“वा! आता कंठ फुटतोय साहेबांना. हेच आणि असेच लिही..”

“मराठीत?”

“हो.. आणि रस्त्यात विकत घेऊन एक मराठी इंटू इंग्रजी डिक्शनरी पण दे.. फुकट नाही तू अव्वल दर्जाचा बावळट म्हणून प्रसिद्ध आहेस.. पण तसा चांगला आहेस म्हणून .. आता हातपाय हलव.. लवकरच निघ..”

“आणि ती कुठे भेटेल..?”

“ते पण मीच .. हुं .. मीच सांगायला हवे.. रात्रभर जागून प्लॅन बनवून ठेवलाय आम्ही. वैदू म्हणजे तुझी वै म्हणाली, अंदाज घे आधी.. इफ ओन्ली द्याट मोदक लाइक्स हर.. कॅरी आऊट पुढचा प्लॅन ..

मोदक म्हणे.. पुरण नाही बटाटे भरलेत तुझ्या डोक्यात.. मोडक!”

मग मी थोडा विचार केला..

लिहिण्याचे आणि माझे वाकडेच तसे. कविता काय नि पत्र काय.. लिहिणे मला जमायचे नाही.. वै समोर बोलती भले बंद होत असो, पण मला बोलण्याची हौस भारी. तेच लिहायला बसलो की शब्द सुचणे कठीण. तर आता करू तर काय.. आणि ही शेवटची संधी. आता गप्प राहिलो तर .. वै चा आयुष्यभर गैरसमज आणि तो होऊ नाही द्यायचाय मला.

मी पटकन स्टेशनरीच्या दुकानात गेलो. दोन गुलाबी कागद घेतले.. त्यावर ॲनाटॉमीत शिकवतात तसे चार चेंबर्सचे हृदय लाल रंगात काढले.. तशी चित्रकला चांगली आहे माझी. आणि सगळ्या भागांना नावे दिली रीतसर! इतपत मी माझ्यासारखाच वागलो.. पण

नंतर हिंमत केली.. त्याच हृदयात उजव्या बाजूला एक 'पेसमेकर' असतो जो त्या हृदयास धडधड करायला लावतो.. तेवढ्या त्या भागाला मी तिचे नाव दिले.. 'वैदेही द पेसमेकर:

टू माय स्वीटहार्ट..' असे शीर्षक घालून तो कागद खिशात घातला. काकाच्या मिलिटरी शिस्तीत कदाचित कोर्टमार्शल होईल याची तमा न बाळगता त्याच्या बाईक वर टांग मारून मुंबईला सुसाट निघणार इतक्यात कृत्तिका आली..

"काय मग? काय लिहिलेस? पत्र की कविता? शायरी?"

"छे गं! लिहितोय कसला. डायरेक्ट जाऊन मी भेटतो तिला.."

प्रेमापाठोपाठ चोरटेपणा एकावर एक फ्री मिळतो का? माझ्याकडे दुर्लक्ष करत कृत्तिका म्हणाली,

“तू काय लिहिलेस ते नाही विचारत मी.. पण हे घे..”

“हे काय?”

“तुला तिथे जायला सॉलिड आणि व्हॅलीड कारण.. यात वैचा एक सोन्याचा हार आहे.. मुद्दाम विसरलीय ती.. तो देणे .. आहे की नाही अर्जंट..”

“च्यायला.. कृत्तिका.. अफलातून प्लॅनिंग तुझे..”

“नॉट ओन्ली माईन.. तुझी वै इज इक्वली पार्टनर इन क्राईम.. आता आम्ही एवढी मेहनत घेतलीय तर..”

“मी सुद्धा काही घोटाळा करू नये इतकेच ना.. एक सांगू का.. नको तुला नको..”

“सांग सांग ..”

“अगं आता कसले टेन्शन.. तिच्याकडून हो आहे ना मग चिंता नाही .. आता बघ मी ..”

“सॉरी.. तुला एक सांगायचे राहिले.. तू गेलास की तुझी ती तोंडी परीक्षा घेईल मगच ठरवेल.. बघ .. नसशील जात तर..”

मी निघण्याआधी कृत्तिकाने शेवटची साधून घेतली.

मी बाईक सुसाट सोडली. वै चा तो हार नीट जपून छातीशी ठेवला. पत्र जपून ठेवले त्याच बॉक्समध्ये. आता काही तासांचा अवधी आणि वै वुड बी माइन. कृत्तिकाच्या मदतीबद्दल मला अत्यंत कृतज्ञता दाटून आली.. चार दिवसांच्या सगळ्या गोष्टी स्वप्नवत.. त्यातली वै तर स्वप्नसुंदरी. बहुधा आमची गाठ त्या तिथे वरून बांधण्याचे ठरलेच असावे.. नाहीतर इतके योगायोग?

एका धुंदीत मी मुंबईत पोहोचलो.

मी कृत्तिकाला म्हणालो नव्हतो, पण मला सांगायचे हेच होते की एकदा वै चा होकार गृहित असला की मी माझा नॉर्मल सेल्फ .. म्हणजे .. काहीही बोलायला मोकळा होतो. ते दिसलेच लवकर!

२३

## विसरली हार ती का घरी?

बाईकवर टांग मारून, प्यार का संदेसा घेऊन, एका ध्येयाने प्रेरित होऊन, वेडात दौडल्यासारखा निघालो मी. वै चा तो सोन्याचा हार नि माझे ते पहिलेवहिले प्रेमपत्र किंवा प्रेमचित्रपत्र घेऊन. आज विचार करून वाटते की तेव्हा आजच्या सारखे मोबाईल असते तर .. सारे किती सोपे झाले असते. टाकले दोन मेसेजेस की झाले काम! पण तरीही हे असले 'हार्ट टू हार्ट' संदेश पाठवणे कठीण कामच नाही का? तरीही हे होतच आले आहे. अगदी मोबाईलच काय .. पत्रे टाकणारे पोस्टखाते नव्हते तरीदेखील ही प्रेमपत्रांची देवाणघेवाण होतच होती ना! कबुतरे पण या कामी जुंपली जायची. आणि त्याही आधी पत्रे लिहित नसतील तरीही ही हृदयांची देवाणघेवाण होतच असणार ना! थोडक्यात हे संदेशांचे दळणवळण होत आले आहे अनादि कालापासून नि पुढेही होत राहिल. तरीही ह्यासाठी कुणी गाईडलाईन्स बनवू नयेत आजवर? म्हटले ना जीवनोपयोगी असे शिक्षण तसे फारच कमी दिले जाते आपल्याला! मेडिकलच्या शिक्षणात हृदयाची रचना शिकवतील,

त्याचे कार्य शिकवतील, पण त्याचा कारभार चालतो कसा नि चालवायचा कसा ते कुणीच नाही शिकवत. थोडक्यात हे कठीण काम करायला निघालेलो मी.

ह्या हे ह्रदयीचे ते ह्रदयी घालण्याबद्दल मुलभूत आणि मौलिक चिंतन करत.. हे सारे चिंतन ती बाईक हाकता हाकता मी मुंबईतल्या एका घराचे दार ठोठावे पर्यंत संपवले.

एका श्रीयुत डॉ. श्रीधर श्रीपाद श्रीयान, एम. ए. एम. कॉम. डि.लिट. नावाच्या नेमप्लेटी मागचा दरवाजा उघडला.

"कोण तुम्ही?"

“मी.. मोदक.. नाही आमोद.. बुरकुले आलेत त्यांना भेटायला आलोय..”

“अरे या.. या.. तुम्ही लग्नघरातून?”

“हो.. उद्या जायचीत ना मंडळी म्हणून..”

“पण ते तिकडूनच तर आले..”

“हो.. पण वै.. देही तिचा ..”

इतक्यात वै ची आई बाहेर आली..

“ओ हो.. अरे आमोद तू.. इतक्या लांबवर.. इकडे असा घाईघाईत कसा?"

आता वै च्या आईला काय म्हणावे म्हणजे डायरेक्ट आई की काकू की आंटी की अजून काही.. या गोंधळात पडलो मी. म्हटले ना प्रत्यक्ष आयुष्यात उपयोगी पडेल असे शिक्षण कुणी देतच नाही.

“काही नाही हो .. वैदेही तिचा हा हार तिकडे विसरून आली.. म्हणजे चुकून.. विसरून आली.. म्हटले उद्या तुम्ही जाणार.. मग परत येणे कधी होईल.. तो द्यायला आलो..”

तिच्या आईच्या हातात ती बॅग देत मी म्हणालो..

तिने बॅग घेताच माझ्या लक्षात आले.. ती गुलाबी चिठ्ठी मी त्याच बॅगेत ठेवली आहे. माझा जन्मजात वेंधळेपणा असा या वेळीही!

“वेंधळी आहे हो वैदेही.. बिचाऱ्याला इतकी लांबची फेरी पडली..”

“त्याचे काही नाही हो..”

इथे मी 'इट्स माय प्लेझर' म्हणणार होतो.. नशीब नाही म्हणालो.. कुठे काय बोलावे या इतकेच कुठे काय बोलू नये हे ही महत्त्वाचे..

“पण जरा एक सेकंद ती बॅग देता का.. माझा महत्वाचा कागद राहिलाय त्यात..”

मी बॅगेतून ते गुलाबी पाकिट हळूच काढून कुणाला दिसू नये असे पटकन माझ्या खिशात सरकवले. वै एक वेंधळी असेल तर मी दहा वेंधळा होतो!

मग इकड तिकडच्या गप्पा झाल्या. चहापाणी झाले. मी चुळबुळत बसून होतो. म्हटले.. नथिंग डुईंग ..

आता मिशन वैदेही. ती कुठेच दिसेना. माझा बावळटावतार आता त्यागण्याची वेळ आली होती. तिचे नाव घेणे भाग होते आता.

“वैदेही दिसत नाही?”

मी खिशातल्या पाकिटावर हात ठेवत विचारले. आणि ते वाक्य संपता संपता माझ्या वेंधळे कम विसराळूपणाची आठवण आली. कृत्तिका म्हणालेली, तू जाशील तेव्हा वैदू खाली बागेत बसलेली असेल! मी हे पार विसरून गेलो?

आणि इकडे माहिती मिळाली की वै गेलीय तिच्या मैत्रिणीकडे! म्हणजे ती खोटे सांगून गेलीय बागेत! म्हटले ना 'सत्यमेव जयते' वगैरे थियरी म्हणून ठीक आहे.. अजून कुठेकुठे ठीक असेलही पण प्रेमी जिवांच्या भानगडीत चोरटेपणाच नैसर्गिक!

निरोप घेऊन आतुरतेने मी खालच्या बागेत आलो. अंधार झालेला. बाग तशी मोठी होती. थोडे शोधले आणि जवळच्या बाकड्यावर वै दिसली. मनाशी म्हटले.. गुरू हो जा शुरू.. बोलबच्चन नसशील तू पण कमीत कमी आजतरी..

“वैदेही.. ” मी हाक मारली.. “डियरी वै..”

वै ने चमकून पाहिले. एकतर मी आलेलो.. त्यात परत ही अशी हाक..

वै च्या डोळ्यातून पाणी आले. काल रात्र बिचारीने जागून काढली. कृत्तिका आणि ती.. दोघांचे जागरण आता असे फलद्रूप झाले म्हणायचे.. शेवटी काय असे युद्धस्तरावरील निर्णयश्रा अर्ध्या रात्रीतच घेतले जातात म्हणे!

मग मी खूप बोललो.. इतका की तिच्या डोळ्यांतून हसून हसून पाणी आले.

“आय हॅड हर्ड यू टॉक सो मच.. दॅट वॉज..”

“ॲब्सोल्यूटली राईट.. ॲंड फ्यू मोअर राईट थिंग्ज टू डू..”

“व्हॉट?”

“जस्ट टू टेल यू.. आय वॉंटेड टू से ऑल धिस .. युअर मेहंदी वॉज ब्यूटिफुल.. बट नॉट ॲज मच ॲज यू.. इन द मून लाईट आय कुड नॉट टेल यू.. बट यू वेअर द वन अबाऊट हूम आय वॉज थिंकींग.. यू लुक्ड सो ब्युटिफुल इन दॅट रेड सारी.. व्हेन यू सेड यू वुड हॅव बिन हॅपियर.. आय थॉट आय गॉट द हिंट.. व्हेन यू सेड यू ऑल्सो वॉंट मॅरेज धिस वे.. वेल ..नाऊ यू विल.. आय वुड इम्प्रिझन यू इन द केज ऑफ माय हार्ट.. इन द लेफ्ट व्हेंट्रिकल..”

मी बेधडक बोलून गेलो.. माझ्या आतून येत होते तेव्हा विचार करायची जास्त गरज पडली नाही मला.

“ॲंड आय मीन एव्हरी वर्ड आय सेड.. जस्ट फील सो ऑन द टॉप ऑफ द वर्ल्ड.. यू नो.. आय वॉंट टू टेल यू समथिंग..”

तिच्या हाती ते गुलाबी पाकिट देत मी म्हणालो..

“ओह! क्यूट डार्लिंग..”

त्या पेसमेकर वै च्या हृदयाकडे पाहात ती म्हणाली..

“हू? मी?”

“ओह.. धिस हार्ट.. सो क्यूट.. स्टुपिड.. बट आय नो.. वन स्टुपिड इडियट हॅज ऑलरेडी सेड इट.. ॲंड डू यू रियली वॉंट टू हियर फ्रॉम मी.. व्हॉट्स द एक्स्पोझर डिफरन्स बिटवीन बकी फिल्म ॲंड नॉर्मल फिल्म..?”

माझ्या अंगावर बुक्क्यांनी मारत ती म्हणाली.. “युझलेस नॉनसेन्स.. यू गेव्ह मी सच टेन्स मोमेंट्स.. व्हेन आय केम फ्रॉम अमेरिका आय हॅड नेव्हर थॉट आय वुड गेट सच अ डील..”

“डील?”

“या.. डील ऑफ सच अ स्टुपिड इन एक्सचेंज ऑफ हार्ट्स.. बट ॲम सो हॅपी..”

मग आम्ही बागेतच गप्पा मारत बसलो.. जवळच आईस्क्रीम पार्लरमध्ये एक आईस्क्रीम वाटून खाल्ले..

“नाऊ व्हॉट मोदक?”

“नथिंग.. आय डोण्ट वॉंट कॉफी ऑन आईसक्रीम वै..”

“स्टुपिड मंकी.. आय वॉज आस्किंग समथिंग एल्स..”

हातात हात घेऊन तिला म्हणालो..

“हेन्स फोर्थ दॅट्स माय जॉब.. आय विल गेट ऑल डन.. आय विल मॅनेज.. माय डार्लिंग.. यू आर नाऊ माय हेडेक..”

“व्हॉट..? कम अगेन..”

“आय विल.. डिअर.. आय विल कम अगेन.. इफ इट इज पॉसिबल.. इव्हन डेली .. टू युवर युएसए..”

मी माझ्या नेहमीच्या फॉर्ममध्ये येत .. म्हणजे तिच्या भाषेत.. कमिंग इन माय एलिमेंट्स .. म्हणालो. ती थोडी उदास होत म्हणाली,

“ओह.. टुमॉरो वुई आर फ्लाईंग..”

“नेव्हर माईंड माय डियर स्वीटहार्ट.. आय कॅन हॅंडल इट..”

“व्हॉट..?”

“फ्लाइट.. डियर.. आय कॅन फ्लाय द प्लेन ऑफ माय थॉट्स..”

“यू? कॅन यू इव्हन स्पीक..”

“ओह.. डोन्ट चॅलेंज.. आय थिंक आय हॅव प्रूव्हन हाऊ मच आय कॅन स्पीक..”

तिचा मेंदीने रंगलेला मुलायम हात हातात घेऊन तिला तिच्या त्या बिल्डिंगपर्यंत सोडले.. म्हणालो, "यू नो व्हॉट आय वॉज इमॅजिनिंग यस्टरडे?"

"काय?"

"यू न मी इन प्लेसेस ऑफ रागिणी..अँड हर ग्रूम."

"स्टुपिड, काल तू हे काय नाय बोलतो? आम्ही किती टेन्स."

"बेटर लेट दॅन नेव्हर.."

"यू आर सुपर स्टुपिड डिअर.."

"कृत्तिका पण हेच म्हणाली."

"हेच म्हंजे?'

"हेच, स्टुपिड.."

"ऑब्व्हियसली, जो तू आहे ते सगळयाला वाटणार की नाय.."

"असू दे, नाऊ यू हॅव नो चाॅइस डार्लिंग .. धिस स्टुपिड इज हिअर .. फॉर लाईफटाईम.."

"आय नो.. स्टुपिड."

लवकरच भेटू असे वचन देत घेत तिथून निघालो.

सारे जगच आता बदललेले वाटू लागले मला..

रात्री उशीरा परतलो. तिचा तो मुद्दाम विसरलेला हार द्यायला इतक्या लांब मी तातडीने गेलो म्हणून काका त्याची बाईक त्याला न मी विचारता घेतली हे विसरला.. वर परत त्या मुंबैकरांच्या घरात माझ्या ह्या यातायातीचे प्रचंड कौतुक झाले.. हे मला कसे ठाऊक.. अर्थातच पुढे भारत अमेरिका पत्रव्यवहारात प्रचंड वाढ नोंदवली गेली..त्यातून हे निरीक्षण नोंदवण्यात आले.. हो त्या काळी आम्ही

पत्रे लिहीत असू.. आजच्या इन्स्टंट मेसेजिंगवर पोसलेल्या कुणास ठाऊक नसेल म्हणून सांगतो.

पण ही सगळी त्या विसरलेल्या हाराची किमया!

२४

## पुन्हा वाजवा रे वाजवा!

मग व्हायचे ते झाले.

तिच्या नि माझ्या घरी बातमी फुटली. बुरकुल्यांची हरकत फक्त वै इतकी वर्षे तिथे राहिल्यानंतर इकडे कशी ॲडजस्ट होईल यावरच होती.

म्हणजे पत्रातून वै ने कळवले मला..

'डिअर स्टुपिडेस्ट मंकी ऑफ माईन, डॅड ॲंड मॉम आर वरीड.. इट्स सो डिफरन्ट देअर इन इंडिया.. हाऊ आय विल ॲडजेस्ट.. बट दे आर इम्प्रेस्ड बाय यू .. आय डोन्ट नो व्हाय अँड हाऊ..'

मी कळवले तिला.. 'व्हॉट एव्हर इट इज.. डोन्ट अंडरेस्टिमेट द पाॅवर ऑफ कॉमन स्टुपिड.. अँड एनी वे आय हॅव पास्ड द एक्झाम .. थ्यांक्स..'

यावर तिचे उत्तर आले.. ‘‘नो नो ..डोन्ट फ्लाय हाय .. आय गॉट यू थ्रू.. विथ ग्रेस मार्क्स..’’

ती पण माझ्यासारखीच थोडी वात्रट होत चाललेली दिसली मला.. मग मी तिला लिहिले..

'ओह.. बाय मर्सी ऑफ गॉड.. ॲन्ड युवर ग्रेस! थँक्स अँड बी रेडी फॉर युवर ओन स्टुपिडीटी ऑफ चूजिंग द स्टुपिड!'

'आय नो. इट हॅपन्स..'

'ॲज वुई से हिअर, होनी को कौन टाल सकता है!'

थोडक्यात भारत आणि अमेरिकेतल्या पोस्ट खात्याची त्या काळात जी भरभराट झाली असेल त्याचे श्रेय आम्हाला होते!

इकडे बाबांना आमच्या लग्नाबद्दल हरकत नव्हती पण आईच फॉरेनच्या पाटलीणीबद्दल साशंक होती. आईने थोडा विरोध दाखवला खरा पण शेवटी म्हणाली, "चांगली आहे, हुशार आहे. पण फक्त या मोदकाला सांभाळून घेण्याइतकी हुशार असली म्हणजे झाले." थोडक्यात माझी ख्याती ही असली होती! काही असो. दोन्ही बाजूंनी होकार आलाच नि गंगेत घोडे न्हायचे ते न्हालेच!

काही महिन्यांनी बुरकुले येऊन गेले. सहकुटुंब. म्हणजे वै सकट. लग्नाबद्दल जुजबी बोलणी झाली. परत जायची घाई होती त्यांना. वै ला तिकडचा सारा कारभार आटोपणे होते. तेव्हा झटपट

साखरपुडी उरकून घेतली.. हो साखरपुडीच.. कोणताच समारंभ नाही.. नुसतीच अंगठ्या एक्सचेंज! त्यामुळे साखरपुडीच म्हणायची. सगळ्यांनी पेढ्यांनी आपापली तोंडे गोड केली.. आणि मी आणि वै नी पण एकांत शोधून आपली.

लग्नाच्या तारखा वगैरे निश्चित झाल्या. वै आणि माझी पत्रापत्री जोरदार सुरू झाली.

त्यातून मी माझ्या वात्रटपणाची झलक दाखवत होतोच तिला. पुढील आयुष्यासाठी तयारी हवीच तिची! तिने लिहिले एकदा..

'आय ॲम वेटिंग फॉर दी डे मोदक..'

त्यावर माझे उत्तर होते..

'आय नो, सम पीपल डोन्ट माईंड टू बी मार्टियर्स..!'

'मोदक, समटाईम्स आय जस्ट वंडर, हाऊ आय केम ॲक्रा ॅस यू.. यू नो आय जस्ट कान्ट बिलिव्ह..'

'येस. इव्हन मी! बट यू आर लकीयर दॅन मी.. यू गॉट अ बेटर बेट!'

'ओह! माय फिश! डोन्ट बी अंडर मिसकन्सेप्शन.. आय कॉट यू इन द वाईड नेट.. ॲम अ स्पायडर वुमन!'

'आय ॲग्री.. कॉट इन द नेट.. जस्ट यू वेट.. यू बेट.. व्हेन यू कम हिअर.. माय डिअर! बट डोन्ट यू थिंक यू आर अ सुपर वुमन?'

माझ्या त्या तीन चार कविता आधी केलेल्या त्याही तिला एकदा पाठवल्या मी. त्यातले काही मराठी शब्द कळणे कठीण होते तिला. म्हटले आलीस इकडे की घेतो तुझे मराठीचे क्लासेस आणि काय!

असली आमची पत्रापत्री सुरू होती. कधीमधी फोन करायचो पण आयएसडीच्या बिलाच्या पळणाऱ्या आकड्यांकडेच जास्त लक्ष जायचे. त्यापेक्षा पत्रलेखन बरे.

मग पुढे काय..

तेच लग्न.. यथासांग!

ते ही त्याच काकाच्या त्याच घरी. चांगली आठ दहा दिवस मुक्कामास आली मंडळी. पाहुणे कुठून कुठून आले. आईचा मंगूमामाही मुलीला घेऊन चांगला आठवडाभर राहिला. दूरदेशातूनही काही जणे आली. सारा आनंदी आनंद झाला.

त्याच घरात बसून मी रागिणीच्या लग्नाच्यावेळी घडलेल्या सगळ्या गोष्टी आठवून घेतल्या.. त्यासुद्धा यावेळी वै च्या साथीने.

त्या गोष्टी ऐकून माझ्या त्यावेळच्या बावळटपणाबद्दल दोघेही मनमुराद हसलो.

"यू नो.. मी गेली ना तर आय हॅड लॉस्ट ऑल होप्स.."

"बट आय हॉप्ड ऑन फर्स्ट अपा◌ॅर्च्युनिटी नो? मला फक्त तुझा होकार हवा होता.."

"शहाणाच आहेस.. तू न विचारताच तुला होकार?"

"तुझं मराठी सुधरतेय हां.."

"दन्यवाद!"

"यू नो ही सिस्टीमच चुकीची आहे.. इन धिज डेज ऑफ इक्वॅलिटी.. फक्त मुलांनीच का करावे प्रपोज?"

"खरंय.. टू टेल यू द ट्रूथ यू नेव्हर प्रपोज्ड फर्स्ट. कृत्तिका नि मी काय केलं नस्तं तर.."

"हिअर आय ॲग्री.."

"बेटर.. डू!"

अशी सगळी जुन्या काळाची उजळणी झाली त्याच बागेत, त्याच झाडांसमोर बसून.

लग्नात वै नी कृत्तिकाला तोच .. विसरलेला.. हार रिटर्न गिफ्ट म्हणून दिला! कृत्तिकाने ही माझी मनसोक्त चेष्टा केली.. कर म्हटले.. आता काय फरक पडणार होता?

सारे काही यथासांग झाले. बुरकुले आई बाबा परतले. वै माझी होऊन राहिली. ते जाताना वै ला रडू कोसळलेले पाहायला लागू नये म्हणून माझे प्रयत्न मात्र फसले. अशा प्रसंगी मलाच रडू आवरणे कठीण जाते तसे ते गेलेच.

वै रुळली इथे. इकडील सर्वांना त्या अमेरिकारूपी स्वप्नदेशाची स्वप्ने पडतात तर हिला इकडचेच आकर्षण फार. अगदी लहानपणापासून म्हणे तिला भारतातच यायचे होते. कदाचित इकडची मुळे घट्ट असावीत आणि काय! आता आम्ही मस्त सेटल झालोय. वै मराथी तून मराठी होतेय.. आणि जात्याच हुशार ती.. ब्रिलियंट म्हणावी अशी.. झटपट मराठी शिकत आलीय. इतकी की आता आम्ही शुद्ध मराठीतच भांडतो! ती हुशार आहे आणि आपल्या देशाला अशी ब्रेन गेन ची संधी मी मिळवून दिल्याचा मला ही अभिमान आहे! तशी लग्नास काही वर्षे लोटली आहेत. बायकोपणाच्या सत्तासिंहासनावर वै आरूढ झालीय.

तिला गंमतीत 'यू आर माय हेडेक' म्हणालेलो मी ते मधूनमधून ती सिद्ध करतेही.. आपला जन्मसिद्ध अधिकार असल्यासारखे!

थोडक्यात गंगेत घोडे न्हाले..

न्हाले म्हणजे अगदी अभ्यंग स्नान!

२५

## धक्कादायक धक्का!

लग्नानंतर एखादा महिना झाला असेल नसेल.. आम्ही हनिमूनवरून परतलेलो.

वै आणि माझी नव्याची नवलाई होतीच. माझे मूलभूत चिंतन मला आजही सांगते.. हनिमूनला फार दूर किंवा महागड्या ठिकाणाची नसते गरज.. नव्या नवऱ्या नि नवरीच्या नवलाईची नशाच पुरेशी असताना अगदी छोटेशी जागाही पुरेशी असते.. पण अर्थात आम्ही दूर मॉरिशसला जाऊन आल्यावर हे मी सांगतोय! असो..

तर आम्ही परतलो होतो.. वै मराठी अगदी आवडीने शिकत होती. आईच्या माहेराशी कनेक्शनमुळे की कोणास ठाऊक पण तिच्या भाषेबद्दल आईने उदार धोरण ठेवले होते. वै च्या मोडक्या मराठीला आई आपल्या तोडक्या इंग्रजीत उत्तर देई. सगळे कसे मजेशीर होते. रोज वै आता आपल्यासोबत आहे याचा निराळाच आनंद होता. मध्येमध्ये सिनेमात फ्लॅशबॅक दाखवतात तशा

रागिणीच्या लग्नात आम्ही भेटलो तेव्हापासूनच्या गोष्टी डोळ्यापुढे तरळून जात. आणि या प्रकाराची अजूनच गंमत वाटे. कोण म्हणतो योगायोग होत नाहीत? पण काही योगायोग घडवून आणले जातात हे मला योगायोगानेच कळले!

त्याचे झाले असे की त्यामुळे मी तीन ताड उडालो.. झाले काय की..

एके दिवशी सकाळसकाळी मला जाग आली. सहा वाजले असावेत. रोज मी साताच्या आत उठत नसे. पण आज रविवार.. त्यामुळे झोपून रहावेसे वाटेना. त्यात वै सकाळी उठून जॉगिंगला निघून गेलेली. मी स्टडीरूममध्ये आलो तर तिकडचा लाईट चालू होता. टेबलावर एक पत्र पडलेले. आईच्या अक्षरात. तारीख कालची. रमाकाकूला आईने लिहिलेले पत्र होते ते.. त्यातला मजकूर वाचला की कळेल तुम्हाला काय झाले ते.. आई बहुतेक झोप अनावर झाल्याने ते तसेच सोडून गेली असावी. असे होते ते पत्र..

*प्रिय रमास,*

*आज आता सारे स्थिरस्थावर झाल्यावर तुला हे पत्र लिहित आहे. मी किती आनंदात आहे म्हणून सांगू. आणि त्याचे मोठे श्रेय तुला आहे.*

*वैदेही अत्यंत चांगली आणि सुशील मुलगी आहे. आजच्या जमान्यात अशा मुली बनवणे देवाने बंद केले की काय अशी परिस्थिती आहे. आमोदला अशी मुलगी मिळेल असे मला स्वप्नातही वाटले नव्हते. एक तर तो कितीही चांगला असला तरी एक नंबरचा बावळट. अर्थात तुला ही ते ठाऊकच आहे. त्यात त्याला म्हणे अरेंज्ड मॅरेजवर विश्वास नाही.. तोच म्हणाला होता एकदा. मुली बघणार नाही म्हणून. आणि लव्ह मॅरेज.. याच्यावर सोडले तर हा कुण्या मुलीला आपली मन की बात सांगेतोवर तिचे लग्न उरकून तिला दोन पोरेही झालेली असतील.. एखादी मुलगी काय तोंड उघडे ठेवले की जांभूळ टपकावे तशी आभाळातून पडणार होती याच्या आयुष्यात? त्यामुळे बुरकुल्यांना नि वैदेहीला जराही कल्पना न देता लग्नाला बोलवण्याची आपली कल्पना भन्नाट आणि आता यशस्वीही.*

*लग्न जमवण्याचा हा कदाचित असा पहिला रिॲलिटी शो असेल! तुला सांगते पण माझी शेवट पर्यंत मोदकाबद्दल खात्री*

*नव्हती. तो कधीकधी वैदेहीबद्दल उगाच असे बोलायचा की मला वाटायचे सारे मुसळ केरात. पण शेवटी हिंमत करून बेट्याने जमवलेच. रागिणीच्या लग्नाचा हा चांगलाय बाय प्रॉडक्ट.. हो की नाही? महत्त्वाचे म्हणजे इतक्या दुरून आल्यावर वैदेहीस तो पसंत पडला. तसा आहे तो चांगला पण किंचित वेंधळा नि बावळा आहे. वैदेही सांभाळेलच त्याला.*

*पण हे इथेच नाही संपत.. आता पुढे वाच.. मोदक वैदेहीच्या लग्नात माझ्या मंगूच्या मुलीचे.. म्हणजे अनुयाचे तुझ्या लंडनहून आलेल्या मैत्रिणीच्या मुलाशी जुळते आहे! म्हणजे आपले 'एका लग्नात दुसरे लग्न जुळवा' मॉडेल यशस्वी होत आहे तर! आनंद आहे. सध्या त्यांचे ठरल्याची बातमी आहे. अजून डिटेल्स कळले की कळवीन. बाय.*

*तू फक्त काकूच नाहीस.. माझी मैत्रीण आहेस याचा किती आनंद आहे सांगू. मोदक आणि वैदेहीला आनंदात बघून आम्ही दोघेही आनंदात आहोत.*

*आणि हो..*

*कृत्तिकाला खास थॅंक्स सांग हां. तिने किती मदत केली या प्रकरणात. तिचा पत्ता नाही माझ्याकडे. पण तिला जरूर कळव.*

*बाकी भेटू तेव्हा बोलूच.. बाय. झोप येतेय तेव्हा थांबते..*

*तुझी*

*प्रमिला*

सांगा.. तुम्ही ही उडालात ना. म्हणजे हा सगळा घाट आई नि काकू यांनी मिळून घातला? एकूण पत्रावरून वैदेहीस हे सारे ठाऊक नसावे. पण कृत्तिका? म्हणजे ती मुद्दाम मला वैदेहीबद्दलचे इनपुट्स देत होती!

मला विचार करून हसू आले.

प्रेमात पाडून अरेंज्ड मॅरेजची ही पहिलीच घटना असावी आणि शेवटची नक्कीच नसावी आणि आई आणि काकू त्या मॉडेलबद्दल बोलताहेत.. त्यामुळे यापुढेही त्यांचे हे रियालिटी शोज सुरू राहणार असावेत!

वैदेही तितक्यात परत आली. मी ते पत्र मी पाहिले नसावे असे आईला वाटावे आणि त्याच वेळी वै ला पण दिसू नये असे ठेवून

दिले. सकाळी आई उठली आणि प्रथम त्या टेबलाजवळ गेली.. ड्रॉवर मधील पत्र हातात घेऊन आपल्या खोलीत निघून गेली. मी शांतपणे आईची धांदल बघत होतो. उगाच एक कीडा म्हणून आईला म्हणालो, ”आई काही शोधतेस का? नाही काल रात्री उशीरापर्यंत लिहित बसलेलीस ना म्हणून विचारतोय..”

*****

**उपसंहार**

अर्थात

शहाणपणाचे दोन शब्द!

माझ्या मेडिकलच्या अभ्यासात नोट्स काढायची सवय लागली मला. एखाद्या गोष्टीतले डिटेल्स टाळून मुख्य मुद्दे कोणते ते पहायचे आणि त्याची नोंद करून ठेवायची. आता आमच्या लग्नाला झाली सात वर्षे. वैदेही चांगलीच रूळलीय आणि आनंदातही आहे. म्हणजे काकू आणि आईने प्लॅन करून बनवलेली ही अरेंज्ड लव्हमॅरेजची स्टोरी तशी हिट आहे.

पण सुरूवातीला म्हणालो तसे.. हे सांगायचा मुख्य मुद्दा.. नव्या पिढीस मार्गदर्शन! तेव्हा यातून काय किंवा काय काय बोध घ्यावा हे मी सांगितलेच पाहिजे नाही का? तर ते सांगतोच.. नोट्स काढायची सवय अशी उपयोगी पडते (हा मुद्दा एक बाय प्रॉडक्ट म्हणून!)

१.

आई किंवा आणखी कुणी आपल्यासाठी काही स्थळे पाहात असतील तर त्यांना साफ नकार द्या. मुलगी बघून अरेंज्ड मॅरेज ही

आऊटडेटेड कल्पना आहे. कल्पना करा वैदेहीआधीच्या आईने आणलेल्या कोणाला मी पाहिले असते तर?

२.

तुमची आई तुम्हाला कुठल्या लग्नात येण्याचा आग्रह करत असेल तर आढेवेढे घ्या पण थोडेसेच. नंतर कष्टाने जाण्यास तयार व्हा! आणि तयार व्हाच!

३.

लग्न समारंभ हे आपले लग्न जमवण्याचे निमित्त ठरू शकते..याची जाणीव ठेवून फक्त डोळे उघडे ठेवून रहावे म्हणजे झाले.. अर्थात याबाबतीत तुम्ही सूज्ञ असालच!

४.

घरीदारी किंवा स्वप्नातही लुंगी नेसून बसू नका. सदा स्मार्ट रहा. वेळ जशी सांगून येत नसते तशी तुमची स्वप्नसुंदरीही सांगून येत नसते..

५.

आरशापुढे का होईना मुलींशी बोलण्याची प्रॅक्टिस करा. एरव्ही तुम्ही ताडताड चालाल आणि फाडफाड बोलाल पण ऐन मोक्यावर ही वाचा तुम्हाला दगा देऊ शकते! त्यामुळे बोलाल तर वाचाल.. हा माझा खास संदेश समजण्यास हरकत नाही.

६.


आणि सगळ्यात महत्त्वाचे.. आपल्या आवडतीच्या मैत्रिणीशी ही दोस्ती करा. आंतरराष्ट्रीय डिप्लोमसीतही सर्व मार्ग उघडे ठेवतात.. तसे सारे दरवाजे बंद करून घेऊ नका.. यालाच प्रपोजल डिप्लोमसी म्हणावयास हरकत नाही.. कारण डायरेक्ट प्रपोज करण्याआधी तिच्या मनातील गोष्ट आधी समजू शकते.


तर अशी ही माझ्या अरेंज्ड मॅरेजची लव्हस्टोरी. यातून तरूण.. म्हणजे होतकरू तरूण आणि यंदा कर्तव्य असलेल्यांनी योग्य तो बोध घेतला तर हा प्रपंच यशस्वी झाला.. म्हणजे तुम्ही आपला प्रपंच मांडला तर तुम्ही यशस्वी आणि त्यामुळे हा लेखनप्रपंच ही यशस्वी!

शेवटी काय.. 'दे लिव्हड हॅपीली एव्हर आफ्टर' असा आपल्याही स्टोरीचा परिकथेसारखा शेवट होणे महत्त्वाचे आणि काय!

डॉ. नितीन मोरे यांची २७ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच ([नेट असल्यास]) पुस्तक उघडेल.









































डॉ. नितीन मोरे



राजा दरबारी



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



आधुनिक कहाण्या











डॉ. नितीन मोरे
घरात



डॉ. नितीन मोरे


सांगतो ऐका


डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे




डॉ. नितीन मोरे

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**

**डॉ. नितीन मोरे यांचे हे अठ्ठाविसावे पुस्तक.**

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक ताजेपण असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, तर समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. दिनानाथ मनोहर(३ पुस्तके), शंभू गणपुले (९ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१९ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर (४ पुस्तके),

डॉ. स्मिता दामले (८ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२८ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४ ), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ(भगवद्गीता), अरुण वि. देशपांडे(४) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।